# संशोधन पत्रिका 2019

## अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

### २८ वे राष्ट्रीय अधिवेशन
### दि. २९ व ३० नोव्हेंबर २०१९

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' - कर्मवीर




प्रकाशक

रयत शिक्षण संस्थेचे

**राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर**

**कदमवाडी रोड, कोल्हापूर**

NAAC Reaccreditation 3rd Cycle 'A' Grade
(CGPA 3.07)

फोन : ०२३१-२६५४६५८ मेल : klpshahucol@gmail.com


Scanned with CamScanner

# संशोधन पत्रिका - २०१९

ISSN No. २२३१-४३४२

# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संस्था नोंदणी क्र. १९९१/GBBSD/४२६

-प्रमुख संपादक -
डॉ. टी.एस. पाटील
अध्यक्ष
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

-संपादक मंडळ-

प्रा. डॉ. ग. का. माने
डॉ. दिनेश महाजन
डॉ. नामदेव हटवार
डॉ. प्रशांत कोठे
डॉ. शिवराज बोकडे
डॉ. चंद्रकांत चव्हाण

प्रकाशक
प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

## आधुनिक विभाग - शोधनिबंध


| संशोधकाचे नांव | शोधनिबंधाचे नांव | पा. नं. |
|---|---|---|
| अध्यक्षीय भाषण | एन. के. बागुल | २१२ |
| प्रा. महेशकुमार सोनावणे | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान | २१६ |
| डॉ. शिवराज बोकडे | हैदराबाद संस्थानातील उस्मानाबाद व लातूरच्या इ. स. १९४२ च्या चलेजाव आंदोलनातील सहभाग | २२३ |
| डॉ. एस. डी. सावंत | हरिपुरा राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन आणि सुभाषचंद्र बोस यांची भूमिका | २२९ |
| श्री. शशिकांत काळोखे | प्राचीन ते आधुनिक कालखंडापर्यंतची महाराष्ट्रातील मांग समाजाची वाटचाल : एक दृष्टिक्षेप | २३४ |
| प्रा. डॉ. एस. पी. शिंदे | वसंतदादा पाटील यांचे १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान | २४० |
| सुनिता सावरकर | १९ व्या शतकातील स्त्रीविषयक कायद्यांचे बदलते संदर्भ : अप्रकाशित मोडी कागदपत्रांच्या आधारे | २४४ |
| प्रा. डॉ. संजय पाटील | महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकास व ग्रामस्वराज्य विषयक चिंतन - एक अभ्यास | २५० |
| प्रा. सोमनाथ घाडगे | समाजसुधारक महादेव गोविंद रानडे यांचे विचार व कार्ये | २५६ |
| रोहिदास दुसार | महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या निर्मितीचा इतिहास (१ जुलै १९०६) | २६३ |
| प्रा आर. बी. वाघ | ब्रिटिश कालीन वऱ्हाड प्रांतातील कापूस उत्पादन आणि व्यापार (१८०३-१९४७) | २७५ |
| प्रा. अनंत मरकाळे | डॉ. पंजाबराव देशमुखांचा स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग | २८१ |
| प्रा. राजाभाऊ भगत | हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात मराठवाड्यातील महिलांची भूमिका | २८८ |
| प्रा. डॉ. विकास कदम | २० व्या शतकातील पंढरपुरातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी | २९३ |
| प्रा. डी. जी. चौधरी | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनावर - अभिमानवादाचा प्रभाव | ३०१ |
| Dr. Nalini Waghmare | Rajarshi Shahu Chhatrapati and Upliftment of Untouchables | ३०५ |
| प्रा. मनिषा पाटील | भाई भगवानराव सूर्यवंशी यांचे शेकापच्या जनआंदोलनातील कार्य | ३११ |
| डॉ. सौ. शोभा कोळी | किनवट माहूर परिसरातील आदिवासी स्त्रियांचे सामाजिक स्थान | ३१६ |


Scanned with CamScanner

# डॉ. पंजाबराव देशमुखांचा स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग

**प्रा. अनंत दादाराव मरकाळे**
(इतिहास विभागप्रमुख)
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड.
मो. नं. ९६२३७३९८३७
आजीवन सदस्य क्र.४९१

---

डॉ. पंजाबराव देशमुख सामान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबात जन्माला आले होते. शेतकऱ्यांच्या विपन्ना अवस्थेचे चटके त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. त्या समस्यांनीच त्यांचे चित्त व्यापून टाकले होते. म्हणून शेतकऱ्यांच्या उत्थानाला वाहून घेणे हे त्यांनी आपले जीवित कार्य मानले. सापडेल त्या मार्गांनी आणि असेल त्या परिस्थितीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांचे कल्याण कसे साधता येईल, हाच त्यांना ध्यास लागला होता व त्याच दिशेने ते प्रयत्नशील झाले. राजकीय सत्ता हे साधन आहे, म्हणून ते सत्ता प्राप्तीसाठी धडपडले. डॉ. पंजाबरावांनी सत्तेचा साधन म्हणून वापर केला. इंग्रजांचे सरकार असताना सुद्धा ते सत्तेत सहभागी झाले होते म्हणून ते इंग्रज धार्जीने होते असे नाही तर ती त्यांनी गरज म्हणून केलेली कृती होती. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राष्ट्रीय आंदोलनात सहभाग घेतला होता. राष्ट्रीय आंदोलनाला त्यांनी विविध पद्धतीने मदत केली होती.

अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी राष्ट्रीय आंदोलनाला पाठिंबा दर्शविणारे अनेक ठराव केले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या पदाचा कधीच विचार केला नाही. इ. स. १९२८ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात कलकत्याला पंडित मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली हिन्दुस्थानाच्या स्वराज्याचा आराखडा तयार करण्यात आला. पंडित मोतीलाल नेहरू समितीच्या त्या आराखड्याला देशातील सर्व लोक नियुक्त संस्थांनी एकमताने पाठिंबा द्यावा, असा ठराव अमरावती जिल्हा कौन्सिलने पास केला. दि. १६ सप्टेंबर १९२८ रोजी भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याकरिता प्रयत्न केले पाहिजे. या पंडित जवाहरलाल नेहरूंच्या सूचनेला अमरावती डिस्ट्रिक कौन्सिलने पूर्ण पाठिंबा द्यावा, अशी दुरुस्ती डॉ. पंजाबराव देशमुखांनी स्वतःच सुचवली आणि या दुरुस्तीसह हा ठराव पास झाला.[१] असा ठराव पास करणे म्हणजे एकप्रकारे इंग्रजांच्या सत्तेला विरोध करणेच होते. अशाच प्रकारे 'इ. स. १९२८ मध्ये सायमन कमिशनला विरोध करताना झालेल्या लाठीमारात लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. त्यावेळी अमरावती जिल्हा कौन्सिलमध्ये पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्या मृत्यू बद्दल दि. ३० नोव्हेंबर १९२८ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शोक

प्रस्ताव मांडला.'[२] इंग्रजांची सत्ता असताना जिल्हा कौन्सिलने अशाप्रकारचा ठराव करणे ही फार धाडसाची गोष्ट होती. डॉ. पंजाबराव देशमुखांचा राष्ट्रीय आंदोलनाला मदत करण्याचा नेहमी प्रयत्न असे. 'डिस्ट्रिक कौन्सिलचे सदस्य किंवा डिस्ट्रिक कौन्सिलचे शिक्षक यांना स्वदेशी खादी वापरण्यास प्रोत्साहन द्यावे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय आंदोलनातील सत्याग्रहाच्या मोहिमेत सक्रिय भाग घेणाऱ्या शिक्षकांना तुरुंगवासाची शिक्षा झाल्यास तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांना पूर्वीप्रमाणेच त्याच श्रेणीवर पुन्हा कामावर घेण्यात यावे असे दि. २८ जून १९६० च्या ठराव क्र. १३ मध्ये म्हटले आहे.'[३] अशाप्रकारे त्यांनी राष्ट्रीय आंदोलनाला मदत केली. दर्यापूर तालुक्यातील पांढरी गावातील शाळा पोलिसांनी आपल्या तात्पुरत्या वास्तव्यासाठी डिस्ट्रिक कौन्सिलची परवानगी न घेता मुख्याध्यापकांकडून खाली करून घेतली. त्यामुळे पोलिसांच्या भीतीने मुले शाळेत येत नव्हती. तेथील स्थानिक शाळा समितीचीही परवानगी पोलिसांनी घेतली नव्हती. म्हणून ३० ऑगस्ट १९३० च्या सभेत पोलिसांच्या या बेकायदेशीर वर्तणुकीचा निषेध करण्यात आला. तसेच पोलिसांवर कायदेशीर कारवाई करण्याचा या ठरावाने अधिकार देण्यात आला. तसेच '२८ जुलै १९२८ ला भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड इर्वीन अमरावतीला रुग्णालयाचे उद्‌घाटन करण्यासाठी येणार होते. पण या कार्यक्रमाला डॉ. पंजाबराव उपस्थित राहिले नाहीत.'[४] मनात इच्छा असली तर देशसेवा, राष्ट्रसेवा करण्यासाठी वेगळे काम करण्याची गरज नाही. तर आपल्या नित्याच्या कामातून देशसेवा करता येते. हे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी जिल्हा कौन्सिलचा अध्यक्ष या नात्याने जे कार्य केले ते एक प्रकारची देशसेवाच होती. त्यांनी जिल्हा कौन्सिलमध्ये पारीत करून घेतलेल्या ठरावात त्यांची राष्ट्रसेवा प्रतिबिंबित होते. डॉ. पंजाबराव देशमुख हे जसे समाजसेवक होते तसेच ते एक निष्ठावंत राष्ट्रभक्त होते, हे या सर्व घटनांवरून लक्षात येते.

इ. स. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाला अमरवतीत मोठा प्रतिसाद मिळाला. अमरवतीला झालेल्या भारत छोडो आंदोलनाची सुरुवात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्रद्धानंद बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांपासूनच झाली. '१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात श्रद्धानंद बोर्डिंगचे सुपरिडेन्ट जानराव लक्ष्मणराव फारकाडे यांच्यासह ८० विद्यार्थी तुरुंगात गेले होते.'[५] डॉ. पंजाबराव देशमुखांनी आपल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर प्रखर राष्ट्रप्रेमाचे विचार रुजवल्याचाच हा परिणाम होता.

**भारत सेवक दल :**

सामाजिक जीवनात नवीन बदल घडवण्यासाठी विदर्भात एखादी तरुणांची निमलष्करी संघटना असावी, असे डॉ. पंजाबराव देशमुखांना वाटत होते. म्हणून इ. स. १९३८ च्या फेब्रुवारी महिन्यात अमरावतीला भाऊ भटकर, गुलाबराव होनाडे, के. बी. कदम आणि एकनाथ मोहड यांची डॉ. पंजाबराव देशमुखांनी एक बैठक घेतली. अभिमन्यू व्यायाम



Scanned with CamScanner

प्रसारक मंडळ, बलभीम व्यायाम प्रसारक मंडळ आणि शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळ ही तीनही व्यायाम प्रसारक मंडळे एकत्र करून 'भारत सेवक दल' स्थापन करण्यात आले.[६] या संघटनेद्वारे या प्रदेशातील तरुणांना संघटित करण्याचे ठरविण्यात आले.

दोन वर्षातच नागपूर, वर्धा, अकोला, मूर्तिजापूर, दर्यापूर, यवतमाळ, कारंजा, आर्वी, अमरावती व पुणे इत्यादी ठिकाणचे भारत सेवक दलाचे कॅम्प चांगलेच गाजले. इ. स. १९३९ साली वर्ध्याला मांडले. हायस्कूलच्या मैदानावर भारत सेवक दलाचा कॅम्प घेण्यात आला. समारोपाच्या दिवशी शिबिरार्थी सेवाग्रामला महात्मा गांधींच्या भेटीसाठी गेले. त्यावेळी महात्मा गांधी म्हणाले, ''डॉ. पंजाबराव देशमुख का सब काम अच्छा है। इस दल मे विविध जातीयोंके पदाधिकारी देखकर मुझे बडी खुशी हुई। आप सब लोग ऐसे ही विधायक उपक्रम करते रहिये। देश के भलाई का यही सबसे अच्छा कार्य है।''[७] डिसेंबर १९४१ मध्ये अमरावतीच्या कॉटन मार्केटमध्ये ॲड. वऱ्हाडे यांच्या अध्यक्षतेखाली भारत सेवक दलाचा भव्य मेळावा भरला. त्यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले होते, ''भारत सेवक दल आमची नि:पक्षपाती संघटना आहे. पण संधी आल्यास हीच संघटना या मुलुखात देशभक्तीची मशाल पेटवील.''[८] जानेवारी १९४२ मध्ये वर्ध्याला अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाच्या व्यवस्थेसाठी भारत सेवक दलाने आपले स्वंयसेवक पाठविले होते. पुढे ही संस्था व्यापक राष्ट्रीय भावनेने राष्ट्रसेवा दलात विलीन करण्यात आली.[९]

**दुसरे महायुद्ध आणि डॉ. पंजाबराव देशमुख :**

इ. स. १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. भारत ब्रिटिश साम्राज्याचा अविभक्त भाग असल्यामुळे भारत महायुद्धाच्या खाईत लोटला गेला. ब्रिटिशांना महायुद्धात सहकार्य करण्याची स्पर्धा भरतीयांमध्ये सुरू झाली. विदर्भाच्या चार जिल्ह्यांतून चार हजार तरुण लष्करात भरती झाले. मध्यप्रांताचे गव्हर्नर ना. वायली इ. स. १९३९ च्या डिसेंबर महिन्यात अमरावतीला आले. त्यांनी युद्ध आघाडीतर्फे अमरावतीला सभा घेतली. डॉ. पंजाबराव देशमुखांना युद्ध आघाडीतर्फे सभेला उपस्थित राहण्याचे निमंत्रण होते. पण ना. गव्हर्नराचे हे निमंत्रण त्यांनी साफ नाकारले. संपूर्ण महायुद्धाच्या काळात ब्रिटिशांच्या युद्धकार्यासाठी डॉ. पंजाबरावांनी एकही निवेदन काढले नाही. उलट वणीची कुणबी परिषद व बिहारची कुर्मी परिषद इत्यादी अधिवेशनामध्ये ब्रिटिशांच्या पाशवी राजवटीवर त्यांनी प्रखर टीका केली. डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले होते की, ''तुम्हाला प्रतिष्ठा मिळवायची असेल भावी इतिहासात तुमची इभ्रत कायम ठेवायची असेल तर तुमचा इतिहास तुम्हीच घडवला पाहिजे. हिन्दुस्थानात पेटणाऱ्या स्वातंत्र्य संग्राम कुंडात उड्या घेतल्या पाहिजेत.''[१०] अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी लोकांना स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिशांना मदत करण्याच्या उद्देशाने ४ नोव्हेंबर



Scanned with CamScanner

१९३९ ला नाशिकला मराठा लिगचे अधिवेशन झाले. त्याठिकाणी डॉ. पंजाबरावांना काकासाहेब वाघ यांनी भाषण करायला लावले. त्यावेळी डॉ. पंजाबरावांनी याठिकाणी जमलेल्या संस्थानिकांच्या शूरत्वाला आव्हान करून इंग्रजांना मदत करणे कसे चुकीचे आहे हे पटवून दिले. त्याचबरोबर स्वातंत्र्य युद्धात आपण सहभागी झाले पाहिजे, असे आव्हान केले. मराठा लिगचे हे अधिवेशन घेण्याच्या उद्देशावरच डॉ. पंजाबराव देशमुख यांनी हल्ला केला होता. ते म्हणाले होते, ''इंग्रजांना युद्धात मदत करणे म्हणजे स्वत:च्या पोटात सुरा खुपसून घेण्याइतपत आत्मघातीपणाचे आहे. तुमच्या पूर्वजांच्या पराक्रमाला काळीमा लावणारे आहे. माझे मन माझी सद्सद्विवेकबुद्धी मला बजावून सांगते की, या पेटलेल्या महायुद्धाशी आमचा काहीही संबंध नाही.''[११] डॉ. पंजाबराव देशमुखांनी महायुद्धाच्या काळात ब्रिटिश सरकारला मदत करायला विरोध होता. त्यांनी ब्रिटिशांना विरोध करण्याची ठाम भूमिका घेतली होती.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इ. स. १९४२ मध्ये दिल्ली येथे संस्थानिकांच्या 'ऑल इंडिया मार्शल रेसच्या' अधिवेशनात श्रीमंत खासाहेब पवार याचे प्रतिनिधी म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ''देशात एकीकडे साम्राज्य सत्तेचे हात बळकट करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तर दुसरीकडे स्वातंत्र्यासाठी राष्ट्रीय आंदोलन चालू आहे. कायमचे गुलाम होऊन बसायचे की, स्वातंत्र्य होऊन स्वत:च्या सामर्थ्यावर जगायचे याचा निर्णय करायची हीच संधी आली आहे. काय करायचे याचा निर्णय सर्वांनीच घ्यायचा आहे. हिंदुस्थानचे सुपुत्र म्हणून आपल्या कर्तव्याचा योग्यवाटा आपण उचला नाही तर भविष्यकाळ तुम्हाला क्षमा करणार नाही.[१२] अशा स्पष्ट शब्दात त्यांनी जनतेला स्वातंत्र आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांनी ब्रिटिशांना विरोध करण्याची ठाम भूमिका घेतली होती.

**खादी प्रचार :**

डॉ. पंजाबराव देशमुख स्वातंत्र्य आंदोलनात वेगवेगळ्या पद्धतीने सहभागी होत होते. 'अमरावती डिस्ट्रिक कौन्सिलचे अध्यक्ष असताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मे च्या पहिल्या आठवड्यात खादी प्रचारासाठी जिल्हाभर यात्रा सुरू केली. शंकरराव थुगांवकर, ॲड. विठ्ठल बंधूजी चौबळ, जयकृष्ण कुऱ्हाडे, खारतळेगांवकर, श्रीराम पाटील इत्यादी पन्नास कार्यकर्ते डॉ. पंजाबराव देशमुखांबरोबर स्वदेशीचा प्रचार आणि पदयात्रा करीत होते.'[१३] वलगावपासून या प्रचार यात्रेला सुरुवात झाली. एका दिवशी तीन-चार गावात सभा घेऊन व्याख्यानाच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रीय आन्दोलनाविषयी व खादी प्रचाराविषयी जागृतता केली जात होती. त्याचवेळी खादी विक्री सुद्धा केली जात असे. या खादी प्रचारकांना लोकांचा फार मोठा प्रतिसाद मिळत होता. डॉ. पंजाबराव देशमुख व त्यांच्या अनुयायांनी जिल्हाभर खादी प्रचार केल्यानंतर शेवटची नांदगांवपेठला झालेली सभा फारच गाजली. यावेळी डॉ. पंजाबरावांच्या लोकप्रियतेला

प्रचंड उधाण आले. नांदगावपेठच्या व्याख्यानाने डॉ. पंजाबराव देशमुख यांना अटक होणार असे वाटत होते. पण डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या वाढत्या लोकप्रियतेला रोखण्यासाठी प्रतिगामी शक्तीच्या सांगण्यावरून डॉ. पंजाबराव देशमुख यांची अटक टळली.

**आझाद हिंद सेनेचा खटला :**

डॉ. पंजाबराव देशमुख इंग्लडमध्ये शिक्षण घेत असतानाच सुभाषचंद्र बोस यांचा त्यांना सहवास लाभला होता. तेव्हाच सुभाषचंद्र बोस यांच्या राष्ट्रीय विचारांची डॉ. पंजाबराव देशमुख यांना माहिती झाली होती. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यामार्फत एका कार्यक्रमासाठी दि. १ डिसेंबर १९२९ ला सुभाषचंद्र बोस अमरावतीला आले होते. १८ ऑगस्ट १९४५ मध्ये सुभाषचंद्र बोस यांचा अपघात झाल्यानंतर आझाद हिंद फौजेची दाणदाण उडाली. आझाद हिंद फौजेचे २५ हजार सैन्य कैदी म्हणून पकडण्यात आले. सुभाषचंद्र बोस व डॉ. पंजाबराव देशमुख यांचे पूर्वसंबंध लक्षात घेता डॉ. पंजाबराव देशमुख स्वस्थ बसणे शक्य नव्हते. त्यांनी ६ ऑक्टोबर १९४५ ला देवास संस्थानच्या राजकीय प्रधानकीचा राजीनामा दिला. डॉ. पंजाबराव व त्यांचे सहकारी आर. बी. चौबळ हे दिल्ली येथे सुरू होणाऱ्या आझाद हिंद फौजेतील केससाठी दिल्लीला गेले. आझाद हिंद सेनेच्या संरक्षणासाठी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली बॅ. भुलाभाई देसाई व डॉ. पंजाबराव देशमुख आदींची संरक्षण समिती बनविण्यात आली. अनेक वर्षांनंतर पंडित जवाहरलाल नेहरू बॅरिस्टर म्हणून न्यायालयात उभे राहिले. दिल्लीच्या लालकिल्यात चाललेल्या या खटल्यात मेजर जनरल जगन्नाथ भोसले यांचा बचाव करण्याचे काम डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याकडे होते.[१४] आझाद हिंद फौजेचे सेनापती जगन्नाथराव भोसले याची कैफियत स्वत: डॉ. पंजाबराव देशमुखांनी मार्शल कोर्टापुढे सादर केली.[१५] तीन महिने चाललेल्या या खटल्यातील सर्व आरोपी अखेर दोष मुक्त झाले.

इ. स. १९४६ साली क्रांतिसिंह नाना पाटील विदर्भात दौऱ्यावर आले. प्रत्यक्ष क्रांतिसिंहांच्या तोंडून सातारा जिल्ह्यात घडलेल्या क्रांतिकारी घटना ऐकण्यासाठी लोक उत्सुक होते. पण काँग्रेस पक्षात त्यांच्याविषयी अतिशय आदराची भावना असताना मध्यप्रदेश सरकारने क्रांतिसिंह नाना पाटलांना भाषण बंदी केली. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांना संताप आला. पण अशा पेचप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मध्यप्रदेश सरकाराचे आव्हान स्वीकारले. डॉ. पंजाबरावांनी नाना पाटलांचा दौरा रद्द केला नाही. ठरलेल्या कार्यक्रमानुसार सर्व सभा झाल्या. फक्त फरक एवढाच होता की, क्रांतिसिंह नाना पाटलांच्याऐवजी स्वत: डॉ. पंजाबराव देशमुख बोलत व नाना पाटील मंचावर उपस्थित राहत. या भाषणात डॉ. पंजाबरावांनी मध्यप्रदेश सरकारचा विशेषत: शुक्ला व मिश्रा यांचा समाचार घेतला.[१६] यावरून डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रकार्य करताना विरोधाला न डगमगता धैर्याने कार्य करीत असत, असे दिसते. **त्रिमंत्री मंडळ आणि**



Scanned with CamScanner

**डॉ. पंजाबराव देशमुख :**

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर भारतात राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यासाठी इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी सर स्टॉफर्ड क्रिप्स, पेथरीक लारेन्स आणि ऑल्बर्ट अलेक्झांडर या तीन मंत्र्याचे शिष्टमंडळ २४ मार्च १९४६ रोजी भारतात आले. अखिल भारतीय छात्र महासंघाच्या बाजूने डॉ. पंजाबराव देशमुखांनी या शिष्टमंडळासमोर निवेदन सादर केले. त्या निवेदनामध्ये त्यांनी स्पष्टपणे बजावले होते की, 'हिंदी जनतेत जो काही आक्रस्ताळेपणा आला आहे. तो हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीला आलेले कटूफळ होय. येथील क्षत्रिय, दलित नसून दडपला गेलेला समाज आहे. परकीय आणि अंतर्गत पाशवी शक्तीने दबावात ठेवलेली ही शक्ती गुलाम होऊन राहणे शक्य नाही. हिन्दुस्थानचे स्वातंत्र्य आता फार दिवस थोपवून ठेवणे कुठल्याही शक्तीला अशक्य आहे. होईल तितक्या त्वरित गतीने या देशाची राज्यसूत्रे हिंदी पुढाऱ्यांच्या हातात सोपवून देणे यातच इंग्रजी सभ्यतेचा आणि शासनकर्त्यांचा शहाणपणा आहे.'[१७] अशाप्रकारे त्यांनी आपला ब्रिटिश विरोध कडक शब्दांत स्पष्ट केला होता.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वातंत्र्य आंदोलनाला बरेच साहाय्य केले होते. अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असताना त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनाला पाठिंबा देणारे अनेक ठराव केले होते. राष्ट्रीय कार्य करण्यासाठी युवकांचे संघटन आवश्यक आहे. म्हणून त्यांनी भारत सेवक दल स्थापन केले होते. महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारत सेवक दलाच्या कार्याची प्रशंसा केली होती. दुसऱ्या महायुद्धाचा व भारतीय जनतेचा कोणताही संबंध नाही म्हणून भारतीय लोकांनी इंग्रजांना कोणतीही मदत करू नये. उलट इंग्रजांना कोडींत धरण्याची हीच वेळ आहे, असे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे मत होते. अनेक जाहीर भाषणात त्यांनी हे आपले विचार व्यक्त केले होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आझाद हिंद सेनेचा खटला चालवला व आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना दोषमुक्त केले. क्रिप्स कमिशनला निवेदन करून भारताला स्वातंत्र्य देणे कसे आवश्यक आहे ते पढवून दिले. या सर्व घटनांवरून डॉ. पंजाबराव देशमुखांची उज्ज्वल राष्ट्रभक्ती दिसून येते.

**संदर्भ सूची :**


१) मोहिते वीर उत्तमराव, *जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख*, अमरावती, मराठी विज्ञान मंदिर, १९८३, पृ. क्र. १४२.

२) *कित्ता*, पृ. क्र. १४२.

३) *कित्ता*, पृ. क्र. १४२.

४) *कित्ता*, पृ. क्र. १४३.

५) *कित्ता*, पृ. क्र. २७०.

६) *कित्ता*, पृ. क्र. २१८.





Scanned with CamScanner

७) *कित्ता*, पृ. क्र. २१९.
८) *कित्ता*, पृ. क्र. २२०.
९) प्रागतिक शिक्षण (पाक्षिक), अमरावती, दि. २० डिसेंबर, १९६३, पृ. क्र. १८.
१०) मोहिते वीर उत्तमराव, *जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख*, अमरावती, मराठी विज्ञान मंदिर, १९८३, पृ. क्र. २५८.
११) *कित्ता*, पृ. क्र. २५८.
१२) *कित्ता*, पृ. क्र. २६४.
१३) *कित्ता*, पृ. क्र. १५२.
१४) *कित्ता*, पृ. क्र. १७२.
१५) मातृभूमी अर्धसाप्ताहिक अकोला, ६ जानेवारी १९४६.
१६) घोरपडे वा. न., *डॉ. भाऊसाहेबांचे धाडसी व्यक्तिमत्त्व*, विविध दर्शन, पृ. क्र. ७९.
१७) मोहिते वीर उत्तमराव, *जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख*, पृ. क्र. २७४,२७५.

◆



Scanned with CamScanner

# संशोधन पत्रिका २०१८

## अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

## २७ वे राष्ट्रीय अधिवेशन

दिनांक : ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर२०१८

- प्रकाशक -


श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

**श्रीमती एस.के.गांधी कला,अमोलक विज्ञान व**

**पी.एच गांधी वाणिज्य महाविद्यालय,कडा,ता.आष्टी,जि.बीड**

फोन : कार्यालय(०२४४१)२३९३७८

E-mail- gandhicollegekada_1996@yahoo.co.in




Scanned with CamScanner

# संशोधन पत्रिका - २०१८

ISSN No. २२३१ - ४३४२

## अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संस्था नोंदणी क्र. १९९१ / GBBSD / ४२६

**- प्रमुख संपादक -**

**डॉ. टी.एस. पाटील**

**अध्यक्ष**

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**कार्यकारी संपादक**

प्रा.डॉ. राधाकृष्ण जोशी

**- संपादक मंडळ -**

प्रा. डॉ. ग.का. माने
प्रा.डॉ.झाकीर पठाण
प्रा.डॉ. चंद्रकांत चव्हाण
प्रा. डॉ.सतिश कदम
प्रा.डॉ. प्रशांत कोठे
प्रा.डॉ. अशोक कानडे

**- प्रकाशक -**

**प्राचार्य डॉ. एस.एस. पाताळे**

श्रीमती एस.के. गांधी कला, अमोलक विज्ञान, पी.एच. गांधी वाणिज्य महाविदयालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड



Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| १७. प्रा. विजय कुलकर्णी | भारत चीन संबंधाचा इतिहास आणि वर्तमान : विशेष संदर्भ -डोकलाम संघर्ष |
| १८. प्रा. रघुनाथ शेळके | चले जाव" ची पंचाहत्तरी |
| १९. प्रा. एस.एस. कोळेसर | चंदगड तालुक्याचा राजकीय दीपस्तंभ' मा. आमदार नरसिंगराव पाटील |
| २०. प्रा. ताडेराव डी.बी. | महारादी-अस्पृश्यांची कणकवली येथील ऐतिहासिक परिषद-१९३८ |
| २१. प्रा. दिनेश रामदास महाजन | वासुदेव विठ्ठल तथा अण्णासाहेब दास्ताने यांचे मद्यपान बंदी चळवळीतील योगदान |
| २२. प्रा.डॉ. भूषण फडतरे | छोडो भारत आंदोलनातील भूमिगत लढा विशेष संदर्भ पुणे जिल्हा |
| २३. श्रीमती संगिता पवार | विटा शहरातील दसऱ्याची पालखी शर्यत |
| २४. प्रा. अनंत मरकाळे | डॉ. पंजावराव देशमुख यांचे अस्पृश्यता निर्मुलन विषयक कार्य |
| २५. श्री. गायकवाड पोपट | भारतीय स्वातंत्र्यलढयात आदिवासी स्त्रियांचे योगदान |
| २६. डॉ. उत्तम पठारे | औंध संस्थानातील स्वायत्त स्वराज्य |
| २७. प्रा. देवकुमार अहिरे | जातिनिर्मूलन- भाषणाचा/ पुस्तिकेचा ऐतिहासिक संदर्भ |
| २८. प्रा. आर.बी वाघ | आधुनिक भारताच्या उभारणीत आचार्य जे. बी. कृपलानी यांचे योगदान (१८८८-१९८२) |
| २९. डॉ. प्रशांत कोठे | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे मागासवर्गीयांच्या शैक्षणिक विकासात वसतीगृह व शिष्यवृत्यांचे संदर्भातील कार्य |
| ३०. डॉ. संजय गायकवाड | दलित चळवळीचा आधारस्तंभ : आंबेडकरवाद |
| ३१. प्रा.महेशकुमार पांडुरंग सोनावणे, | यशवंतराव चव्हाण यांचे नवमहाराष्ट्र निर्मितीतील योगदान |
| ३२. प्रा.डॉ.मु.अ.देवर्षी | स्वातंत्रवीर सावरकरांच्या इतिहास लेखनातुन प्रकटणारा राष्ट्रवाद |
| ३३. विधाते एन.एस. | 1975 ची आणीबाणी आणि प्रसारमाध्यमे |

**गोषवारा**

| | |
|---|---|
| १. डॉ. कदम संतोष | सिंधुताई सपकाळ यांचे जीवन कार्य |
| २. डॉ. विकास कदम | संताचे सांप्रदायिक व राष्ट्रीय चळवळीतील योगदान |
| ३. यादवराव कंदकुर्तीकर | तेलगु भाषण संस्कृती व सादिण्य समीसा संदर्भ संग्रह |



Scanned with CamScanner

# डॉ. पंजावराव देशमुख यांचे अस्पृश्यता निर्मुलन विषयक कार्य

**प्रा. अनंत मरकाळे**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

२४

महाराष्ट्राच्या इतिहासात १९ वे व २० वे शतक हे सामायजिक परिवर्तनाचे युग मानले जाते. याच काळात समाज क्रांतीची संकल्पना विकसीत होत गेली. एकोणीसाव्या शतकात महाराष्ट्रातील परंपरागत रूढ असलेल्या समाजात वर्ण व्यवस्था व जाती व्यवस्था, श्रेष्ठ - कनिष्ठ, स्पृश्य - अस्पृश्य इ. बाबतीत कडक निर्बंध होते. भारतीय समाजात चातुर्वणाच्या प्रभावातुन विषमतेच्या पायावर स्वार्थी हेतुने हेतु परस्पर तयार करण्यात आलेली जातीव्यवस्था व त्यातुन निर्माण झालेल्या आणि सामाजिक ऐक्यास बाधक ठरलेल्या जातीभेद व अस्पृश्यता यासारखा अनिष्ठ प्रथा परंपरेने वर्षानुवर्षे चालत आल्या होत्या. जातीभेद व जातीतप्रथा हे हिंदु समाज व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण होते. जाती जातीतील श्रेष्ठ कनिष्ठतेच्या पायायवरच हिंदु समाजाची उभारणी झाली होती त्यामुळे सहाजिकच समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या उदारमतवादी व मानवतावादी तत्वांना तेव्हाच तिलांजली मिळाली होती. ही व्यवस्था सहजासहजी बदलणे सोपे नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजव्यवस्थेचे अतिशय मार्मीक विश्लेषण करतांना या हिंन्दु समाज रचनेस 'अनेक मजली मनोऱ्याची ' उपमा दिली आहे. ते म्हणतात, " हिंदु धर्मात समाविष्ट होणाऱ्या जाती उच्चनिच भावनेने प्रेरीत झालेल्या आहेत हे उघड आहे. हिंदु समाज हा एक मनोरा आहे व एक - एक जात म्हणजे त्याचा एक- एक मजला होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, या मनोऱ्यात शिडी नाही आणि म्हणुन एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्याने जन्मावे त्याच मजल्यात त्याने मरावे. खालच्या मजल्यातला इसम, मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यायतला माणुस कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटुन देण्याची प्रज्ञा नाही. उघड भाषेत बोलायचे म्हणजे जातीतील असलेल्या या उचनीच भावना गुणावगुणांच्या पायावर झाल्या आहेत असे नाही. उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही अवगुणी असो तो उच्च म्हणावयाचा तसेच निच जातीत जन्मलेला मग तो कितीही गुणी असो, तो नीचच रहावयाचा !"[१] यावरून भारतीय समाज व्यवस्था किती बंदीस्त व प्रतिगामी होती हे लक्षात येते. हिंदु समाजातील प्रत्योक जात आपले स्वातंत्र्य,अस्तीत्व जपत होती. स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत होती . जाती-जातीतील रोटी -बेटी व्यहार बंद होता . या जाती अंतर्गत पुन्हा अनेक उपजाती



Scanned with CamScanner

असत व एकमेकांत श्रेष्ठ- कनिष्ठ भेदभाव मानित असत विशेष म्हणजे प्रत्येक जात खालच्या जातीस आपल्यापेक्षा कमी समजत होती, एवढेच नव्हे तर अस्पृश्य जातीतही हा उच्चनीच भाव होता.[२] जातीभेदाच्या या विषारी वृक्षास अस्पृश्यतेचे विषारी फळ आले व या अस्पृश्यतेने सामाजाची अक्षम्य दुरावस्था केरून टाकली. जातीप्रथा व अस्पृश्यता हे मानव जातीचे दोन शत्रु नेस्तनाबुत करण्याचे महान मानवतावादी कार्य महात्मा फुले यांनी सुरू केले. पुढे शाहू महाराजांनी आपल्या हाती असलेल्या सत्तेचा व साधनांचा उपयोग करून मोठ्या जिद्दीने जातीअंत व अस्पृश्यता निर्मुलनासाठी संगर उभा केला.

विदेशातुन उच्च शिक्षण पुर्ण करून भारतात परत आल्या नंतर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या देशाची एकंदर परीस्थिती सुधारण्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यावर कार्य केले. ते केवळ बोलके सुधारक नव्हते. त्यांनी समाज परिवर्तनासाठी प्रत्यक्ष कार्य केले. अस्पृश्यता नष्ट झाल्याशिवाय आपल्या देशाची प्रगती होणे अशक्य आहे असे डॉ.पंजाबराव देशमुख यांचे मत होते. विविध जाती समुहांनी आयोजित केलेल्या सामाजिक परिषदामधुन त्यांनी आपले अस्पृश्यता निर्मुलन विषयक विचार मांडले आहेत. पण ते केवळ अस्पृश्यता निर्मुलनाचे विचार व्यक्त करूनच थांबले नाहीत तर त्यांनी अस्पृश्यता निर्मुलनासाठी पुढील प्रमाणे कृतीशील कार्य करून परंपरागत समाजाला एक वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर लहानपणापासूनच पुरोगामी विचाराच्या आईवडिलांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. डॉ. पंजाबराव देशमुखांचे आई - वडिल सुधारवादी विचारांचे होते. गावातील सर्व जाती धर्मातील लोकांना ते सतत मदत करीत असत. आपल्या गावात शाळा नसल्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांना पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या गावाला जावे लागले. त्यावेळी त्यांचा वर्ग मित्र लोभ्या महार आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेऊ शकला नाही. त्यांचे त्यावेळी डॉ. पंजाबराव देशमुखांना फार वाईट वाटले होते. अशा घटनांमुळेच डॉ. पंजाबरावांचे संवेदनशील मन घडत गेले.

**अस्पृश्यांसाठी पानवठे खुले केले :-** हजारो वर्षापासुन बहिष्कृत असलेल्या अतिशद्रुांना सार्वजनिक धर्मशाळा, मंदीर, पानवठे, पाणपोई व सभागृहे येथे प्रवेश नाही. अस्पृश्यता कायद्या शिवाय जात नाही असा डॉ. पंजाबराव देशमूख यांचा समज होता. म्हणून त्यांनी अमरावती जिल्हा कौन्सीलचे अध्यक्ष असताना अस्पृश्यासाठी जिल्हा कौन्सीलच्या क्षेत्रातील येणारी सार्वजनिक ठिकाणे मोकळी करण्याचा जिल्हा कौन्सील मध्ये ठराव केला. सवर्ण हिंदु अस्पृश्यांना पाणी भरू देत नाहीत. म्हणून अस्पृश्यांच्या पाण्याची योजना एक लाख रूपये मंजुर करून जिल्हा कौन्सीलने कार्यान्वीत केले.[३]



संशोधन पत्रिका - २०१८ ISSN NO. 2231-4342

Scanned with CamScanner

**अस्पृश्या बरोबर सहभोजन कार्यक्रम :-** डॉ. पंजाबराव देशमुख कृतीशील समाज सुधारक होते. त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी संपुर्ण जिल्हा भर अस्पृश्यांच्या बरोबर सहभोजनाचे कार्यक्रम जाहीर रीतीने सुरू केले. या कामी त्यांना अमरावती जिल्हा कौन्सीलमधील शिक्षक बापुराव बाजीराव विधाते यांचे चांगलेच सहाय्य झाले.[४]

**अस्पृश्यांना पितर म्हणून जेवन दिले :-** डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या घरी दरवर्षी ब्राम्हण भोजन घालन्याचा प्रघात होता. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या वडिलांच्या मृत्यु नंतर वर्षश्रध्दाला वडिलांचे पितर घालावे असा त्यांच्या आईने हट्ट धरला. पण धर्मविधीचे स्तोम माजवणे डॉ. पंजाबरावांना पटत नव्हते तर आईचा हट्ट मोडणे हि त्यांना कठिण होते म्हणून त्यांनी पितर घालण्याचे कबुल केले. आईने पितर घालण्यासाठी सर्व तयारी केली भाऊसाहेबांनी चोखामेळा व राहीदास बोर्डीग मधील ११ महार व चांभार जातीतील अस्पृश्य मुलांना घरी आणुन त्यांना सन्मान पुर्वक पितर म्हणून जेवन दिले . डॉ. पंजाबराव देशमुखांच्या आईने ही त्यासर्वाना गंधाक्षता लावल्या व या समारंभाला आर्वीचे दलपत सिंग चव्हाण, नागपुरचे वामनराव घोरपडे व तेथील शिवाजी हायस्कूलचे शिक्षक उत्तमराव कदम हजर होते.[५] अशा प्रकारे त्यांनी आपल्या वृद्ध मातेची समजुत घालुन समाजातील अनिष्ट प्रथा बंद केल्या.

**मेहतराच्या हातुन लग्नाची पंगत :-** डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या लग्नाचे भोजन तयार करण्याचे व वाढण्याचे काम मेहतरांच्या मुलांकडे सोपावले होते. स्नेह भोजनाच्या कार्यक्रमात सुग्रास पक्वानांचे जेवन घेतल्या नंतर मित्र मंडळींनी पंजाबरावांचे धन्यवाद माणले. तेव्हा पंजाबरावांनी माझे धन्यवाद न मानता त्या पांढऱ्या शुभ्र वस्त्रातील मेहत मुलांचे धन्यवाद मानायला सांगितले. तेव्हा त्या सर्व उच्च कुलीन समजणाऱ्या मंडळींना धक्काच बसला. अमरावतीतील सनातनी सवर्ण हिंदु समाज मात्र या घटनेमुळे डॉ. पंजाबराव देशमुखांवर खवळुन उठला होता.[६] ही घटना म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतः पासुन केलेली सुरूवाते होती. त्यांनी आपल्या उच्च कुलीन समजणाऱ्या मित्रमंडळीच्या रोषाचा कोणताही विचार केला नाही . अशा प्रकारे कृतीशील मार्गाने त्यांनी समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता.

**वस्तीगृहामध्ये सर्व जाती धर्माच्या मुलांना प्रवेश :-**डॉ. पंजाबराव देशमुखंच्या काळात अस्पृश्यता येवढी भयंकर होती की, विविध जातीतील विद्यार्थी एका वस्तीगृहामध्ये राहणे त्यावळी अशक्य होते. विविध जातीतील विद्यार्थी वस्तीगृहामध्ये आणने म्हणजे लोकांच्या दृष्टीने धर्म बुडवेपणाच होता. जाती व्यवस्थेला विरोध म्हणजे धर्माला विरोध होता. त्या काळात प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वस्तीगृह होती. डॉ. पंजाबराव देशमुखांनी स्पृश्य - अस्पृश्य भेद नष्ठ व्हावा, अस्पृश्यता नष्ट व्हावी, खेड्यातील शेतकरी, शेतमजुर व अस्पृश्यांच्या मुलांची कमी खार्चात मोफत शिक्षाणाची व्यवस्था व्हावी म्हणून श्रध्दानंद



Scanned with CamScanner

वस्तीगृह स्थापन केले व तेथे सर्व जाती धार्माच्या मुलांना प्रवेश दिला.७ भाऊसाहेबांच्या या शैक्षणिक संस्थेमधुन शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच पुढे अस्पृश्यता व जातीयता नष्ठ करण्यात मोलाची भर टाकली.

**अंबादेवी मंदीर प्रवेश आंदोलन :-** सार्वजनिक विहिरी, शाळा, धर्मशाळा सवर्ण हिंदु प्रमानेच शुद्र अतिशुद्रांना सुध्दा मोकळया असाव्या माणुसकीचे सर्व अधिकार सर्वांना सारखे असावे यासाठी महात्मा ज्योतीराव फुले आणि राजर्षी शाहु महाराजांनी फार मोठी चळवळ उभी केली. हिंदुची मंदीरे सर्व हिंदुंना का मोकळी असु नयेत ? असा प्रश्न डॉ. पंजाबराव देशमुखांनी इ.स. १९२७ साली समाजक्रांतीच्या क्षेत्रात उपस्थित केला. हिंदु धर्म शास्त्राच्या इतिहासात हा प्रश्न उपस्थित करणारा डॉ. पंजाबराव देशमुख हा पहिलाच समाज क्रांतीकारक आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी १९२७ मध्ये अमरावतीच्या अंबादेवीच्या मंदिरात अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करणार अशी घोषना केली. सत्याग्रहाच्या अगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली एक परीषद घेण्याचे ठरले. त्यासाठी सत्याग्रह समितीची कार्यकारीणी निवडण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख स्वत: समितीचे अध्यक्ष बनले. महार जातीचे संपतराव गणपतराव नाईक हे सदस्य गृहस्थ कार्यवाहक बनले. दि. १३ व १४ नोव्हे. १९२७ रोजी इंद्रभवन नाट्यगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नावर परीषद भरली.८ याच वर्षी डॉ. बाबासाहंब आंबेडकरांनी महाडचा सत्याग्रह यशस्वी केला होता. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या मंदिर प्रवेशाची त्यात पुन्हा भर पडली.

सत्याग्रहाच्या परीस्थितीला प्रशोभक वळण लागण्याची चिन्हे दिसु लागली. अशा भयानक स्थितीत "येत्या तिन महिण्यात पुराण मतवादी विश्वस्तांचे मन वळवून हे मंदिर मी सर्वासाठी खुली करून देतो." अशा आशयाचे दादासाहेब खापर्डे यांचे एक पत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या संयमाने, निग्रहाने आणि अट्टहासाने डॉ.पंजाबराव देशमुखांसहीत साऱ्याची मने वळवली आणि श्रीमंत दादासाहेब खापर्डेना अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी तीन महिन्याची मुदत दिली. मुदतीच्या आतच दादासाहेब खापर्डेनी आंबादेवी मंदीराच्या विश्वस्थांची मने वळविली. तेव्हा पासुन अमरावतीचे अंबादेवी मंदीर सर्वांसाठी खुले झाले आहे.९

**<u>सारांश</u> :-** डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या वर पडलेल्या परिस्थितींचा प्रभाव व त्यांनी घेतलेले प्रत्यक्ष अत्यक्ष शिक्षण यातुन त्यांची सामाजिक न्यायावर आधारीत समतावादी विचार सारणी तयार झाली होती. त्यामुळे त्यांना विषमतेच्या व श्रेष्ठ कनिष्ठतेच्या पायावर उभी असलेली शोषक, मानवतेला काळीमा फासनारी जातीप्रथा व माणसांना पशूपेक्षाही हीन मानणारी अस्पृश्यता मान्य नव्हती. समाजात वर्ण वर्चस्वाद्यांनी स्वत:च्या स्वार्था साठी



Scanned with CamScanner

व समाज व्यवस्थेवरील आपले वर्चस्व अबाधीत ठेवण्यासाठी हेतु पुरस्कर सुरू ठेवलेल्या या कुप्रथांना त्यांनी तीव्र विरोध केला. आपले विदेशातील शिक्षण पुर्ण करून भारतात परत आल्या नंतर त्यांनी अनेक आघाड्यांवर कार्य केले त्यामध्ये अस्पृश्यता निर्मुलना विषयीचे कार्य फार महत्वाचे आहे. तसेच शिक्षण आणि इतर अनेक उपाययोजना करून दलितोध्दाराच्या चळवळीला त्यांनी गती दिली. म्हणून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण डॉ. पंजाबराव देशमुखांच्या हिरक महोत्सवाच्या कार्यक्रमात बोलतांना म्हणाले, " महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याच मालिकेत डॉ. पंजाबराव देशमुख अग्रगण्य समाज क्रांतीकारक आहेत."[१०]

**संदर्भ :-**


१. खैरमोडे चा.भ., डॉ. भिमराव रामजी आंबेडकर चरीत्र खंड- १, सुगावा प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती, १९९२, पृ.क.२५८.

२. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, पृ.क्र.१०७ .

३. मोहीते विर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख पृ.क्र.१४१.

४. तत्रैव पृ.क्र.१४१.

५. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर (संपादक व प्रकाशक), बहिष्कृत भारत, अंक-१०, दिनांक १२ ऑगस्ट १९२७.

६. मोहीते विर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख पृ.क्र.१३५.

७. तत्रैव पृ.क्र.१११.

८. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर (संपादक व प्रकाशक), बहिष्कृत भारत, अंक-१७-१८, दिनांक २५ नाव्हे. १९२७.

९. मोहीते विर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख पृ.क्र.१२८.

१०. तत्रैव पृ.क्र.४३६.




Scanned with CamScanner

# विद्याविश्व



डॉ.जी.व्ही.गट्टी

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

Scanned with CamScanner

10) मध्ययुगीन भक्तिसाहित्यातील विद्रोहाचे स्वरुप
प्रा. अनंत मरकाळे, अंबाजोगा 74

11) परभणी जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेचे योगदान
प्रा.डॉ.कुंभारीकर एन.एन. जि.बीड. ८३

12) आदिवासी साहित्यातील स्त्रीचित्रण
प्रा.केंद्रे सिता लक्ष्मणराव .जि.बीड ८६

13) भारतीय प्रशासन आणि भ्रष्टाचार व दप्तर दिरंगाई व वृत्तमानत्राची भुमिक ....
प्रा. कांबळे एम.एस. केज ८९

14) इतिहास लेखनातील स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाह
प्रा. जाधवर बी.डी. . गेवराई ९४

15) सांसदिय लोकशाहीतील विरोधी पक्षांची भूमिका
प्रा.डॉ.तुकाराम गोंदकर जि.बीड. ९८

16) महात्मा गांधी यांचेशैक्षणिक धोरण
प्रा.चाटे एन. एस., प्रा.गायकवाड राहूल मरोतीराव १०४

17) शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे आणि उपाय
प्रा.गंगाधर चव्हाण, अंबाजोगाई १०७

18) "म. गांधी यांच्या सविनय कायदेभंग चळवळीतील स्त्रियांचा सहभाग"
डॉ. बोरसे विनोद बाबुराव, जि. औरंगाबाद १११


Scanned with CamScanner

10

# मध्ययुगीन भक्तिसाहित्यातील विद्रोहाचे स्वरुप

प्रा. अनंत मरकाळे
इतिहास विभागप्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

************

आपल्या अभंगाद्वारे, उपदेशाद्वारे जनतेत स्वधर्माविषयी आणि स्वराष्ट्राविषयी प्रेम निर्माण करून प्रतिकाराची भावना निर्माण केली. अशा संताचे कार्य मध्ययुगीन भारताच्या इतिहासात अनन्य साधारण असेच होते. परकीय सत्ताधीशांचे अत्याचार आणि स्वधर्मातील कर्मकांडाचे स्तोम यामुळे गर्भगळीत झालेल्या समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य या संतानी केले. अनेक विचारवंतानी आणि इतिहासकारांनी या चळवळीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला आढळून येतो. न्या.रानडे यांनी तर या चळवळीची तुलना युरोपातील प्रॉटेस्टंट धर्म सुधारणा चळवळीशी केली. ही जी संपूर्ण भारतात पुनरुज्जीवनाची चळवळ निर्माण झाली ती केवळ वरिष्ठ वर्गापुरती मर्यादित नव्हती. या चळवळीतील संत हे समाजात तळाशी असलेल्या जातीतून आणि व्यवसायातून आलेले होते ही विशेष लक्षात घेण्यासारखी बाब आहे. प्रा.दांडेकरानी ह्या संताच्या कामगिरीची तुलना 1789 मध्ये फ्रान्समध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली त्यावेळी रुसो, डिडेरा यासारख्या विचारवंतानी जी वैचारिक जागृती घडवून आणली त्याच्यांशी केलेली आढळते. फ्रेंच विचारवंतानी क्रांतीकरीता जी अनुकूल भूमिका तयार केली. तशीच अनुकूल भूमिका मध्ययुगीन भारतातील संतानी तयार केली. नवीन विचारांचे बीज पेरले आणि उत्तोरोत्तर त्याला अमाप पीक आले. अशाच प्रकारे मानवी मनात नवचैतन्य भरणारे त्यांचे विचार आजही उपयुक्त आहेत.

मध्ययुगीन भारतात अनेक संप्रदायांनी जनजागृतीचे कार्य केले. मानवतावादी समाजरचनेसाठी प्रयत्न केले. विविध भागातील विविध संप्रदायातील संतांनी समाज परिवर्तनाचा पाया घातला. मध्ययुगीत भारतातील संतांनी समाजपरिवर्तनासाठी साहित्याद्वारा

Scanned with CamScanner

विद्रोह केला. मध्ययुगीन भक्ती साहित्यातील विद्रोहाचे स्वरुप कसे होते ? गद्य आणि पद्य साहित्यातील या विद्रोहाचा एकूणच भारतीय समाजमनावर कसा परिणाम झाला ? मध्ययुगीन विद्रोही साहित्याने भारतीय समाजमनावर कसा आणि कशाचा संस्कार केला ? संतांच्या शिकवणीची आज काही उपयोगीता आहे काय ? या प्रश्नांच्या उत्तरांची चर्चा प्रस्तुत शोधनिबंधातून करावयाची आहे.

घविद्रोहड ही एक राजकीय संकल्पना आहे, पण विद्रोहाची अभिव्यक्ती साहित्य आणि कलेद्वाराही होत असते. प्रा. वसंत आबाजी डहाके विद्रोहाचे स्वरुप स्पष्ट करताना लिहितात, च विद्रोह ही एक संकल्पना आहे. असंतोषाच्या आणि अव्यवस्थेच्या स्थितीतून विद्रोहाचा जन्म होतो. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक कारणांतून असंतोष उत्पन्न होतो. विद्रोह ही एक मानसिक स्थिती आहे, तशीच ती सामाजिक-राजकीय स्थिती देखील आहे. विद्रोहाच्या समाजशास्त्राची आणि सौंदर्यशास्त्राची कल्पना आपण करु शकतो. विद्रोह हा शब्द राजकीय, सामाजिक, धार्मिक अथवा आर्थिक सत्तेच्या संदर्भात वापरला जातो. सत्तेच्या विरुद्ध असणे म्हणजे विद्रोह. सर्व प्रकारच्या सत्ता राजकीय सत्तेचीच रुपे असतात आणि सारे विद्रोह राजकीय सत्तेच्या विरोधात असतात. त्यामुळे विद्रोह ही एक राजकीय संकल्पना ठरते, तशीच ती व्यक्तीची अथ्वा समूहाची विशिष्ट स्थितीही असते.छ (कवितेविषयी, पृष्ठ 51, 52) शोषकसंस्कृतीच्या विरोधात मध्ययुगीन संतांनी कार्य केले, साहित्यनिर्मिती केली. जातिधर्मपंथनिरपेक्ष असा जगण्याचा मार्ग संतांनी साहित्याच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न केला. सामुदायिक सदाचार, एकात्मता, समता आणि बंधुभाव या चार मूल्यांची प्रतिष्ठापणा तत्कालीन जातीय आणि विषमतामूलक व्यवस्थेच्या विरोधात संतांनी केली. हा संतांचा विद्रोहच होता आणि तो तत्कालीन धार्मिक सत्तेविरुद्धच होता. राजकीय सत्ता देखील जातींच्या, धर्मांच्या प्रभावाखालीच असल्याने संतांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक पर्यावरणाला विरोध करीत जातिधर्मपंथनिरपेक्ष अशी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न केले, हे प्रयत्न म्हणजेच मध्ययुगीन संतांचा विद्रोह होय.

लोकभाषेचा स्वीकार आणि कैवार करण्याचे ज्ञानेश्वरांचे कार्य त्या काळाचा विचार करता क्रान्तिकारकच होते. घ्महाराष्ट्री असावे : मज्हाटी बोलावेड असे म्हणणाऱ्या चक्रधरांच्या मराठी भाषेच्या स्वीकारामागचे जे प्रयोजन होते तेच ज्ञानेश्वरांचेही होते.

Scanned with CamScanner

लोकभाषेचे सामर्थ्य संस्कृत (देववाणी, वेदवाणी) पेक्षा अधिक आहे हे सिद्ध करण्याचे ज्ञानेश्वरांचे प्रयत्न सांस्कृतिक दृष्ट्या फार महत्वाचे आहे. संस्कृत भाषेच्या मक्तेदारीची परंपरा मोडून बोली भाषेच्या समर्थ्याचा प्रत्यय देण्याचे कार्य ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी निर्मितीने केले. चातुर्वर्ण्य-व्यवस्था टिकवून ठेवण्याचे उच्च वर्णियांचे प्रयत्न आणि या प्रयत्नांचा एक भक्कम आधार असणारी संस्कृत भाषा, ही बहुजनांची भाषा नाही आणि बहुजनांच्या मराठी सारख्या भाषांमध्ये ज्ञान, विचार अभिव्यक्त होऊ शकत नाही या आणि अशा प्रकारच्या विचारप्रणालींना ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या निर्मितीने छेद दिला. मराठी सारख्या बोलीभाषा सर्व प्रकारच्या ज्ञानासाठी उपयुक्त असतात. कोण्या एका संस्कृत सारख्या भाषेची मक्तेदारी ज्ञानाच्या क्षेत्रात असू शकत नाही, हे ज्ञानेश्वरांनी सिद्ध केले. डॉ. श्रीपाद सबनीस लिहितात, च्मूठभर विद्वान पंडितांच्या आणि उच्चवर्णियांच्या मक्तेदारी झालेल्या संस्कृत भाषेमधील अध्यात्माचे ज्ञान, ज्ञानेश्वरांनी मराठी बोली बोलणाऱ्या बहुजन समाजाच्या टप्प्यात आणून सोडले ............... ज्ञानेश्वरांची ही भूमिका बहुजन समाजाच्या कळवळ्यातूनच आकारला आल्याचे सत्य समजून घ्यावे लागते. ज्ञानेश्वरांची ही बंडखोरी तत्कालीन समाजातील उच्चवर्णिय पंडितांच्या अहंकाराला लावलेला सुरुंग म्हणूनच समजून घ्यावी लागेल.छ (संत साहित्यातील सेक्युलॅरिझम, पृष्ठ 49) ज्ञानेश्वरांच्या सर्व मर्यादांचा विचार केल्यानंतरही आणि त्या मर्यादांमुळे ज्ञानेश्वर समाजक्रान्ती करु शकले नाहीत, हे मंजूर केले तरी लोकभाषेचा स्वीकार करुन ग्रंथनिर्मितीच्या त्यांच्या क्रान्तिकारक कार्याचे महत्त्व कमी होत नाही.

लोकभाषेचे स्वरुप, सामर्थ्य आणि सौंदर्य ज्ञानेश्वरांनी नेमके ओळखले होते. घ्ओवीङ चे ज्ञानेश्वरीतील उपयोजन ही देखील क्रान्तिकारक बाब होय. संस्कृतात नसलेली ओवी घराघरात बोली बोलणाऱ्या स्त्रियांच्या ओठांवर होती. बोलीतली ओवी गीतेसारख्या तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाविषयीच्या भाष्यासाठी ज्ञानेश्वरांनी वापरली. प्रत्यक्ष समाजात बोलल्या जाणाऱ्या बोलींविषयी तत्कालीन राजकीय, सामाजिक क्षेत्रातील उच्चवर्णीयांमध्ये, अभिजनांमध्ये कमालीचा आकस होता. ग्रंथलेखनासाठी मराठी सारखी बोली पात्र नाही आणि समर्थ देखील नाही ही तत्कालीन सत्ताधाऱ्यांची आणि अभिजनांची धारणा होती. घ्संस्कृतातूनच काव्य, तत्वज्ञान सांगितले जाऊ शकतेङ या पारंपरिक विचारधारेला ज्ञानेश्वरांनी सुरुंग लावला. लोकजीवनातील वास्तवाचे संदर्भ घेत,

Scanned with CamScanner

लोकजिव्हेवरील ओवीमध्ये आणि लोकभाषेत ज्ञानेश्वरीची रचना करुन ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रातील मराठीसह देशभरातील बहुजनांच्या सर्वभाषांचे सामर्थ्य अधोरेखित केले. ज्ञानेश्वरांनी गीता मराठी भाषेत आणल्यानंतर एकूणच भारतातील विविध प्रादेशिक भाषांमध्ये गीतेचे आणि इतर ग्रंथांचे अनुवाद होऊ लागले. ज्ञानेश्वरांच्या लोकभाषेच्या स्वीकाराची ही फलश्रुती होय. कृष्णा मेणसे लिहितात, च्ज्ञानेश्वरानंतरच्या काळात बंगाल, ओरिसा, आसाम, कर्नाटक, आंध्र, केरळ, तामिळनाडू, गुजरात, हिन्दी या प्रादेशिक भाषांतून रामायण, महाभारत इत्यादी ग्रंथांचा अनुवाद करण्यात आला व हा भारताचा सांस्कृतिक ठेवा असलेली महाकाव्ये संस्कृतातून निरनिराळ्या भाषेत प्रथमच आलीछ (श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर : एक चिंतन, पृष्ठ 59, 60) संस्कृत भाषेतील ग्रंथसंपदा भारताच्या निरनिराळ्या प्रदेशातील प्रादेशिक भाषांमध्ये पोचण्याच्या सांस्कृतिक कार्याचा प्रारंभ ज्ञानेश्वरीपासून झाला याचा एक अर्थ असाही आहे की भारतातील विविध भाषांमधील सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाज्या प्रक्रियेशी ज्ञानेश्वरांच्या विद्रोहाचे अनुबंध जुळलेले होते.

मध्ययुगीन कालखंडात संस्कृत भाषेला ज्ञानभाषा मानले गेले, तेव्हाच मराठी सारख्या तमाम बोलीभाषांवर संस्कृत भाषेचे आणि ती ज्ञानभाषा आहे असे मानणाज्यांचे आक्रमण झाले. संस्कृत भाषेचे मराठी सारख्या बोली बोलणाज्या समूहांवरचे आक्रमण ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीनिर्मितीच्या कार्याने परतवून लावले. मराठी भाषेच्या सामर्थ्याची जाणीव, ती अभिव्यक्तीक्षम असण्याची जाणीव आणि ही भाषा काव्य, तत्त्वज्ञान, शास्त्र कथन करण्याची क्षमता असणारी आहे, ही जाणीव तमाम मराठी भाषकांना करुन देण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी निर्मितीच्या माध्यमातून केले. ज्ञानेश्वरांच्या विद्रोहाचे स्वरुप असे होते.

लोकभाषेत साहित्यनिर्मिती करुन अथवा तत्त्वज्ञान कथन करुन संतांनी एकप्रकारे विद्रोहच केला होता. संस्कृत भाषेला नकार देत लोकभाषेच्या स्वीकाराची विद्रोही परंपरा भारतात आहे. ज्ञानेश्वरांचा विद्रोह या परंपरेतील एक आहे. महात्मा बुद्धाने पालीभाषेत तर महावीराने अर्धमागधी भाषेत आपले तत्त्वज्ञान सांगितले. चक्रधरांनी मराठी भाषेत आपले विचार कथन केले. ज्ञानेश्वरांनी मराठीत ग्रंथनिर्मिती करुन तत्त्वज्ञान व काव्य बोलीभाषेतून सांगता येते, हे सिद्ध केले. बसवेश्वरांनी आपले विचार व

Scanned with CamScanner

तत्वज्ञान कन्नड मधून मांडले. आंध्रातील वीरशैवांनी तेलुगु भाषेत तर तामिळनाडूतील वीरशैवानी तामीळ भाषेत आपली वचने सांगितली. कबीराने प्रादेशिक हिन्दीतून विचार मांडले तर गुरुनानकांनी पंजाबी भाषेतून विचार मांडले. याचा सरळ अर्थ असा आहे की मध्ययुगीन भारतातील संतांनी लोकभाषेचा कैवार, स्वीकार, प्रचार करीत नवे तत्वज्ञान, नवे विचार मांडले. संतांचे हे कार्य म्हणजे प्रस्तापितांविरुद्धचा विद्रोहच होता.

मध्ययुगीन भारतात पुरोहित वर्गाचे वर्चस्व होते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात राजरोसपणे बहुजनांचे व शूद्रांचे शोषण सुरु होते, अन्यायाने परिसीमा गाठली होती. अशा परिस्थितीत वेद आणि देव यांच्या अनिर्बंध सत्तेला नकार देणे म्हणजे विद्रोहच होता. समता, बंधुता, सामुदायिक सदाचार या प्रकाशमूल्यांची ज्योत समाजमनात चेतविण्याचे कार्य म्हणजे विद्रोहच होता. मध्ययुगीन भारतातील संतांनी स्पृश्यास्पृश्य, भेदाभेद, यज्ञबळी, विविध देवीदेवतांच्या पूजा, वेदप्रामाण्य, स्त्रियांना शूद्र म्हणून देण्यात येणारी वागणूक, पुनर्विवाहास प्रतिबंध, अंधश्रद्धा अशा कितीतरी बाबींना प्रत्यक्षा-प्रत्यक्ष विरोध केला. बसवेश्वरांचे कार्य यासंदर्भात लक्षणीय आहे. कृष्णा मेणसे लिहितात, च्बसवेश्वरांना नेमके काय सांगायचे होते ? त्यांना सांगायचे होते की परंपरेने जन्मावरुन ठरविण्यात आलेल्या जाती आणि वर्ण हे सारे खोटे आहे. म्हणून माणसामाणसांत स्पृश्य-अस्पृश्य असा कोणताही भेदाभेद करु नये. स्त्री-पुरुषांना समान वागणूक मिळावी, विधवांना सन्मानाने वागवावे आणि त्यांना पुनर्विवाह करण्यास संधी द्यावी, सती जाण्याची अमानुष प्रथा बंद करावी, बालविवाह करण्यास त्यांचा पूर्ण विरोध होता. परोपजीवी असे कोणी राहू नये, प्रत्येकाने कष्ट करुन आपली उपजीविका करावी, आपल्या कुटुंब पोषणासाठी आवश्यक असणारे धन ठेवून घेऊन उरलेले सर्व धन समाजासाठी खर्च करावे. इष्ट लिंगाची पूजा करावी, अन्य देवदेवतांची पूजा करु नये. देवळे सुद्धा बांधू नयेत. अंधश्रद्धा बसवेश्वरांना मुळीच मान्य नव्हत्या. चमत्कारांवर त्यांचा विश्वास नव्हता. जुन्या धर्मग्रंथातले ज्ञान तेवढेच सत्य आणि अंतिम सत्य आहे हे त्यांना मुळीच मान्य नव्हते, जुन्या सनातन ब्राह्मणवादाच्या विरोधात बसवेश्वर बंड करुन उभे राहिले होते. माणसामाणसांत समता असावी असे प्रतिपादन करणे जर पाप असेल तर पुण्य कोणते ? अशी बसवेश्वरांची रोखठोक विचारसरणी होती. मूर्ती आणि मंदिरेही बसवेश्वरांना मान्य नव्हती. पुराहितांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देवदेवतांची आणि देवळांची

Scanned with CamScanner

उभारणी केली आहे असे त्यांचे परखड मत होते. लिंगायत धर्मात बसवेश्वरांनी शाकाहाराचा पुरस्कार केला आहे. त्यांनी ब्रह्मचर्याचे स्तोम गाजविले नाही. धर्म प्रसारकाने लग्न करावे असा त्यांचा आदेश होता........ धार्मिक आणि सामाजिक सुधारणा हे बसवेश्वरांचे मुख्य कार्य होते. त्यांनी वीरशैव लिंगायत धर्माची स्थापना करुन कार्याचा शुभारंभ केला.छ (श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर : एक चिंतन, पृष्ठ 05 व 06) बसवेश्वरांच्या विद्रोहाचे स्वरुप जरा वेगळे होते. प्रस्तापित व्यवस्था जोपर्यंत मोडीत काढल्या जात नाही तोपर्यंत नवा विचार जनमानसात रुजत नाही. बसवेश्वरांनी प्रस्तापित व्यवस्थेला सामुदायिक सदाचार व समताधिष्ठित अशा नव्या व्यवस्थेचा पर्याय दिला. अमानुष परंपरांना नकार देत नवी समताधिष्ठित विचारप्रणाली समाजमनात रुजविण्याचा बसवेश्वरांचा प्रयत्न म्हणजे विद्रोहच होता. असाच काहीसा पण स्वरुप वेगळे असलेला प्रयत्न चक्रधरांनीही केलेला आहे. वेद प्रामाण्यतेला आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेला नाकारुन चक्रधरांनी भक्तीच्या क्षेत्रात समताधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वेद आणि ईश्वराबाबतची पारंपरिक विचारसरणी नाकारुन नवे तत्त्वज्ञान व ईश्वराविषयीची नवी मांडणी करणारे चक्रधर मध्ययुगीन भारतातले एक विद्रोही संतच होते.

गुरुनानकांनी शिखधर्म स्थापन केला. पारंपारिक व्यवस्थेला नवा पर्याय देण्याचा प्रयत्न केला. घ्गुरुग्रंथसाहेबङ या शिख धर्माच्या ग्रंथामध्ये दहा गुरुंनी लिहिलेली वचने आहेत. त्यात संत नामदेव, संत शेख फरिद, संत रविदास यांच्या अभंगांचा-वचनांचा समावेश आहे. व्यवस्थेला पर्याय देणे, जुनी व्यवस्था नाकारणे म्हणजे एक प्रकारचा विद्रोह होय. गुरुनानकांनी भारतभर भ्रमण करीत एकेश्वरवादाचा पुरस्कार करणारा नवा धर्म स्थापन करुन विद्रोहच केला आहे.

गौतमबुद्ध आणि महावीरांपासून प्रेरणा घेऊन बसवेश्वर, चक्रधर, गुरुनानक या भारतीय संतांनी नवी समताधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ह्या संतांचे प्रयत्न म्हणजे विद्रोहच होय.

चक्रधर, बसवेश्वर, गुरुनानक, नामदेव, कबीर, तुकाराम वगैरे संत मंडळीनी पारंपरिक वैदिक विचारांच्या विरोधात विचार व्यक्त केले आहेत. वेद, देवदेवता, जातिभेद, स्पृश्यास्पृश्यभेद या साज्यांना नकार देत माणुसकीचे तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न या संतांनी केला. नामदेवाने दगडाच्या देवाला नकार देत देव मनात असल्याचे

Scanned with CamScanner

प्रतिपादन केले आहे.

छ्दगडाची मूर्तिमानिला ईश्वर ।

परि तो साचार देव भिन्न । ।छ

नामदेवांचे हे शब्द धर्म सुधारणा, नवजागृती करणारे आणि ईश्वराच्या संदर्भातील पारंपरिक विचारांना विरोध दर्शविणारे आहेत. ईश्वर प्रार्थनागृहात, मूर्तीत नसून माणसांच्या मनात आहे, हे सांगणे म्हणजे वैदिक परंपरेविरुद्ध, रुढीविरुद्ध बंडखोरीच होती.

मध्ययुगीन भारतातील संतांनी ईश्वराच्या अस्तित्वाची चिकित्सा करीत ईश्वरविषयक नवा विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. चक्रधर देवाच्या संदर्भात वेगळे तत्वज्ञान सांगतात. तत्पूर्वी नाथसंप्रदाय ईश्वर एकच असल्याचे सांगतो. बसवेश्वर ईश्वर दगडात नाही, मंदिरात नाही तर मनात आहे, असे सांगतात.

बसवेश्वरांचे हे शब्द ईश्वराच्या पारंपरिक विचारांना नकार देणार आहेत. घ्देव संकल्पनेच्या मुर्ख आणि भ्रामक संकल्पनेचे ओझे घेऊन फिरणारा माणूस म्हणजे गाढवच होय अशा शब्दात संत वेमना ईश्वराचे दगडातले अस्तित्व नाकारतो. देव माणसातच असतो. किंबहुना माणसालाच देव होता येते. संत तुकारामाने घ्माझे लेखी देव मेलाङ अशी घोषणा करुन ईश्वराविषयी वेगळे विचार कथन केले. च्जे का रंजले गांजले। त्यासि म्हणजे जो आपुलें।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा। ।छ या सुबोध शब्दात तुकाराम माणसाला कसा देव होता येते ते कथन करतात. अवतारकल्पना आणि मूर्तिपूजेला कबीर देखील विरोध करतात आणि देव माणसांच्या मनात असल्याचे नमूद करतात. माणसांच्या मनात ईश्वर आहे, तो दगडात, तीर्थात नाही. देवळात, मशिदीत, कर्मकांडात, स्वर्गात, योगात, वैराग्यात, नवसात या आणि अशा कशात ही ईश्वर नाही, ईश्वर माणसांच्या मनातच आहे.

मध्ययुगीन भारतातल्या विविध प्रातांतल्या अनेक संतांनी ईश्वराविषयीचे वेगवेगळे चिंतन केलेले आढळते. हे चिंतन ईश्वरासंदर्भातील पारंपरिक विचारधारेला विरोध करीत पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे आहे. स्त्री पुरुषांना समान संधी आणि समान प्रतिष्ठा या दोन्ही बाबी मध्ययुगीन भारतात आढळत नाहीत. स्त्री पुरुष समान आहेत आणि सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रांसह भक्तीच्या क्षेत्रातही स्त्रीला पुरुशाएवढीच प्रतिष्ठा दिली पाहिजे आणि समान संधीही दिली पाहिजे हा विचार मध्ययुगीन संतांनी

Scanned with CamScanner

मांडला आणि कृतीतून सिद्धही करून दाखविला. चक्रधर, बसवेश्वर, नामदेव, तुकाराम या संतांच्या रचनांतून आणि कृतीतूनही स्त्री पुरुष समानतेचा विचार व्यक्त झाला आहे.

मध्ययुगीन भारतातील स्त्री संतांनी देखील समानतेसाठी आणि मुक्तीसाठी बंडखोरीचे विचार मांडणारी कविता लिहिल्याचे आढळते. काही संत स्त्रिया मुक्तीचा विचार अप्रत्यक्षपणे मांडणाऱ्या आहेत. कारइक्कल अम्मइयार, अक्क महादेवी, लल्लेश्वरी, चंद्रावती, मीरा, महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, सोयराबाई, निर्मळा या आणि अशा किती तरी स्त्रिया मध्ययुगीन भारतात रचना करतात, पुरुषाच्या बरोबरीने भक्तीचा हक्क बजावतात. बहिणाबाई सारखी एखादी स्त्री वैदिक परंपरेच्या विरोधात उभीच राहाते. स्त्रियांच्या विद्रोहाचे स्वरुप जरा संयत आहे, हे खरे असले तरी मध्ययुगीन भारतातील सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर या विद्रोहाचे महत्त्व फार मोठे आहे.

मध्ययुगीन भारतातील संतांचे भाषिक आदान प्रदानाचे कार्यही फार महत्त्वाचे आहे. तेराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत भारतात भाषिक आदान प्रदानाच्या सांस्कृतिक प्रक्रियेतून संतांनी भाषिक स्वातंत्र्य, भाषिक समता आणि भाषिक बंधुता निर्माण करण्याचे प्रयत्न केले. घ्लीळाचरित्रङ, घ्ज्ञानेश्वरीङ या सारख्या ग्रंथांमध्ये कानडी भाषेतील शब्द आहेत. घ्गोरखवाणीङ मध्ये मराठी बोलीतील शब्द आहेत. गोरक्षनाथांच्या आणि इतर नाथपंथीयांच्या बैरागी हिंदी भाषेचा संस्कार चक्रधर नामदेवांपासून तुकारामांपर्यंत अनेक संतांच्या भाषेवर आहे, एवढेच नाही तर हा प्रभाव नानक, कबीर यांच्याही भाषेवर आढळतो. संत नरसी मेहता यांच्या गुजराती भाषेतील रचनांमध्ये मराठी शब्द आहेत. नरसी मेहतांच्या भाषेवर नामदेवांचा संस्कार आढळतो. पुढे नरसी मेहतांवर तुकारामांनी आख्यान रचलेले आहे. तुकारामांच्या दोह्यांच्या भाषेचे अनुबंध गोरखनाथ, नामदेव, नानक, कबीर यांच्या भाषांशी जुळलेले आहे. मध्ययुगीन भारतातील संतकवींचे भाषाभान प्रगल्भ होते. गुजरात मधील संत प्राणनाथ यांना गुजरातीसह, हिन्दी, सिंधी, संस्कृत, अरबी, फारसी भाषा अवगत होत्या, तामीळ संत कंबन कन्नड, संस्कृत, तेलुगु भाषांमधील शब्दांचा वापर करतात. केरळचे संतकवी पूंतानम् यांनी कलीकत राजदरबारात मल्याळम् बोली भाषेत काव्यगायन केले. मणि प्रवाळी शैली म्हणजे संस्कृत व मल्याळम् शब्दांनी युक्त अशी भाषा पूंतानम् वापरतात. पालकुर्ली सोमनाथ या तेलुगु संतकवीने आपल्या

Scanned with CamScanner

तेलुगु काव्यात मराठी ओळींची जाणीवपूर्वक निर्मिती केली. शहा मुंतोजी ब्रह्मणी, हुसेन अंबरखान, अलमखान, शेख महंमद, शहा मुनी या आणि इतर अनेक मुसलमान संतकवींनी मराठी भाषेतून रचना केली. वीरशैव संतांनी तेलुगु, मराठी व कन्नड भाषेत विचार मांडले, घ्गुरुग्रंथसाहेबङ मध्ये नामदेव, शेख फरिद, रविदास यांचे अभंग आहेत. अशी अनेक उदाहरणे मध्ययुगीन भारतातील भाषिक आदानप्रदानाची निरोगी प्रक्रिया दर्शविणारी आहेत. आपल्या भाषेसह इतर भाषांनाही सन्मान देणे, भाषिक आदानप्रदानातून राष्ट्रीय ऐक्य आणि प्रगतिशील विचार साधण्याचा प्रयत्न करणे, बहुभाषिक संज्ञापन व्यवहारातून भिन्न भिन्न भाषिक मानवी समाजामधील सीमारेषा पुसण्याचा प्रयत्न करणे, हे संतांचे कार्य म्हणजे मध्ययुगातील विद्रोहच होय.

मध्ययुगीन भारतातील संतांनी लोकभाषेचा स्वीकार, प्रचारासह अन्य भागातील लोकभाषांचाही अंगीकार करण्याचा प्रयत्न केला. वेद, देव, धर्म, जात यांना नकार देत नवा विचार, नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्त्री पुरुष समानतेचा विचार रुजविण्याचा प्रयत्न केला आणि सामुदायिक सदाचाराची, समतेची, बंधुतेची, नवी विचारसरणी रुजविण्याचा प्रयत्न केला. संतांचे हे कार्य म्हणजे त्यांनी केलेला विद्रोहच होय. संतांच्या विद्रोहाने भारतीय समाज मनावर जातिपंथनिरपेक्ष असा बंधुभाव परस्परांत निर्माण करण्याचा अमीट संस्कार दिला. संतांच्या विद्रोहाने सामुदायीक सदाचाराची आणि नीतिमत्तेची शिकवण दिली. संत कालातीत, धर्मातीत आहेत, संतसाहित्य समकालीन वर्तमानाला जातिधर्मनिरपेक्ष अशा बंधुभावाचा, सामुदायिक सदाचाराचा, मानुषतेचा, नीतिमत्तेचा संस्कार देतच आहे, आणि हा संस्काराचा ठेवा न संपणारा आहे.

**संदर्भ :** मेणसे कृष्णा श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेश्वर : एक चिंतन, लोकवाङ्मयगृह, मुंबई दुसरी आवृत्ती 1999.

भवाळकर तारा स्त्री मुक्तीचा आत्मस्वर लोकवाङ्मयगृह, मुंबई दुसरी आवृत्ती 2012.

सबनीस श्रीपाल संत साहित्यातील सेक्युलॅरिझम दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे 2002.

ज्हाडे सदा घ्काव्यचिंतनङ शलाका प्रकाशन, मुंबई 1997.

ढेरे रा.चिं. घ्एकात्मतेचे शिल्पकारङ मंजुल प्रकाशन, पुणे 1994.

डहाके वसंत आबाजी घ्कवितेविषयीङ स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद 1999.

Scanned with CamScanner

ICSSR

स्थापना - १९७०

आज़ादी का अमृत महोत्सव

Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's

# Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur

## Department of History

**Organizes**

**On the occasion of 75 years of Hyderabad Freedom Struggle Movement**

**Indian Council of Social Science Research, New Delhi**

**Sponsored**

**Two Day National Level Seminar on**

# The Contribution of Marathwada in Hyderabad Freedom Struggle Movement

**Editor**

**Dr. Mahadev Gavhane**

**Principal**

Scanned with CamScanner

**"The Contribution of Marathwada in Hyderabad Freedom Struggle Movement"**

**Editor - Principal Dr. Mahadev Gavhane**

---

**ISBN 978-93-91689-45-2**

---

**अरुणा प्रकाशन**

१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,

खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर

मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

---

© सर्व हक्क लेखकाधिन

---

: प्रथम आवृत्ती :- ६ जानेवारी २०२३

: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

: अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

: मुखपृष्ठ : विरभद्र गुळवे

मूल्य : ४००.०० रुपये

---

*"The Contribution of Marathwada in Hyderabad Freedom Struggle Moveme

या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी प्रकाशन, मुद्रक व वि

सहमत असतीलच असे नाही.

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | प्रा. डॉ. विवेक घन:शाम घोबाळे | हैदराबाद मुक्तीसंग्रामातील शैक्षणिक चळवळींचे योगदान | १८६ |
| २७. | प्रा. डॉ. अनंत मरकाळे | सरदार नाईक बावणे यांच्या गढीचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील योगदान | १९२ |
| २८. | प्रा.डॉ. अंभोरे ए.जी. | हैद्राबाद मुक्ती संग्रामात हिंगोली जिल्ह्याचे योगदान | १९७ |
| २९. | प्रो.डॉ.गणेश हरीभाऊ घुगे | हैद्राबाद मुक्तीसंग्रामात सेलु येथील महाराष्ट्र परिषदेचे पाचवे अधिवेशनाचे महत्व (२४ ते २६ मे १९४५) | २०४ |
| ३०. | दिपक प्रभाकर कारंजकर, प्रोफेसर डॉ. किशोरकुमार गव्हाणे | हैदराबाद मुक्तीसंग्रामातील शैक्षणिक चळवळी | २०९ |
| ३१. | बनसोडे प्रदीप बालासाहेब, प्रा.डॉ.नितीन बावळे | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्त्रियांचे योगदान | २१२ |
| ३२. | डॉ.प्रो.दिलीप बिराजदार, भाऊराव महादेव देवकते | हैदराबाद मुक्तिसंग्रामातील भाई उद्धवराव पाटील यांची भूमिका | २१६ |
| ३३. | श्री.अनाप एस. ए., प्रोफेसर, डॉ, किशोरकुमार गव्हाणे | हैदराबाद संस्थान भारतीय संघरात विलिनीकरण संदर्भात सरदार पटेल यांचे योगदान | २२० |
| ३४. | पांचाळ दत्तात्रय अंबादास | ॲड. शेषराव वाघमारे यांचे आर्य समाजाच्या चळवळीतील योगदान | २२६ |
| ३५. | डॉ. किशोरकुमार गव्हाणे, प्रशांत शिंदे | शस्त्रास्त्रपुरवठा : जनता रेडिओ केंद्र | २३१ |
| ३६. | सरस्वती निवृत्ती सोनाळे | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील प्रमुख महिलाचे योगदान | २४६ |
| ३७. | प्रोफेसर डॉ.किशोरकुमार गव्हाणे जालिंदर दिनकर ठवरे | हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील दलित जनतेचा सहभाग | २५३ |


Scanned with CamScanner

ISBN 978-93-91689-45-2

२७.

# सरदार नाईक बावणे यांच्या गढीचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील योगदान

**प्रा. डॉ. अनंत मरकाळे**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई
मो. नं. ९६२३७३९८३७

'मराठवाडा मुक्तीलढा' हा मराठवाड्यातील जनतेच्या शौर्याची 'गौरवगाथा' आहे. तमाम मराठवाड्यातील जनतेच्या साहसी पराक्रमाने लढलेला हा लढा जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद घ्यावा असाच आहे. हा लढा लढला गेला. म्हणूनच निजामशाहीच्या गुलामगीरीतून हैदराबाद संस्थान मुक्त झाले आणि आजचा हा अखंड हिंदुस्थान अस्तित्वात आला. या मराठवाडा मुक्ती संग्रामातील जनतेच्या शौर्याच्या अनेक सुरस कथा आजही गावागावातून ऐकावयास मिळतात. अशाचप्रकारची शौर्य गाथा आपल्याला लातूर जिल्ह्यातील तांदुळजा गावात ऐकायला मिळते.

इतिहासात तांदुळजा येथील सरदार नाईकबावणे यांची गढी प्रसिद्ध आहे. मराठवाड्यावर आलेली अनेक संकटे या गढीने झेलली आहेत. मराठ्यांच्या इतिहासात प्रसिध्द असलेली मराठे व निझामचा याच्यात इ. स. १७६० साली झालेली उदगीरची लढाई प्रत्यक्षात तांदुळजाच्या शिवारातच लढल्या गेली होती. या लढाईत निझामचा पराभव झाला होता. यानंतर झालेल्या तहाच्या वाटाघाटी सरदार नाईक बावणे यांच्या गाडीतच झाल्या होत्या. या तहानुसार निझामाने गोदावरी, तुंगभुद्रा आणि सीना या नद्याच्यामध्ये येणारा मराठी बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश मराठवाडा मराठ्यांना दिला. यानंतर या प्रदेशास मराठी भाषिकांचा वाडा म्हणून 'मराठवाडा' असे नाव पडले. अशाप्रकारे मराठवाड्याचा जन्म ज्या गढीत झाला तीच सरदार नाईक बावणे यांची इतिहास प्रसिद्ध तांदुळजा येथील गढी होय.[१]

तांदुळजाच्या या गढीच्या माध्यमातून सरदार नाईक बावणे यांनी



Scanned with CamScanner

निजामशाहीच्या स्थापाने पासूनच निजामशाही प्रदेशात राहून निजामशहाला निकराचा लढा दिला. ज्यावेळी अनेक मराठा सरदार केवळ वतनासाठी जुलमी निजामाची हुजुरी करीत होते. त्यावेळी सरदार नाईक बावणे हे मात्र नेहमीसाठी छत्रपतींशी एकनिष्ठ राहिले. म्हणूनच छत्रपतींनी निजामशाही प्रदेशातील बफर स्टेट म्हणून महत्वाची असलेली तांदुळजा व गिरवली येथील जहागीर आपले विश्वसनीय सरदार नाईक बावणे यांना दिली असावी. यावरून निजामशाही प्रदेशात स्थित सरदार नाईक बावणे यांच्या अनेक पिढ्यांनी मराठवाड्याला निजामशाही पासून मुक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

ज्यावेळी भारतीय राष्ट्रीय चळवळ देशव्यापी स्वरूप धारण करत होती. त्याचवेळी हैदराबाद संस्थानातील जनता निजाम राजवटी विरोधात स्वतंत्र्य प्राप्तीसाठी विविध संघटना, चाळवळी, मोर्चे, उठाव व सत्याग्रह यांच्या माध्यमातून निजाम राजवटीस जमेल त्या मार्गाने प्रखर विरोध करीत होते. त्यामध्ये तांदुळजा येथील सरदार नाईक बावणे व त्यांचे सहकारी मागे कसे राहणार. सरदार नाईक बावणे तसेच तांदुळजा व परिसरातील त्यांच्या सहकार्यांमध्ये शौर्य व राष्ट्रप्रेम अनुवंशीकपनाणे सहज चालत आले आहे. इतिहास पाहता तांदूळज्यातील अठरा पगळ जातीतील लोकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याच्या कार्यात नेहमीच आपले योगदान दिले आहे. त्याचाच परिणाम म्हणून सरदार नाईक बावणे यांच्या नेतृत्वात तांदुळजाच्या गढीच्या आश्रयाने मराठवाड्याच्या स्वतंत्र्य प्राप्तीसाठी आंदोलन करण्यात आले. १५ ऑगस्ट १९१४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर कासीम रझवी याच्या रझाकार संघटनेचे कार्य लातूर परिसरामध्ये शिखरावर पोहोंचले होते. तसेच रझाकार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी परिसरातील हिंदू प्रजाजनांनवर खुप अन्याय अत्याचार सुरू केले होते. तांदुळजा येथील सरदार नाईक बावणे यांच्या गढ़ीवर सुध्दा राझाकारांचे सतत लक्ष असे. कारण या काळात किल्ले आणि गड्या हेच क्रांतीकारकांची आश्रयस्थाने होती. या गढ़ीमध्ये आपल्याला शस्त्रसाठा, दारूगोळा उपलब्ध होईल या हेतूने या गावावर रझाकारांची नेहमी वक्र दृष्टी होती. हा शस्त्रसाठा मिळवण्यासाठी रझाकारांचे या गढीवर अनेकदा हल्ले पण झाले, ते सर्व हल्ले तांदुळज्याच्या जनतेने शौर्याने व धैर्याने परतून लावले. परंतु रझाकाराचा त्रास दिवसेंदिवस वाढतच राहिला. लातूर रझाकार संघटनेचे मुख्य केंद्र होते. त्यामुळे तांदुळज्या सारख्या छोट्या गावात स्वतंत्र आंदोलनाचे कार्य करणे खूप कठीण काम होते. तरी स्वातंत्र्य सेनानी आण्णासाहेब बावणे यांनी कळंब तालुक्यातील ईट येथील संभाजीराव देशमुख यांच्या सहकार्याने



Scanned with CamScanner

रझाकारांशी संघर्ष सुरु केला. याचवेळी रझाकारांनी संभाजीराव देशमुख यांचे घरदार, धनधान्य लुटून नेले होते. तसेच ईट गावातील रघुनाथ किसन टेके यांचे आई व वडील यांचा रझाकारांनी गोळ्या घालून खून केला होता. या घटनेमुळे श्री. टेके रझाकारांच्या विरोधात प्रखरपणे कार्य करत होते. आण्णासाहेब बावणे यांनी श्री. टेके यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचोली कॅम्पमध्ये आश्रय घेवून स्वातंत्र्यसंग्रामाच्या कार्यास सुरुवात केली. कॅम्पमध्ये ठरल्याप्रमाणे सरकारीधान्य गोदामे, करोडगीरी नाके इ. लुटण्याचा कार्यक्रम हाती घेतला. अशाचप्रकारची मोहिम त्यांना तांदुळजा परिसरामध्ये घडवून आणायची होती. त्यासाठी शस्त्रास्त्राची आवश्यकता होती. म्हणून त्यांनी ते शस्त्रास्त्रे मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार श्री टेके यानी श्री. अण्णासाहेब यांना काही हातबॉम्ब दिले. ते हातबॉम्ब घेऊन अण्णासाहेब येडसी वरून लातूरला रेल्वेने जाण्यासाठी निघाले. लातूर रेल्वे स्टेशनवर आल्यानंतर अण्णासाहेबांची हालचाल संशयास्पद वाटल्यामुळे पोलिसांनी त्यांना अटक करून लातूर स्टेशनमध्ये बंद केले. पण अण्णासाहेबांनी शिताफीने आपल्या जवळ असलेली बॉम्बची पिशवी ह्या खाण्याच्या दशम्या आहेत, असे पोलिसांना सांगून आपला सहप्रवासी बन्सीलाल जैन याच्याजवळ पिशवी देऊन त्याला तिथून पुढे पाठून दिले. त्याचवेळी तांदुळजाचा रहिवाशी असलेला बाबु पठाण हा राझाकाराचा कार्यकर्ता तेथे आला. त्याने अण्णासाहेबांना पाहिल्यानंतर त्याच्या ओळखीने अण्णासाहेबाची सुटका झाली. काही काळ भितीग्रस्त अवस्थेमध्ये काढून अण्णासाहेब तांदुळजाला परत आले.२

इ. स. १९४८ मध्ये तांदुळजा, सारसा व देवळा या गावच्या लोकांवर रझाकारांनी अत्याचार सुरु केला. तेव्हा तांदुळजाच्या सरदार नाईक बावणे यांच्या गढीतून लोकांनी रझाकारांशी अनेक वेळा लढा दिला. तांदुळजाची गढी लढवून लोकांना संरक्षण देणारे प्रमुख व्यक्ती जगजीवन उर्फ युवराव नाईक बावणे, बापूराव बंडेराव शिंदे वगैरे मंडळी होती. याच शूरवीरांनी ४० रझाकारी पठाणांना मांजरा नदीत जलसमाधी दिली. बन्सीलाल मारवाडी व याच्या मुलाचा वध करून त्यांच्या घरातील सोने, नाणे लूट घेवून पठाण पानगावला निघाले होते. त्याचवेळी मांजरा नदीला पूर आलेला होता. मांजरा नदी कशी पार करायची हा प्रश्न त्यांना पडला होता. पुरामुळे त्यावेळी लोक काढाईतून नदीवरून जाणे येणे करीत असत. त्यावेळी नदीकिनारी फक्त दोन काढाई होत्या. त्यामुळे ४० पठाण व त्यांचे सोने नाणे व त्यांची शस्त्रास्त्रे या दोन काढाईतून जाणार नव्हते. त्यावेळी तांदुळजा, नायगांव, सारसा व देवळा या गावच्या लोकांनी पठाणांना एक योजना सांगितली कि, एका काढाईत सर्व हत्यारे व लुटीचा

माल ठेवायचा व दुसऱ्या काढाईतून दहा दहा पठाणांनी नदीपार करायची. त्याप्रमाणे सर्व हत्यारे एका काढाईत टाकून दुसऱ्या काढाईतून पठाण पूर आलेल्या मांजरा नदीतून निघाले. ही संधी साधून लोकांनी निःशस्त्र झालेल्या पठाणांनवर हल्ला केला. आणि त्यांच्याच लुंगीने एकेकाचे हात पाय घट्ट आवळून सर्व पठाणांना मांजरा नदीत फेकून दिले.[३] अशाप्रकारे कोणत्याही हत्याराशिवाय या देशभक्तांनी गनिमी काव्याने पठाणांनचा प्रतिकार केला.

अशातच भारतीय फौजा हैद्राबाद राज्य मुक्त करण्यासाठी येत आहेत, अशा बातम्या कानावर येऊ लागल्या. असे सैन्य आले तर त्यामध्ये आपणही सामील व्हावे, या दृष्टीने अण्णासाहेब यांनी तांदुळजा येथे तरुणांची संघटना निर्माण केली होती. तसेच भारतीय फौजा हैद्राबाद राज्याच्या सरहद्दीवर आल्याची बातमी मिळाली. त्यामुळे रझाकाराचे व मुसलमानी जनतेचे लोंढेच्या लोंढे सायगांव व मोमिनाबाद (अंबाजोगाई) येथे जाण्यास सुरुवात झाली. पळून जाण्यापेक्षा तांदुळजा येथील मजबूत अशी गढी ताब्यात घेवून, तेथूनच भारतीय सैन्याशी मुकाबला करावा अशी एक योजना रझाकारांनी आखली. ही बातमी तांदुळजाला समजताच परिसरातील पिंपळगाव, भोसे, मुरूड, गादवड या गावातील सर्व तरुण तरुण मंडळी तांदूळजा येथे एकत्र आली. याचवेळी अंबाजोगाईला पळून जात असलेले रझाकार लूटमार करीत आहेत अशी बातमी मिळाली. स्वातंत्र्यसेनानी अण्णासाहेब बावणे यांच्या नेतृत्वात तांदूळजाला जमा झालेली सर्व तरूण मंडळी राझाकारांचा पाठलाग करीत राडी येथे पोहचली. या देशभक्त तरुणांनी बंदुका, तलवारी तसेच हाती पडेल ती हत्यारी घेवून, रजाकाराच्या टोळीचा मुकाबला झाला, ज्यामध्ये तांदूळजाच्या गढीवर उपलब्ध असलेल्या तोफेचा पण उपयोग झाला.[४] रझाकार जीव वाचवण्याकरीता सैरावैरा पळून गेले. अशाप्रकारे तांदूळज्याच्या या तरुण देशभक्त विरांचा येथे विजय झाला. हा विजय प्राप्त झाल्याच्या आनंदात रस्त्यात असलेल्या गावातील जनतेने दुध व चहापाणी देऊन त्या शुर विरांचा सत्कार केला. हे सर्वजण विजयानंदामध्ये तांदुळजा येथे पोहोचले असतांनाच जवळ असलेल्या रांजणी या गावात १०० ते १५० रझाकार परत तांदुळज्याच्या गढीचा कब्जा घेण्याच्या हेतुने जमले आहेत. अशी बातमी तांदुळजा येथे जमलेल्या या तरूण मंडळीस समजली. अण्णासाहेब यांच्या नेतृत्वाखालील ही सर्व मंडळी रझाकारांना पकडण्याकरीता रांजणी या गावी गेले. हि घटना घडत असतांनाच हैद्राबादचा निझाम सरदार वल्लभभाई पटेल यांना शरण आला आहे. तसेच हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले आहे. असे घोषीत

ISBN 978-93-91689-45-2

करण्यात आले. ही बातमी मिळताच दिनांक १७ सप्टेंबर १९४८ रोजी तांदुळजाच्या गढीवर भारताचा राष्ट्रीय ध्वज फडकवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या सर्व कर्तबगारीची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र सेनानी अण्णासाहेब नाईक बावणे यांना २५.११.१९९२ रोजी स्वातंत्र्यसैनिकाचे प्रमाणपत्र देवून स्वतंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा गौरव केला आहे.[५]

**संदर्भ सूची :**

१. मुलाखत, श्री माणिकराव बावणे महाराज गिरवली. दि. १५-०९-२०२२
२. बावणे जानोजीराव, मौजे तांदुळजा एक ऐतिहासिक आढावा, इतिहास संशोधन पत्रिका खंड-८ पृ. क्र. १५६.
३. मुलाखत, श्री आणेराव रमाकांत शंकरराव निवृत्त शिक्षक तांदुळजा. दि. ८-०९-२०२२
४. मुलाखत, श्री बाबासाहेब बावणे महाराज तांदुळजा. दि. १-०९-२०२२
५. स्वतंत्र सेनानी अण्णासाहेब नाईक बावणे यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून मिळालेले प्रमाणपत्र.

◈ ◈ ◈



Scanned with CamScanner

# ABOUT EDITORS



## CHIEF EDITOR

**Dr. Shivdas Shirsath**
Principal,
Yashwantrao Chavan College Ambajogai
Maharashtra.

Dr. Shivdas Shirasath is working as the Principal of Yashwantrao Chavan College Ambajogai and has a long experience of 25 years in the field of education. Dr. Shivdas Shirasath is the Research Guide of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad and he is also working as SENET Member' and 'Reservation Cell Advisory Member' of the Aurangabad University. 03 of his Research Projects have been completed and Four Research Students have received Ph.D. degrees under his guidance. He has published 23 Research Papers at National and International level and is the author of 08 Books.



## EXECUTIVE EDITOR

**Dr. Indrajeet Ramdas Bhagat**
HoD and Associate Professor
Department of Commerce
Yashwantrao Chavan College Ambajogai
Maharashtra


Dr. Indrajeet Ramdas Bhagat is working as Head of Department of Commerce and Associate Professor at Yashwantrao Chavan College Ambajogai Maharashtra. He has fifteen years of rich teaching experience at UG and PG level. He is a recognized Research Guide for Commerce at Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad and he is also working as a research guide for M.Com students in relation to professional and academic projects. He is the author of Six reference books on commerce. He has worked as an editor in more than 11 National and International journals. He has published Six Chapter Edited Books under the name "Anora". He has worked as a member in the Board of Studies of Rajarshi Shahu College, Latur (Autonomous) and has also served as a paper setter and moderator at New Arts Commerce Science College, Ahmednagar (Autonomous).

Dr. Indrajeet Bhagat has published many articles in national, international and state level magazines and newspapers and as a leading person in the field of research he has received a research patent under the South African Patent Act. He has read more than 70 research papers in various seminars and conferences and has given many lectures on the subject of commerce. Along with this, he has been working as 'National Service Scheme' Program Officer for the last four years.

9 789392 313684
MRP : ₹600

TARAN PUBLICATION
www.taranpublication.com | Email: taran.publication@gmail.com

Yashwant: Innovative Research in Modern Era.




# YASHWANT

## INNOVATIVE RESEARCH IN MODERN ERA

SIXTH EDITION

# ANORA

**(Aeon of New Organized Research and Academics)**

**6TH Edition**

**Dec 2022**

# YASHWANT

## Innovative Research in Modern ERA

**Chief Editor**

**Dr. Shivdas Shirsath**

**Principal, Yashwantrao Chavan College Ambajogai, Maharashtra**

**Executive Editor**

**Dr. Indrajeet Ramdas Bhagat**

**HoD, Faculty of Commerce Yeshwantrao Chavan College Ambajogai, District - Beed, State -Maharashtra**

**Taran Publication**

**New Delhi**

**ANORA**

**(Aeon of New Organized Research and Academics)**

**6TH EDITION**

**Dec 2022**

**YASHWANT**

**Innovative Research In Modern ERA**

**ISBN : 978-93-92313-68-4**

**Price : 600/-**

**Publisher**

**Taran Publication**

www.taranpublication.com

Email:taran.publication@gmail.com



**CHIEF EDITOR**

**Dr. Shivdas Shirsath**

Principal, Yashwantrao Chavan College Ambajogai, Maharashtra

**EXECUTIVE EDITOR**

**Dr. Indrajeet Ramdas Bhagat**

HoD, Faculty of Commerce
Yeshwantrao Chavan College Ambajogai
District - Beed, State -Maharashtra.

**REVIEW EDITORS**

**Mahejabin Sayyad**
Agasti AC&DRS College, Akole,
Savitribai Phule Pune University, Pune

**Dr. Sandeep Vanjari**
R. B. Attal College, Georai Dist Beed

**Dr. T. Aasif Ahmed**
Mazharul Uloom College, Ambur TN,
Tamil Nadu

**Dr Ghanshyam Vatsa**
GS Ayurveda Medical College &
Hospital Pilkhuwa, Hapur, UP

**Dr.Mohan S..Rode**
People's College Nanded, Maharashtra

**Dr. Suwarna Ranpise**
Faculty of PES College of Education,
Shivajinagaer, Pune

**Dr.Manisha Digambarrao Asore**
Head&Associate professor,
Dr.Babasaheb Ambedkar Marathwada
University Aurangabad sub Campus
Usmanabad

**Dr. Lalit Kumar Dubey**
Acropolis Institute of Management
Studies and Research, Indore

| | | |
|---|---|---|
| **Chapter - 21** | **हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात बाबासाहेब परांजपे यांचे योगदान**<br>*प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे* | **142** |
| **Chapter - 22** | **वारकरी संप्रदायातील मुस्लिम संतकवी**<br>*डॉ. बाबासाहेब जाधव* | **147** |
| **Chapter - 23** | **हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात नारायणआप्पा जुजगर यांचे योगदान**<br>*प्रा. डॉ. रूपेश नानासाहेब देशमुख* | **153** |

ISBN : 978-93-92313-68-4

# CHAPTER - 21

# हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात बाबासाहेब परांजपे यांचे योगदान

**प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे**

**इतिहास विभाग प्रमुख,**

**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई**

हैदराबाद स्वातंत्र्य लढा हा मर्यादित आघाडीवरचा लढा नसून एकाचवेळी अनेक आघाड्यांवरचा व्यापक लढा होता. या लढयाच्या अभ्यासाचे विविध पैलू मराठवाड्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानातून पाहावयास मिळतात. हैदराबाद स्वातंत्र्य लढ्याचे सरसेनापती स्वामी रामानंद तीर्थ यांचा उदय मराठवाड्याच्या मातीतच झाला. हैदराबाद मुक्ति लढयाचे ते शिल्पकार बनले, 'मोडेल पण वाकणार नाही' या बाण्याने त्यांनी हैदराबाद मुक्तिलढ्याचे नेतृत्त्व केले. स्वामीजींपासून प्रेरणा घेऊन 'बीड परिसरातील डोंगरदर्यात  कडेकपारीत स्वातंत्र्यसैनिकांची फौज उभे राहिली. परिणामी, जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणचे लोक स्वातंत्र्य मिळविण्याच्या उर्मीने भारावले आणि निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्धा हळूहळू उभे राहिले.

तसेच येथिल जनता सुद्धा वैयक्तिक सुखाचा विचार न करता, मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या निर्धाराने या लढ्यात सक्रिय राहू लागली.  स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात अनेक महत्त्वाच्या घटनाघडामोडी बीड जिल्ह्याच्या परिसरात घडून आल्या. त्यात परिसरातील अनेक थोर विभूतींनी

शौर्य दाखवलेले आहे. यासंदर्भात त्यांनी केलेला त्याग दाखविलेले धैर्य गाजविलेले शौर्य आणि वेळप्रसंगी पत्करलेले हौतात्म्य उल्लेखनीय आहे.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या श्रेष्ठींच्या आदेशानुसार सत्याग्रहासाठी 'सत्याग्रही' तयार करणे, 'सत्याग्रह कसा करावा, याची मार्गदर्शक सूत्रे सांगणे ही जबाबदारी काशिनाथराव जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर टाकण्यात आली. बीड तालुक्यात रामलिंग स्वामी, पुरुषोत्तमराव चपळगावकर, वामनराव वझे, हिरालालजी कोटेचा, मोतीलालजी मंत्री यांच्या पुढाकाराने स्टेट कॉंग्रेसच्या कार्याला बीड तालुक्यात प्रचंड गती मिळाली. पिंपळनेर, ताडसेना, वडगाव, उमरी, बीड पिंपळगाव, येळमघाट इत्यादी प्रत्येक गावांतून हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या शाखा सुरू करण्यात आल्या. निवृत्ती आप्पा सरवदे, सी. बी. पुराणिक, कान्होबा सुतनासे, माणिकलाल कोटेचा, मदनलाल सारडा, बद्रीनारायण सवाणी, नारायणराव गायकवाड, बुद्धाजी कवाडे, रामचंद्रराव देशपांडे, लक्ष्मणराव पटाईत, बाबुराव जाधव आदी बहुअसंख्य कार्यकर्त्यांनी बीड तालुका पिंजून काढला. परिणामी तालुक्यातील शेतकरी वर्ग स्टेट काँग्रेसच्या झेंड्याखाली संघटित झाला.

हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्य सैनिक म्हणून बाबासाहेब परांजपे यांचे कार्य आजही समाजाला दिशा देणारे आहे. एक थोर विचारवंत, लोकशाही मूल्यांचा पुरस्कर्ता सच्चा समाजसेवक, जहाल क्रांतिकारी आणि विद्यावाचस्पती असे सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व म्हणून बाबासाहेब परांजपे यांना ओळखले जाते. बाबासाहेब परांजपे यांचा जन्म १ जुलै १९०७ ला पुणे येथे कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव परांजपे

ISBN : 978-93-92313-68-4

होते. बाबासाहेब यांचे मुळगाव सोलापूर होते. त्यांचे वडील 'माहोळ' ला स्टेशनमास्तर होते. गोविंदराव परांजपे यांना तीन मुले आणि एक मुलगी असे त्यांचे कुटुंब होते. त्यातले बाबासाहेब हे तिसरे होते. बाबासाहेबांचे शालान्त परीक्षेपर्यंतचे शिक्षण सोलापूरच्या हायस्कूलमध्ये झाले. नंतर त्यांनी इ. स. १९२९ मध्ये पुण्याच्या फर्ग्यूसन कॉलेजातून बी. एस्सी. पूर्ण केले. पुण्याहून बी. एस्सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते हिप्परगा (ता. तुळजापूर) या शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. तेथे त्यांनी ६ वर्षे अध्यापणाचे काम केले. नंतर १९३५ मध्ये ते अंबाजोगाई येथिल योगेश्वरी शाळेत रूजू झाले. बाबासाहेब परांजपे यांनी सभोवतालच्या खेड्यातून दौरे केले. पालकांच्या भेटी घेतल्या त्यांना शिक्षणचे महत्त्व पटवून दिले. बाबासाहेब अत्यंत लोकप्रिय बनले ते त्यांच्या वक्तृत्त्व शैलीमुळे, आदरणीय गोविंदभाईंनी बाबासाहेबांच्या वक्तृत्त्वाबद्दल असे म्हटले की, "त्यांच्या वक्तृत्त्व शैलीमुळे एखाद्याची जीवनशैली बदलून एखादया ध्येयासाठी धुंद होत असे, वैजापूर येथिल सरकारी शाळेत सातव्या इयत्त शिकणारा 'जग्गनाथ भालेराव' हा विद्यार्थी बाबासाहेबांच्या भाषणाने इतका प्रभावित झाला होता की, त्या कोवळया वयात कुणाचेही न ऐकता तो आंदोलनात उतरला आणि हुतात्मा झाला.[१] बाबासाहेब परांजपे यांचे इंग्रजी आणि अन्य भाषांवर देखील प्रभुत्त्व होते. त्याच्या मार्गदर्शनाने अनेक तरुणांनी हैदराबादस्वातंत्र्य लढयात स्वतःला झोकून दिले.

इ.स. १९३८ मध्ये स्टेट कॉग्रेसचा सत्याग्रह सुरू झाला. त्यावेळी बाबासाहेबांनी सत्याग्रही जमवून त्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळेच श्री. एच. आर. गुरुजींच्या नेतृत्त्वाखाली विद्यार्थ्यांची एक तुकडी सत्याग्रह करून तुरुंगात

ISBN : 978-93-92313-68-4

गेली. "हैदराबाद राज्यात सत्याग्रहाची दोन केंद्रे होती. एक हैदराबाद आणि दुसरी औरंगाबाद सारा मराठवाडा औरंगाबाद शासित सत्याग्रहीच्या पुरवठ्याचे क्षेत्र होते. या पुरवठ्याच्या कामात बाबासाहेबांचा फार मोठा वाटा होता.[२] या लढ्यात बाबासाहेबांनी केलेल्या कामामुळे निजाम सरकारचा त्यांच्यावर रोष होता. त्याच कारणामुळे १९४२ मध्ये 'चले जावचा संग्राम सुरू झाल्याबरोबर बाबासाहेबांना निजाम सरकारने चंचल गुड्याच्या तुरुंगात टाकले होते. वर्षभराने त्यांची सुटका झाली. पुढे महाराष्ट्र परिषदेच्या कामाला ते जोराने लागले. पुढे भूमिगत राहूनही त्यांनी कार्य केले. बाबासाहेबांनी निजामी राजवटीविरुद्ध अनेक ठिकाणी अज्ञात स्थळ केंद्रे उभी केली होती. सर्व केंद्रातील प्रत्येक तरुणाला शस्त्रास्त्रांचा सुक्ष्म अभ्यास केला पाहीजे अशी त्यांची धारणा होती. सर्व केंद्रातील प्रत्येक तरुणाला शस्त्राविषयी अगदी लष्कराच्या धर्तीवर पूर्णपणे माहिती ते देत असत. काहीवेळा माहितीची पत्रके तयार करुण पाठविली जात असत. हे काम बाबासाहेब स्वतः करत असत.

कृती समितीने सशस्त्र लढ्याचा समन्वय आणि यशस्वीतेसाठी तिन्ही प्रांतांसाठी तीन प्रमुख नेमले होते. मराठवाड्यासाठी बाबासाहेबांची नेमणूक झाली होती. पुणे, सोलापूर, मुंबई, मनमाड, नागपूर अशा शहरातून शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी केंद्रे कायम करण्यात आली. शस्त्रास्त्रे, दारूगोळा, बॉम्ब वगैरे बनविण्याच्या कामात त्यांनी स्वतःला झोकून दिले. १९४७- - ४८ च्या दरम्यान पुण्याचे प्रसिद्ध प्रकाशक रा. ज. देशमुख यांच्या पुस्तकांच्या गोडावूनमध्ये त्यांनी बॉम्ब तयार केले. नागपूर जबलपूरहून शस्त्रे गोळा करून पोहोचविली. एकदा तर आईबरोबर हमालाचा वेश करून गाठोड्यात बॉम्ब

बांधून प्रवास केला.[३] "मराठवाड्यातील केंद्रांना बाबासाहेबांनी ६ हजार बॉम्ब पुरविले पुण्यात बाबासाहेबांसह काही कार्यकर्ते पकडले गेले. त्यांना आठ दिवस तुरुंगात राहावे लागले. त्यानंतर बॉम्ब बनविण्याचा कारखाना सोलापूर येथे हलविला व तेथून बॉम्बपुरवठा केला. बाबासाहेबांचे एकच स्वप्न होते निजामी जुलमी राजवट नष्ट करणे शेवटी भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ ला पोलिस ॲक्शन कारवाई केली. दिनांक १७ सप्टेंबरला निजाम शरण आला. हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. बाबासाहेब हे वैचारिकदृष्ट्या लोकशाही समाजवादाला जवळचे होते. गोविंदभाईच्या पुरोगामी गटाचे ते एक प्रमुख होते. इ. स. १९५१ मध्ये मराठवाडा साहित्य परिषदेचे बाबासाहेब परांजपे अध्यक्ष झाले. इ. स. १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत बाबासाहेब बीड जिल्ह्यातून लोकसभेवर गेले. नंतर त्यांनी अनेक विधायक कार्य केली. अशा या थोर स्वातंत्र्यसैनिकाचे निधन २६ एप्रिल १९९१ ला झाले. हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यात बाबासाहेब परांजपे यांचे योगदान

## संदर्भ सुची :

१. जोशी मोरेश्वर त्र्यंबक (१९८४) 'स्वातंत्र्य संग्राम', प्रकाशक मोरेश्वर त्र्यंबक जोशी, मठासमोर ईगतपुरी, जि. नाशिक, प्रथमावृती, पृष्ठ क. ३४.३५. आम्ही', साकेत

२. खोत श्रीनिवास / विर्षे दिगंबर हैदराबादचा मुक्तिसंग्राम आणि प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९३ पृष्ठ क.१८.

३. खोत श्रीनिवास / विर्धे दिगंबर, 'बीड जिल्हातील स्वातंत्र्यलढा प्रकाशक ऑगस्ट कांती सुवर्णमहोत्सव समिती, मुंबई प्रथमावृत्ती पृष्ठ क्र. ३९.

# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य


संपादक

प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ प्रा. डॉ. दिलीप भिसे


समीक्षा पब्लिकेशन

**प्रकाशन क्रमांक** – ३८२

**जागतिकीकरण आणि लोकसाहित्य**

**संपादक : प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ । प्रा. डॉ. दिलीप भिसे**

**© प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ**
अंबाजोगाई

**प्रकाशन – समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.**

**प्रकाशक :** श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर-पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर – ४१३ ३०४
मो. ९६८९१४१२०१ / ८६०५५१२७४२

**मुद्रक :** एक्सेल प्रिंटर्स, पुणे

**मुखपृष्ठ :** सरदार जाधव

**प्रथमावृत्ती :** १६ नोव्हेंबर २०२२

**अक्षरजुळणी :** समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर.

**ISBN** : ९७८-९३-९५७०२-४२-३

**मूल्य :** ३००/- रु.

**समीक्षा पब्लिकेशनची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.**

# लोकसाहित्याचे स्वरूप

**प्रा. अनंत दादाराव मरकाळे**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
अंबाजोगाई

लोकसाहित्याचे स्वरूप :

भारतीय लोकसाहित्याला प्राचीन व समृद्ध अशी वैविध्यपूर्ण परंपरा आहे. या लोकसाहित्याची मुळे प्राचीन वैदिक वाङ्मयात आढळतात. व्यक्तीच्या जन्मापासून अंत्यविधीपर्यंत जे प्रमुख धर्मविधी व संस्कार आहेत, त्या प्रसंगी गायिली जाणारी गाणी सर्व भाषांमध्ये आहेत. मृत्युप्रसंगी म्हणवयाची सूक्ते ऋग्वेदात आहेत. तशीच काही आदिवासी जमातींतही अंत्यविधि-गीते आहेत. गुप्तपूर्व काळातील काही भारतीय लोकगीते चिनी भाषांतराच्या रुपाने जतन करून ठेवली आहेत. ए. एल. बाशम यांच्या 'द वंडर दॅट वॉज इंडिया' मध्ये असे काही निर्देश आढळतात. रामायण, महाभारत, पुराणे यांतील कथांचे प्रादेशिक, स्थानिक वैशिष्ट्यांसह रुपभेदात्मक आविष्कार सर्वच भाषांत आढळतात.

इ. स. सोळाव्या-सतराव्या शतकापर्यंत जगाच्या पश्चिम भागात मध्ययुगाची समाप्ती होऊन यंत्रप्रधान आधुनिक युगाला प्रारंभ झाला. भारतात ही परिस्थिती एकोणिसाव्या शतकात आली. मुद्रणयंत्राच्या शोधामुळे लिखित साहित्याची निर्मिती आणि प्रसार यांची लाट आली आणि त्याचवेळी मुद्रणपूर्व मौखिक परंपरेतील साहित्य व संस्कृती यांचे संग्रहण व अध्ययन करण्याची गरज अभ्यासकांना वाटू लागली. या साहित्यासाठी 'फोकलोअर' 'ऋेश्रज्ञश्रेीश' ही इंग्रजी संज्ञा सर्वप्रथम विल्यम जोन्स टॉमस या इंग्लिश पुरातत्वज्ञाने १८४६ मध्ये वापरली आणि जगभर ती प्रचलित झाली.

लोकसाहित्याच्या अभ्यासाला अठराव्या शतकात युरोप खंडात प्रारंभ झाला. सर्वप्रथम हा अभ्यास भाषाशास्त्राच्या अंगाने सुरू झाला. त्यामुळे लोकसाहित्यातील शाब्दीक आविष्काराकडे सर्वप्रथम लक्ष गेले. ग्रिमबंधूंनी या प्रकारच्या अभ्यासाला सर्वप्रथम चालना दिली. त्यांच्या जोडीने ब्रेल, मॅक्समुलर , डासेंट , कॉक्स इत्यादी भाषाशास्त्रज्ञांनी त्यात भर घालत दैवतकथांचा अभ्यास केला. लोकसाहित्यातील हा सर्वात पहिला अभ्यास होय. कालांतराने दैवतकथांचे अधिक विश्लेषण सुरू झाले

दैवतकथांतील निसर्गरूपके शोधून त्याचा अभ्यास सुरू झाला आणि त्यातूनच निसर्ग रूपकवादी अभ्यास पुढे आला. प्रत्येक दैवतकथेत कोणते तरी सत्य अवास्तव कल्पनांच्या आवरणाखाली दडलेले असते असे समजून 'दैवतकथा म्हणजे अवास्तव कल्पनेचा ऐतिहासिक सत्याशी झालेला मिलाप,' असे समजणारा फॅन्टसी संप्रदाय सुरू झाला. परंतु जर्मनीत वास्तव्य करणाऱ्या थिओडोर बेनफे या ज्यू पंडिताने , थिअरी ऑफ बारोइंग हा सिद्धांत प्रस्थापित केला. आणि लोकसाहित्याभ्यासाला पुन्हा एक नवी दृष्टी प्राप्त झाली.

अँड्र्यू लांग , टायलर , फ्रझर या मानवशास्त्राभ्यासकांनी त्यानंतर लोकसाहित्याच्या अभ्यासात खऱ्या अर्थाने क्रांती केली. त्यांनी भाषा शास्त्रीय पद्धती खोडून काढली आणि उत्क्रांतीतत्त्वाचा सिद्धांत मांडला. अँड्र्यू लागनी तर सजीवशेष या चेतनांशाचा सिद्धांत मांडला. ट्रायलर , फ्राइड, युंग या मानसशास्त्रज्ञांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा मानसशास्त्रीय संप्रदाय रूढ करून लोकसाहित्याचा अभ्यास अधिक सूक्ष्म केला.

लोकसाहित्य ही पर्यायी मराठी संज्ञा प्रथम सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व लोकसाहित्य विशारद दुर्गाबाई भागवत यांनी वापरली व पुढे ती प्रचलित झाली. मराठीतील लोकसाहित्याचे आद्य चिकित्सक अभ्यासक वि.का. राजवाडे यांनी १९२५ मध्ये प्रथम लोककला, लोकगीते हे शब्द वापरले. पुढे त्या परिभाषिक संज्ञा म्हणून मान्यता पावल्या. लोकसंस्कृतीचे शब्दरूप लोकवाङ्मयात असते, तर लोकसंस्कृतीचे कृतीरूप हे लोकाचार , लोकरूढी , लोकभ्रम यात असते असे डॉक्टर ढेरे यांनी प्रतिपादन केले.

वासुदेव : पारंपरिक वेशभुषेतील वासुदेव घरापुढील अंगणात टाळ आणि चिपळ्याच्या संगीतात आणि नृत्याच्या साथीने श्रीकृष्ण भक्तीपर गीते गातो. घोळदार अंगरखा, धोतर, डोक्यावर मोरपिसांची टोपी, कमरेला शेला, त्यात खोवलेली बासरी असलेला हा वासुदेव. श्रीकृष्ण भक्त असल्यामुळे श्रीकृष्ण चरित्रातील अनेक घटना प्रसंगा आपल्या रसाळ वाणीने गाऊन कृष्ण भक्तीचा भाव काही गीतांतून व्यक्त करतो. कृष्णाच्या रूपाचे वर्णन किती रेखीव वासुदेव आपल्या गीतांतून करतो याची साक्ष पुढील गीतातून पटते.

मस्तकी शोभती मुकूट वरी मोर पीस/नेसला पिवळा पितांबर,गळी मोत्याचे घोस
सावळा कृष्ण बाई,पावा वाजवितो/पावा वाजवितो बाई यमुनेच्या काठी खेळतो ०१

गोंधळी : महाराष्ट्रात गोंधळाला कुलाचाराची प्रतिष्ठा आहे. लग्न, मुंजीनंतर कुलदेवीच्या नावाने ' गोंधळ ' हा देवीच्या उपासनेचा लौकिक पातळीवरचा नाटयात्मक विधी आहे. गोंधळी हे रेणुकामाता आणि तुळजाभवानीचे उपासक आहेत. गोंधळी अंगात अंगरखा,

गळ्यात कवडयांची माळ, डोक्यावर कणंगीदार पगडी, संबळ व तुणतुणेसह साथीदार असतात. चौरंगावर चोळखण पसरून त्यावर चौक घालतात आणि देवीची स्थापना होते. चौकाभोवती शाळूच्या ताटांचे किंवा उसाच्या चिपाडांचे मखर उभे केले जाते. देवीची पुजा होते. नंतर यजमानाने दिवटी प्रज्वलीत करतो. गोंधळाला सुरुवात होते. गोंधळ तांबडे फुटू लागेपर्यंत चालतो तोपर्यंत यजमान दिवटीत तेल घालत असतो.

वाघ्या – मुरळी :

वाघ्या – मुरळी हे खंडोबाचे उपासक होत. खांद्यावर घोंगडी, गळ्यात व्याघ्रचर्माची भंडाराने भरलेली पिशवी, हातात घोळ असलेल्या वाघ्या खंडोबाची गाणी म्हणत ' मल्हारीची वारी ' मागत फिरतो. खंडोबाच्या यात्रेत वाघ्या – मुरळी यांचे कार्यक्रम चालतात. मुरळीच्या हाती ' घोळ ' असतो. नऊवारी लुगडे, कपाळी भंडारा फासलेला, हातातील घोळ वाजवीत नृत्य करते.वाघ्या तुणतुण्याची साथ देतो. तर दुसरा खंजिरी वाजवून गाणी म्हणत असतो. वाघ्या – मुरळी यांचे जागरणाचे कार्यक्रम गोंधळ्याच्या गोंधळासारखेच असतात. महाराष्ट्रात अनेकांच्या घरी जागरणाचा हा कुलाचार साजरा करतात. खंडोबा आणि बाणाई यांच्या भेटीचा प्रसंग गीतातून येतो.

पोतराज :

पोतराज महाराष्ट्रातील मरीआई या ग्रामीण देवतेचा उपासक. पुरुष असून स्त्री वेशात राहणारा, कमरेभोवती हिरव्या खणाचा घागरा व घुंगराची माळ बांधलेली , डोक्यावर लांब केस, कपाळावर हळद, कुंकवाचा मळवट, हातात लक्ष्मी आईचा कोरडा व हलगी असते. पोतराजाच्या गीतातून आईचे महत्त्व वर्णन केलेले असते. आषाढ महिण्यात खेडयापाड्यात मरीआई, लक्ष्मीआईची यात्रा काढतात. गावावर संकटे, रोगराई दूर व्हावी यासाठी पोतराजाच्या हाताने विधी करतात. पोतराज भिक्षा मागतो. तेव्हा तो मरीआईच्या आगमनाची वर्दी देतात. पोतराजाचे जागरण होते.पूर्वरंगात आईचा पूजाविधी, तिचे महात्म वर्णन करणारी गाणी तेव्हा पोतराजाच्या अंगात देवी संचार होतो. उत्तररंगात कथागीत, संवाद, संपादणी, धुपात्रीच्या वहया यांचा संगम येथे असतो.

जागरण :

जेजुरीचा खंडोबा हे ज्यांचे कुलदैवत आहे अशा ब्राह्मणांपासून मराठ्यांपर्यंत अठरापगड जातीत खंडोबाच्या उपासनेचा विधी म्हणून 'जागरण'हा कुळाचार पाळला जातो. वाघ्या आणि मुरळी हे खंडोबाचे भक्त हा जागरणाचा कुळाचार करतात. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातील अनेकांचा कुलस्वामी म्हणून खंडोबा या लोकदैवताचे महत्त्व फार मोठे आहे. खंडोबाच्या उपासनेसाठी व लग्न, मुंज आदी समारंभानंतर जागरण करण्याची प्रथा आहे. काही कुटुंबांमध्ये देवीचा गोंधळ आणि खंडोबाचे जागरण हे एकाच वेळी

घालतात.खंडोबा हे विठ्ठलाप्रमाणे कर्नाटकातून महाराष्ट्रात आलेले दैवत आहे. कानडीत खंडोबाला 'मैलार'असे म्हणतात. खंडोबाची उपासना आणि जागरणाचा विधी महाराष्ट्रात पंधराव्या शतकात रूढ झाला असल्याचे पुरावे संत साहित्यात सापडतात.

जोगती – जोगतीण :

यल्लमा देवीच्या उपासनेत जोगती – जोगतीण यांचे महत्त्व आहे. नवसाने देवीला वाहिलेल्या मुलांपैकी मुलगे जोगती तर मुली जोगतीणी बनतात. पदर कंबरेला खोचलेला, डोक्यावर देवीची परडी, कपाळी भंडार, विभूती फासलेली जोगतीण देवीची गाणी म्हणत भिक्षा मागते तर जोगती चौंडके वाजवून साथ देतो.

वरील उपासकाप्रमाणेच भराडी,भूत्या,भराडी, कुंभार,पांगुळ,भोपे,सुंबरान आदींसारख्या उपासकांनी लोकसंस्कृतीचे संवर्धन केले आहे. लोकसंस्कृतीच्या उपासकांचे पारंपरिक मौखिक कलात्मक आविष्कार सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक जीवनाच्या दृष्टीने वैशिष्टयपूर्ण आहेत.

बहुरूपी :

वेषांतर करून लोकांच्या मनोरंजनासाठी निरनिराळी सोंगे धारण करणाऱ्या व्यक्तीला 'बहुरूपी'म्हणतात. बहुरूपी जमातीचे लोक संपूर्ण भारतात आढळतात. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश अशा अनेक राज्यांमध्ये बहुरूपी जमात आढळते. निरनिराळी सोंगे घेऊन लोकांची करमणूक करणे हा या जातीच्या लोकांचा व्यवसाय असतो. बहुरूपी ही लोकरंजनाची फार जुनी संस्था आहे. भारताच्या उत्तर–पूर्वेतले काही बहुरूपी हे पूर्णत: मुस्लीम आहेत. 'बहू'हा संस्कृत शब्द आहे. याचा अर्थ अनेक असा होतो. रूप म्हणजे ठरावीक भूमिकेचं दृष्यस्वरूप. यावरून असे सांगता येते की, बहुरूपी म्हणजे अनेक भूमिका निभावणारा व्यक्ती होय. बहुरूप्यांची फार जुनी ऐतिहासिक परंपरा आहे. संतांच्या सानिध्यात बहुरुप्याचे दृष्टांत वारंवार आले आहेत. परमेश्वर हा एक मोठा बहुरूपी आहे. तो आपली रूपे सतत बदलत असतो, असा आध्यात्मिक आशय संतकाव्यात आढळून येतो. संत तुकाराम महाराजांनी त्यांच्या एका अभंगात परमेश्वराचे वर्णन करताना 'बहुरूपे नटला नारायण, सोंग संपादून जैसा तैसा'असा उल्लेख केला आहे. रामदासांनीही त्यांच्या भारुडात 'खेळतो एकला बहुरुपी रे। पहाता अत्यंत साक्षेपी रे। सोंगे धरिता नाना परी रे। बहुतचि कलाकुसरी रे।।' असा उल्लेख केला आहे.

स्त्री लोकसाहित्य :

लोकसाहित्याच्या संवर्धनात व त्याचे जतन करण्यात स्त्रीयांचा फार मोठा वाटा आहे.

भारतीय समाज हा प्रामुख्याने कृषिप्रधान समाज आहे. स्त्रियांच्या कथा गीतांतून कृषिप्रधान कुटुंब व्यवस्थेची, त्या व्यवस्थेतील श्रद्धा संकेताची अनेक रूपे दिसतात. पारंपारिक कृषिप्रधान कुटुंबात श्रमाला पर्याय नसतो. स्त्री-पुरुष सगळेच कष्ट करतात. तेव्हा शिवारात लक्ष्मी ची रास पडते. येथे कष्टा चा श्रमाचा गौरव येथे आहे. काम करणारी स्त्री ही सहगुणी ठरते. सर्वसामान्य माणसांचे ग्रामजीवन हे फारसे संपन्न नाही जेवायला भाकर मिळते आहे. पण सोन्या-मोत्याचा संचयही नाही, पण स्त्री-गीतांतून मात्र 'सोन्याचा करंडा बाई, मोत्यानं गुफिला अशा प्रकारचे स्वप्नरंजन भरपूर आहे. स्त्रीयांच्या लोकसाहित्याचे स्वरूप लक्षात घेतांना स्त्रीयांच्या मुखी असलेल्या ओल्या म्हणी, उखाणे, कूटे-कोडी, वाक्प्रचार, कथा, खेळ-क्रिडा, हस्तकला, चित्रकला, नाटय नृत्य, संगीत वाद्य, लोकभ्रमर सर्वांचा विचार करावा लागतो. सातमान्यपणे असा समज आहे की ग्रामीण स्त्रीच्या मुखी परंपरेने चालत आलेल्या ओव्या, स्त्रीगीते, कथा व कहाण्या म्हणजेच लोकसाहित्य स्त्रीयांना हा वारसा मातृवारसाने सहज मिळालेला आहे. स्त्री ही तिच्या गुणांनुसार त्यामध्ये भर घालत असते. लोकसाहित्याची सर्वच परंपरा बहुधा मौखिक परंपरा आहे. स्त्रीयांच्या लोकसाहित्याचे स्वरूप परंपरागत आहे

संदर्भग्रंथ :


१) डॉ. व्यवहारे शरद- लोकवाङमय रुप - स्वरुप- औरंगाबाद, साहित्यसेवा प्रकाशन.

२) भागवत दुर्गा -लोकसाहित्याची रुपरेषा, पुणे, वरदा बुक्स प्रकाशन.

३) शिंदे विश्वनाथ - लोकसाहित्य मीमांसा, पुणे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस

४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ - लोकवाङमय, पुस्तक पहिले.


.

II EDITION

# Anora

Aeon of New Organised Research and Academics

# 75 YEARS OF INDIAN INDEPENDENCE AN OVERVIEW

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांचे अवलोकन


❋ Chief Editor ❋

Dr. Sandip Vanjari



Anand Prakashan



Scanned with CamScanner

14. After Pandemic India: A More Inclusive and Sustainable Indian Economy. - Dr. D. B. Tanduljekar 113
15. Digitalization in India: An Innovative Concept. - Bhangare Ganesh Shivnath 116
16. An Overview of International Business Management Philosophy. - [1]Sameh Najib Qaid Salah Al-Ward, - Dr. Epper Vilas Sadashivrao 123
17. A Study of Monetary Policy Reforms in India. - Prof. Deshmukh Ujwala Madhukar 129
18. Envisioning Life Beyond Covid-19. - Mr. Amol Solunke 136
19. आत्मनिर्भर भारत और किसान - **श्री. नरेंद्र रमाकांत चोले, प्रा.जयप्रभा महदेव भगत** 138
20. विजय तेंडुलकर के नाटक और मॉबलिचिंग - **शेख अस्लम युनूस** 140
21. भारतीय अधिकोषण उद्योगातील नवप्रवाह आणि भारत सरकारची भूमिका - **डॉ. इंद्रजीत भगत** 144
22. उद्योजकतेतून महिलांचे सक्षमीकरण - Dr. Anupama Labhe 148
23. स्वातंत्र्योत्तर मराठी नाटकातील स्त्री भूमिकांची मन:स्थिती:एक चिकित्सक शोध - **सुरेखा रं. मसाळ** 151
24. स्वातंत्र्य आणि मराठी नाटकाचा अनुबंध - **प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी** 156
25. आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान - **डॉ. अनंत मरकाळे** 159
26. कृषी क्षेत्रातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास - **श्रीमती. धुमाळ सीमा काशिनाथ** 163
27. "Covid -19 संकटातील Lockdown मुळे भारतातील लघुउदयोगावरील झालेले परिणामाचा एक चिकित्सक अभ्यास." - **डॉ. राहूल रघुनाथराव माने** 165
28. कृषी व ग्रामीण पर्यटन - **प्रा. डॉ. निशा अशोक कळंबे** 168
29. मराठवाड्यातील ग्रामीण कथा साहित्यातील कृषक जीवन विशेष संदर्भ - रा. र. बोराडे, 'वानवळा' - **काजगुंडे हनुमंत महादेव** 172

Scanned with CamScanner

25

# आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

■ डॉ. अनंत मरकाळे
इतिहास विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाद्यिालय अंबाजोगाई, महाराष्ट्र.

**प्रास्ताविक :** महाराष्ट्राचे शिल्पकार, दूरदृष्टीचे नेते, मुख्यमंत्री, संरक्षणमंत्री, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतला एक खंदा शिलेदार, अशा अनेक अर्थने स्व. यशवंतराव चव्हाण आपल्याला परिचित आहेत. महाराष्ट्राला समृद्धीच्या दिशेने नेणारा हा द्रष्टा नेता अन् त्यांच्या विचारातील, स्वप्नातील महाराष्ट्र आज खरेच साकारला आहे का ..... त्यांच्याविषयी सामान्यजनांना काय वाटते ... हे या लेखातून स्पष्ट करण्याचा चा प्रयत्न करण्यात येत आहे.

**आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघणीत श्री. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :**

आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडण घडणीत थोर नेते यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे. यशवंतरावांचे जीवन म्हणजे साक्षात एक इतिहास आहे. तो सत्यशोधन समाज, स्वातंत्र्य चळवळीचा, संयुक्त महारष्ट्र आंदोलनाचा आणि नवमहाराष्ट्राच्या जडणघडणीचा एक इतिहास आहे. यशवंतरावांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्य अफाट होते. त्यांचे जीवन हेच एखाद्या महासागरासारखे होते. त्याचा तळ कुणालाही शोधणे सहजी शक्यच नाही. ग्रामीण भागात जन्मलेल्या आणि वाढलेल्या यशवंतरावांनी लोकशिक्षणाचे कार्य केले. शिक्षण ही सामाजिक गरज असल्याचे त्यांनी अनेक वेळा आपल्या भाषणातून सांगितलेल्या आहेत सत्तेत असताना व नसतानाही त्यांनी समाजातील शैक्षणिक प्रश्नांवर आपले विचार मांडले. त्यांनी त्यांच्या सत्तेच्या काळात अनेक शैक्षणिक कार्यक्रम राबवले ज्यामध्ये मोफत शिक्षण योजना व व्यावसायिक शिक्षणावर यशवंतराव चव्हाण यांनी भर दिला, इयत्ता पाचवी पासून इंग्रजी विषय हा ऐच्छिककेला मराठवाड्यातील अनेक शिक्षण संस्थांना त्यांनी सरळ हाताने आर्थिक अनुदान दिले. कोल्हापूर येथे आधी शिवाजी विद्यापीठाची स्थापना व सातारा येथे सैनिकी स्कूलची स्थापना तसेच आदिवासी समाजाच्या मुलांसाठी आश्रम शाळांची सोय औरंगाबाद आणि कराड येथे अभियांत्रिकी महाविद्यालयाची निर्मिती अशा कितीतरी महत्त्व पूर्ण शैक्षणिक निर्णय त्यांच्या राजसत्तेच्या काळात त्यांनी घेतले मनुष्यबळाला शिक्षणाची जोड देऊन त्यांनी समाजात न व सामर्थ्य निर्माण करण्याचा सदैव प्रयत्न केला शिक्षण कशाला म्हणावे हे सांगताना ते म्हणतात शिक्षित व्यक्तीला स्वत:च्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगत लावता येते, त्यांच्या योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजून घेता

 ISBN-978-93-91204-31-0

Scanned with CamScanner

येते आणि समजावून देता येते, तेच शिक्षण होय. शिक्षणाचा जीवनाशी परिसराशी [illegible] येतोतितकाच वर्तमान आणि भविष्याची हे आहे असे ते आवर्जून सांगत होते. खेड्यातील [illegible] शहरातील शिक्षण यांच्यात तिला कृत्रिम अंतर कमी करुन त्यांच्यामध्ये समतोल [illegible] यशवंतराव चव्हाण यांना नेहमीच मोलाचे वाटले शेती आई-वडील याकडे बघण्याचा दृष्टीकोन [illegible] शोकांतिका त्यांनी लक्षात घेतली व शेतीच्या व खेड्याच्या विकासास उपयुक्त ठरणारे शिक्षण [illegible] याकरिता 'ग्रामिण शिक्षण माझी कल्पना' या विषयावर त्यांनी अनेकदा आकाशवाणीवर [illegible] दिली.

**यशवंतरावाचे शिक्षण विषयावरील विचार :**

यशवंतरावाचे शिक्षण विषयावरील विचार आधुनिक स्वरुपाच आहे ते केवळ सामाजिक [illegible] दृष्टिने शिक्षणाकडे पाहत नव्हते तर ते आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन म्हणून शिक्षणाकडे [illegible] होते. शिक्षणाश्विाय न व सामर्थ्य येणार नाही शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना व बुद्धीची [illegible] करुन चालणार नाही तर शिक्षण ही सामाजिक परिवर्तनाची हीच त्यांची भूमिका होती त्यामुळे [illegible] माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने [illegible] नाही. शिक्षणाने समाताजील आर्थिक विषमता ही नाहीशी करता येईल आणि समाजाचा [illegible] विकास साधता येईल. शिक्षणाची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ या दोन्ही वंर भर देणे गरजेचे [illegible] असे त्यांचे मत होते. यावरुन, समृद्ध महाराष्ट्राचे द्रष्टे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण [illegible] व्यक्तिमत्त्व अभ्यासताना त्यांचे शिक्षणाविषयक विचार आजच्या स्पर्धात्मक युगातही किती [illegible] ठरतात आणि त्यांच्या विचारांची आजही किती गरज आहे, हे लक्षा येते. महात्मा जोतिबा फुले [illegible] थोरले बंधू गणपतराव यांच्या सामजिक व आर्थिक विषमता दूर करण्याच्या कार्यामुळे याना [illegible] दृष्टी प्राप्त झाली होती. देवराष्ट्रे गावात राहून त्यांनी विषमतेबरोबरच शेतकऱ्यांची दु:खे [illegible] त्यातूनच शिक्षणाची गरज आणि महत्त्वाही लक्षात घेलले होते. शेतकऱ्याची पुढची पिढी हे [illegible] पिढीच असली पाहिजे आणि शिक्षण ते तळागाळातल्या प्रत्येकाला मिळाले पाहिजे, याकरिता ते [illegible] होते. त्यांच्या दूरदृष्टिकोनातूनच सैनकि स्कूल, शिवाजी विद्यापीठ आणि मराठावाडा विद्यापीठ [illegible] निर्मिती झासेक्सलेली आहे. एखाद्या मोठ्या व्यक्तीबद्दल बोलताना त्या व्यक्तीने व्यक्तिमत्त्व [illegible] किंवा होते असे म्हणण्याची रीत आहे. मात्र महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या [illegible] मा ही औपचारिकता केवळ औपचारिकता राहात नाही. जसे एका हिऱ्याला हिरकणी करताना [illegible] दिले हे सहती मोजता येत नाही, त्याप्रमाणे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व होते. थोर देशभक्त, [illegible] साहित्यिक, धुरंधर मुत्सद्दी राजकारणी, विचारवंत, गुणग्रहक, सौजन्ययुक्त, जनतेच्या प्रेमाने [illegible] निष्ठावंत नेता, एक जाणकार समाजवादी, लोकशाही नितांत श्रद्धा ठेवणारा, चरित्र्य संपन्न [illegible] नागरिक, ओजस्वी वक्ता, समृद्ध महाराष्ट्राचा शिल्पकार आदी पैलूंनी बद्ध असे व्यक्तीमत्त्व [illegible] त्यांचे शैक्षणिक विचार आजच्या युगातही युगप्रवर्तक असल्याचे जाणवतात. टिळक [illegible]



Scanned with CamScanner

शिक्षण घेताना झालेल्या संस्कारामुळे यशवंतरावांच्या मनात टिकळांप्रमाणेच प्रखर ध्येय वाद, देशप्रेम, स्वार्थत्याग व जिद्द या भावना पेरल्या गेल्या होत्या.

त्यांच्या सर्व विचारांचा केंद्रबिंदू ग्रामीण भागात राहणारा माणूस हाच होता.त्यांनी राबविलेल्या शेती, उद्योगधंदे, शिक्षण व मनुष्यबळ चा चारसूत्री कार्यक्रमांतूनही हेच स्पष्ट होते.

भारतात स्वातंत्र्यानंतरच्या काळात शहरांची वाढ झपाट्याने झाली. नोकरीधंद्याच्या ओढीन खेड्यातील तरुणपिढी मोठ्या शहरांकडे धाव घेऊ लागली. यामुळे रोजगारांच्या संधीची कमतरता, कौशल्याधिष्ठीत शिक्षणाचा अभाव अशा कारणाने ग्रामीण भागातून येणाऱ्या जनतेची कोंडी होऊ लागली होती. यातूनच देशभरातील ग्रामीण जनता आणि पर्यायाने शेती टिकविण्याकरिता तिला ऊर्जितावस्था देण्याकरिता कृषी औद्योगिक क्रांतीची संकल्पना यशवंतरावांनी प्रत्यक्षात राबविली. राहुरी कृषी विद्यापीठासारख्या तंत्रशुद्ध शेतीविषयक प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षणासंस्था उभ्या राहिल्या ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला उच्चशिक्षणाचा अधिकार आहे आणि असे शिक्षण त्याला त्याच्या गावात, तालुक्याच्या ठिकाणी मिळाले पाहिजे, या जाणिवेतून यशवंतरावांनी आग्रहाने शिवाजी विद्यापीठ आणि मराठवाडा विद्यापीठाची स्थापना आपल्या कार्यकाळात केली. शेतकऱ्यांच्या आणि विशेषत: ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना सैन्यात येणाचा मार्ग दाखवतानाच त्यांनी भारतातले पहिले सैनिक स्कूल साताऱ्यात सुरु केले. आज या सैनिक स्कूलमधून बाहेर पडलेल्या अनेक कर्तबगार विद्यार्थ्यांनी आपल्या तिन्ही संरक्षण दंलाचे प्रभावी नेतृत्व केले आहे.

यशवंतराव चव्हाण असे म्हणत की, आजपर्यंत आम्ही घेतलेल्या शिक्षणाने आमच्यात नोकरपेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आमची बुद्धी व आमची पिंडच नोकरीपेशाचा आहे, असे आमच्यावर रुजविण्यात आले, पण मला ही गोष्ट मंजूर नाही. भारतात असएक्स व्हिडीओणाऱ्या त्रिस्तरीय शिक्षण पद्धतीचा सांगोपांग विचार यशवंतरावांनी केला होता. शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावे अशा ठाम विचारांचे प्रतिपादन त्यांनी केले. कारण परकीय भाषेते शिक्षण घेण्याने माणसाची बौद्धीक वाढ खुंटते आणि मौलिकता हिरावते. व्यक्ती स्वदेशापासून दूर जातो आणि म्हणूनच शिक्षणाकरिता प्रांतिक भाषांना प्राधान्य द्यावे, या करिता ते आग्रही होते. शासनो सक्तीचे शिक्षण द्यावे. या करिता त्यांनी आग्रही भूमिका मांडली होती. ई.बी.सी.सवलत, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क माफी,शिष्यवृत्ती, ग्रामीण भागात शाळा कॉलेज काढण्याकरिता प्रोत्साहन अशा अनेकविध कार्यक्रमांतून त्यांनी आपल्या सर्वदूर शिक्षण प्रसाराचा कार्यक्रम प्रत्यक्षात राबविला. त्यांच्या मते राज्याची औद्योगिक प्रगती जितकी महत्त्वाची, तितकीच शैक्षणिक प्रगतीही महत्त्वाची आहे. शिक्षण हे केवळ सामाजिक गरजेकरिता नाही, तर ते आर्थिक विकासाचे आणि पर्यायाने देशविकासाचे साधन आहे, यावर त्यांचा विश्वास होता. त्याकरीता उच्च शिक्षण हे कोणाची मक्तेदारी न राहता ते सर्वा करिताच खुले झाले पाहिजे, याकरिता त्यांनी कृतीशीलपणे प्रयत्न केले.



Scanned with CamScanner

**समारोपः**

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. त्यातूनच व्यक्ती विकास, समाज विकास व पर्यायाने समाजीकरण प्रक्रिया सुलभ होते, ज्ञानाची गंगा समाजाच्या खोलापर्यंत पोहोचली तरच खऱ्या अर्थाने कल्याणकारक ठरेल, असा यशवंतरावांचा विश्वास होता. आजच्या अस्वस्थ वातावरणात महाराष्ट्राच्या या द्रष्ट्या नेत्याने विचार म्हणूनच तर अर्थपूर्ण अनुकरणीय वाटते. समृद्ध महाराष्ट्राचे द्रष्टे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासताना, त्यांचे शिक्षणविषयक विचार आजच्या स्पर्धात्मक युगातही किती परिणामकारक ठरतात आणि त्यांच्या विचारांची आजही किती गरज आहे, हे लक्षात येते.

**संदर्भ :**


१. कृष्णाकाठ : यशवंतरावांचचे आत्मचरीत्र रोहन प्रकाशन

२. यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्त्व आणि कर्तुत्व, लेखक गोविंद तळवलकर, मौजे प्रकाशन २०१२.

३. यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षा लेखन व भाषणे लेखक प्रा. शिवाजीराव देशमुख, कौसल्या प्रकाशन सोलापूर २००९.


*

 ISBN-978-93-91204-31-0

Scanned with CamScanner

# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्यःस्थिती

(इतिहास)



: संपादक :

प्रा.डॉ.बी.के.शेप

: मुख्य संपादक :

प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

Scanned with CamScanner

# राजर्षि शाहू महाराज :
# सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती

**(इतिहास)**


**-: संपादक :-**

**प्रा. डॉ. बी. के. शेप**

इतिहास विभाग प्रमुख

वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ,

जि.बीड (महाराष्ट्र)

**-: मुख्य संपादक :-**

**प्राचार्य, डॉ. आर. के. इप्पर**

वैद्यनाथ कॉलेज, परळी वैजनाथ,

जि.बीड (महाराष्ट्र)



**अरुणा प्रकाशन, लातूर**



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-091-1

४८. राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज
**प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी** ........................ १६६

४९. राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज
**डॉ. सावंत के.डी.** ........................ १६९

५०. राजर्षी शाहू महाराजांचे सत्यशोधक समाज चळवळीतील योगदान एक : तात्विक चिंतन
**प्रा. नरवाडे बालाजी मारोतराव** ........................ १७१

५१. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण व प्रासंगिकत्ता
**डॉ.राजेश करपे, प्रा. डॉ. बाबासाहेब केशवराव शेप** ........................ १७५

५२. शाहू महाराजांच्या विचारातील शेती व उद्योगधंदे म्हणजे आर्थिक क्रांती
**प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम** ........................ १७९

५३. राजर्षी शाहू महाराजांचे शेती विषयक धोरण
**प्रा.अमोल गंगणे, प्रा.डॉ.कदम एस.आर.** ........................ १८२

५४. शेतकऱ्यांचे कैवारी - शाहु छत्रपती
**प्रा. पी. एम. राजुरवाडे** ........................ १८५

५५. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण
**प्रा.डॉ.कुंटे ए.पी.** ........................ १८७

५६. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा आणि वर्तमान काळातील प्रस्तुतता
**प्रा. मंगला पेकमवार (गडम)** ........................ १९०

५७. राजर्षी शाहू महाराज आणि डांबर प्रकरण
**प्राचार्य, डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले, डॉ. व्यंकटेश लांब** ........................ १९३

५८. राजर्षी छ. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा
**डॉ. आर. एस. पारवे** ........................ १९७

५९. छत्रपती शाहू महाराजांचे समाज सुधारणा विषयीचे कार्य
**प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन** ........................ २००

६०. राजर्षी शाहू महाराजांचे विधवा पुनर्विवाह कायद्याविषयीचे विचार
**डॉ.प्रा. यु.एस.सावंत** ........................ २०२

६१. सामाजिक न्यायाचे उध्दारकर्ते : राजर्षी शाहू महाराज
**डॉ. एन. पी. कुडकेकर** ........................ २०६

६२. छत्रपती शाहू महाराजाचे जातीभेद निर्मुलना संबंधी विचार
**प्रा. अनंत दादाराव मरकाळे** ........................ २०९



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-091-1

# ६२. छत्रपती शाहू महाराजाचे जातीभेद निर्मुलना संबंधी विचार

**प्रा. अनंत दादाराव मरकाळे**
इतिहास विभाग प्रमुख
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई**

राजर्षी छत्रपती शाहु महाराजांचे सामाजिक कार्य महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या समाजसुधारणेच्या इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. छत्रपती शाहु राजे असेल तरी त्यांचा आंतरीक पिंड समाज सुधारकाचा होता. त्यांनी राजसत्तेचा उपयोग समाज सुधारणेसाठी करुन समाज परिवर्तनाच्या चळवळीला गती दिली. हि घटना भारतीय समाज सुधारणेच्या चळवळीसाठी प्रेरणादायी ठरली. राजर्षींनी सत्तसुत्रे हाती घेतली त्यावेळी समाजाची स्थीती फार वाईट होती. समाज चतुवर्ण व्यवस्थेत विभागला गेला होता. या चतुवर्ण व्यवस्थेत ब्राम्हणेत्तराना अतीशय हिन दर्जाचे व अपमानास्पद जीवन जगावे लागत होते. पण या सर्वात शुद्र समजल्या जाणाऱ्या दलीत अस्पृष्य जातीतील माणसांची अवस्था तर गुराढोरा पेक्षाही हिन-दिन झाली होती.[१] समाजाचा सर्वात मोठा असलेला घटक बहुजन समाज शिक्षणापासून कोसो दुर होता.

जातीभेद व जाती प्रथा हे हिन्दु समाजव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षन होते. जाती जातीतील श्रेष्ठ कनिष्ठतेच्या पयावर हिन्दु समाजाची उभारणी झाली होती. त्यामुळे सहाजीकच समता स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या उदारमतवादी व मानवतावादी तत्वांना केव्हाच तिलांजली मिळाली होती. हि व्यवस्था सहजासहजी बदलने सोपे नव्हते. डॉ. आंबेडकरांनी या समाज अवस्थेचे अतिशय मार्मीक विश्लेषण करतांना या हिन्दु समाज रचनेस अनेक मजली मनोऱ्याची उपमा दिली आहे. ते म्हणतात, चहिन्दु धर्मात समाविष्ट होणाऱ्या जाती उच निच भावनेने प्रेरीत झालेल्या आहेत हे उघड आहे. हिन्दु समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक-एक मजला होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट हि आहे की, या मनोऱ्यात शिडी नाही आणि म्हणुन एका मजल्या वरुन दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्याने जन्माचे त्याच मजल्यात त्याने मरावे. खालच्या मजल्यातला इसम मग तो किती ही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणुस कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटुन देण्याची प्रज्ञा नाही. उघड भाषेत बोलावययाचे म्हणजे जातीजातीत असलेल्या या उच-निच भावना गुणावगुणांच्या पायावर झाल्या आहेत असे नाही. उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही गुणी असो, तो निचच राहावयाचा,[२]यावरुन भारतीय समाज व्यवस्था किती बंदीस्त व प्रतीगामी होती हे लक्षात येते. हिन्दु समाजातील प्रत्येक जात आपले स्वातंत्र्य अस्तित्व जपत होती व स्वत: ला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत होती. जातीजातीत रोटी-बेटी व्यवहार बंद होता. या जाती अंतर्गत पुन्हा अनेक उपजाती किंवा पोटजाती असत व त्या एकमेकांत श्रेष्ठ कनिष्ठ भेदभाव मानीत असत. विशेष म्हणजे प्रत्येक जात खालच्या जातीस आपल्या पेक्षा कमी समजत होती. एवढेच नव्हेतर अस्पृष्य जातींत ही हा उच-निच भाव होता.



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-091-1

जातीभेदाच्या या विषारी वृक्षास अस्पृक्षतेचे विषारी फळ आले व या अस्पृश्यतेने समाजाची अक्षम्य दुरवस्था करुन टाकली. जातीप्रथा व अस्पृश्यता हे मानव जातीचे दोन शत्रु नेस्तनाबुत करण्याच्या महान कार्याची सुरवात महात्मा फुले यांनी केली. पुढे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या हाती असलेल्या सत्तेचा व साधनांचा उपयोग करुन मोठ्या जिद्दीने जाती अंत व अस्पृश्यता निर्मुलनासाठी संगर उभा केला.

राजर्षी छत्रपती शाहूंनी राज्यकारभारांची सुत्रे हाती येताच २ एप्रील १८९४ रोजी आपल्या राज्यकारभाराचे उद्दीष्टे स्पष्ट करण्यासाठी एक खास जाहीरनामा काढला होता. त्यात शाहूंनी म्हटले होत. च्आमची प्रजा सतत तृप्त राहुन सुखी असावी, तिच्या कल्याणाची सतत वृध्दी व्हावी व आमच्या संस्थानांची हर एक प्रकारे सरोदीत भरभराट होत जावी अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा आमच्या हेतु परिपुर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहान थोर जहागीरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामदार, सर्व स्तरातील व्यापारी वर्ग आदी करुन तमाम प्रजाजन शुध्द अंतरकरणा पासून माठ्या राजनिष्ठेने आम्हास सहाय्य करतील अशी आमची पुर्ण उमेद आहे. ही आमची कारकीर्द दिर्घ कालपर्यंत चालवून सफल करावी अशी मी त्या जगनियत्या परमात्याची एकभावे प्रार्थना करितो.छ [४] यावरुन शाहुंची समाज सुधाण व समाज उध्दाराची आंतरीक तळमळ स्पष्ट होते.

राजर्षीनी विविध जाती-समुहांनी आयोजित केलेल्या सामाजीक परिषदा मधुन व जाती परिषदा मधुन जी सुस्पष्ट व विचार प्रवर्तक भाषणे केली आहेत त्यातुन त्यांचे जातीप्रथा व जातीभेद निर्मुलना संबंधीचे विचार स्पष्ट झाले आहेत. समाजात विषमता, अन्याय शोषण यासारखे जे दोष निर्माण झाले आहेत. त्याचे मुळ जातीभेदांत आहे. तसेच भारताच्या हजारो वर्षाच्या गुलामगीरीचे मुख्य कारण ही जाती भेदच आहे असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते. [५] म्हणुन त्यांनी जातीप्रथेस विरोध करुन जातीभेद निर्मुलना संबंधीचे विचार वेळोवेळी व्यक्त केले.

नाशीक येथे १५ एप्रील १९२० रोजी श्री. उदाजी मराठा विद्यार्थी वस्तीगृहाच्या इमारतीच्या कोनशिला समारंभाचे वेळी भाषण करतांना राजर्षी छत्रपती शाहू म्हणतात. च्या बोर्डींगचे धोरणही अनुकरणीय आहे. मराठा शिक्षण परिषदेच्या प्रसंगी मराठा लोकांच्या औदार्याने याची स्थापना झाली असतानाही सर्व जातीच्या मुलास याचे प्रवेश व्दार खुले ठेवण्यात चालकांनी आपल्या मनात थोरपणा व उज्वल देशभक्ती दाखवली आहे. सर्व माणसे एकाच इश्वराची लेकरे असल्याने त्यांचे परस्परांशी बंधुत्वाचे नाते आहे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य तत्व प्रचारात आणुन आपले मनोर्धर्य व सत्यानिष्ठ दाखविल्या बद्दल येथील चालकांची तारीफ करावी तेवढी थोडीच हे च्कॉस्मॉपॉलिटीअन तत्वछ जीतक्या संस्थातुन पसरले तीतके चांगले त्यायोगाने जातीभेद मंदावुन एक्य होण्यास चांगले सहाय्य होते. [६] याच भाषणात शाहू महाराज जातीभेद मोडणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने किती इष्ट आहे हे आंतरीक तळामळीने सांगतांना म्हणतात, च्सर्व जातीच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की आपली दृष्टी दुरवर ठेवा पाया पुरतेच पाहु नका. जातीभेद मोडणे इष्ट आहे. जातीभेद पाळणे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथडा आहे. हा दुर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत हि जाणीव पक्की ध्यानात ठेवुन मग या दिशेला



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-091-1

प्रयत्न म्हणुन जाती परिषदा भरवा. जाती बंधन दृढ करणे, जातीभेद तिव्र होणे, हा परिणाम या परिषदाचा होऊ नये हि खबरदारी घेतली पाहिजे[७] राजर्षीच्या या विचारातुन आजच्या जातीपातीच्या संघटना काढुन दुकानदाऱ्या करणाऱ्या व जातीभेदास चालणा देणाऱ्या स्वार्थी पुढाऱ्यांनी बोध घेण्याची गरज आहे. मागासांचा कैवार घेण्याच्या नावाखाली जातीभेद घट्ट करण्याचे काम करु नका हि राजर्षीची शिकवण आजच्या काळात तर जास्तच आवश्यक बनली आहे. शाहू महाराज म्हणतात हिन्दुस्थानात आहे या प्रकारचा जातीभेद पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही दुसऱ्या देशात नाही हिन्दुस्थानला जी गुलामगीरी आज हजारो वर्षे भोगावी लागत आहे तिचे मुख्य कारण हा जाती भेद आहे.

**सारांश :** राजर्षी छत्रपती शाहू घ्राजेङ होते पण ते दलीत शोधीतांचे राजे होते. त्यांच्यावर पडलेला परीस्थीतीचा प्रभाव व त्यांनी घेतलेले प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शिक्षण यातुन त्यांची सामाजीक न्यायावर आधारीत समतावादी विचार सरणी तयार झाली होती. शाहु महाराजांनी आपल्या समाज उध्दार कारकीर्दीत अनेक समाज क्रांतीकारी निर्णय घेवुन व कायदे करुन जाती भेद निर्मुलन व अस्पृश्याध्दारा संबंधी बहुमोल कार्य केले. स्त्री शिक्षण व स्त्री सुधारणेला गती दिली. त्याचबरोबर दलित अस्पृष्य बहुजन समाजाला सामाजीक न्याय मिळवुन देण्यासाठी अहो रात्र परिश्रम घेतलेच परंतु वेदोक्त प्रकरण व सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातुन ब्राम्हणी वर्ग वर्चस्ववादावर तिव्र प्रहार करुन बहुजनांच्या सामाजीक सुधारणांना गती दिली. राजर्षी राजे आणि सुधारक तर होतेच पण सामाजीक समस्याची सोडवणुक तर्कशुध्द पध्दतीने करणारे व बहुजन दलीतांच्या उध्दाराची आंतरीक मनीषा बाळगणारे द्रष्टे विचारवंत होते याची खात्री पटते.

**संदर्भ :-**


१. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती २००१ पृ.क्र.९.

२. कित्ता पृ.क्र. १०७

३. खैरमोडे चा.भा., डॉ. भिवराव रामजी आंबेडकर चरित्र खंड- १, सुगावा प्रकाशन पुणे चौथी आवृत्ती १९९२ पृ. क्र. २५८

४. Sangave Vilas, Khane, B.D.(Ed.), Rajashri Shahu Chhatrapati Papers. Vol.- II (१८९४ to १९०० A. D.) (Early Administrative Reforms) Shahu Risearch Institude, Shivaji University Kolhapur, १९८३ Papers No. ३१ P. - ४२

५. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर प्रथमावृत्ती २००१ पृ.क्र.१०७.

६. भोसले एस. एस. (संपा.), क्रांतीसुक्ते : राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य सांस्कृतीक मंडळ, मुंबई. १९९१ पृ.क्र. १५.

७. कित्ता पृ.क्र. १५.


❖❖❖



Scanned with CamScanner

ISSN NO. 2231-4342

स्थापना १९९१

# संशोधन पत्रिका २०१६
# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

## रौप्य महोत्सवी राष्ट्रीय अधिवेशन

दि. २० व २१ जानेवारी २०१७

– प्रकाशक –

पार्थ विद्या प्रसारक मंडळ
स्थापना १९६५

नॅक पुनर्मुल्यांकित 'A' ग्रेड

ISO 9001-2008 प्रमाणित


पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे,

**बाबुजी आव्हाड महाविद्यालय**

पाथर्डी, जि. अहमदनगर ४१४ १०२.

फोन : कार्यालय : ०२४२८ – २२२३४९, फॅक्स : २२२३४९

Website: www.babujiavhadcollege.org
E-mail : babujiavhadcollege@gmail.com




# संशोधन पत्रिका - २०१६

ISSN No. २२३१ - ४३४२

## अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संस्था नोंदणी क्र. १९९१ / GBBSD / ४२६

**- प्रमुख संपादक -**

**डॉ. सदाशिव शिवदे**

**अध्यक्ष**

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

**- संपादक मंडळ -**

प्रा. डॉ. ग.का. माने
प्राचार्य. डॉ. टी.एस. पाटील
प्रा. जे.डी. गोपाल
प्रा. डॉ. प्रशांत देशमुख
प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे
प्रा.डॉ. उत्तम सावंत
प्रा. डॉ. सौ. विजया साखरे
प्रा.डॉ. अशोक कानडे

**- प्रकाशक -**

**प्राचार्य डॉ. जी.पी. ढाकणे**

बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी, जि.अहमदनगर.



Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका
## आधुनिक विभाग - शोध निबंध


| | | | |
|---|---|---|---|
| | **समकालिन इतिहासाचे लेखन (अध्यक्षीय भाषण)** | **डॉ. अवनीश पाटील** | २१९ |
| १ | Hon. Jagnath Shankar Sheth (१८०३-१८६५) An Archited of Modern India | Dr. Abhida Dhumatkar | २३४ |
| २ | ज्ञानोदय वृत्तपत्रातील दुष्काळ व शेती संबंधीचे विचार - ऐतिहासिक अभ्यास | प्रा. बाळासाहेब गोरख काळे | २४४ |
| ३ | खादी ग्रामोदयोग क्रांती व बाळासाहेब भारदे | प्रा.के.जे. चव्हाण | २५३ |
| ४ | Reading of Epitaphs of Christ Graveyard of Buldhana. | Dr. Prashant S. Deshmukh | २६० |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर सोहळा | कु. शितल उत्तम सावंत | २६७ |
| ६ | कामगार चळवळीत पार्वतीबाई भोर यांचे योगदान | डॉ. अरुणा अर्जुन मोरे | २७२ |
| ७ | मुंबईतील न्याय व्यवस्थेतील सुधारणांचे आद्य जनक ना. जगन्नाथ शंकरशेठ | डॉ. श्रीनिवास वेदक | २८३ |
| ८ | आधुनिक भारतातील शेतकरी चळवळ | प्रा. जी.डी. रुपवते | २९५ |
| ९ | विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा इतिहास विषयचीचा दृष्टीकोन | रमिला दिपक गायकवाड | ३०१ |
| १० | गोवा मुक्ति आंदोलन आणि राममनोहर लिहिया. | प्रा. दिपक बाबुलाल धोबी | ३०९ |
| ११ | अहिंसात्मक सत्याग्रहाचे महाराष्ट्रातील क्रांतीकारी स्वरुप | प्राचार्य डॉ. विजय पांडुरंग कुलकर्णी | ३१६ |
| १२ | हैदराबाद संस्थानातील निजाम विरोधी लढा आणि उस्मानाबाद - लातूर जिल्हयातील महाराष्ट्र परीषदेचे अधिवेशने. | डॉ. शिवराज बोकडे | ३२२ |
| १३ | अंबादेवी मंदिरप्रवेश आंदोलन आणि डॉ. पंजाबराव देशमुख | प्रा. अनंत दादाराव मरकाळे | ३३२ |
| १४ | महाराष्ट्र एकीकरण समिती व बाळासाहेब पाटील एकंबेफर. | डॉ. एस.डी. सावंत | ३४० |
| १५ | डॉ. भाऊ दाजी लाड यांचे अर्थकारण | डॉ. उत्तम आप्पासाहेब पठारे | ३४९ |




Scanned with CamScanner

# अंबादेवी मंदिर प्रवेश आन्दोलन आणि डॉ. पंजाबराव देशमुख

**प्रा. अनंत दादाराव मरकाळे,**
इतिहास विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई
जि. बीड मो.नं. ९६२३७३९८३७

डॉ. पंजाबराव देशमुख इंग्लडवरून उच्चशिक्षण घेऊन भारतात परतले तेव्हा येथे महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात स्वातंत्र्याचे आंदोलन तीव्र झाले होते. महात्मा गांधीनी स्वातंत्र्य चळवळीला सामाजिक चळवळीचा हातभार लागावा या करिता प्रयत्न केले. जातीभेद नष्ट करयासाठी महात्माजींनी अस्पृश्यता निवारण मोहीम सुरू केली होती. १९२३ साली डॉ. भीमराव आंबेडकर आणि १९२५ साली डॉ.पंजाबराव देशमुख आपले विदेशातील शिक्षण आटोपुन भारतात आल्यानंतर त्यांनी भारतीय समाजकारणात प्रवेश केला. डॉ. आंबेडकरामुळे या चळवळीला वैचारिक, संघटीत तसेच हळूहळू आक्रमक स्वरूप येत गेले. डॉ. पंजाबराव देशमुखांनी या चळवळीत मंदिर प्रवेशाचा समावेश करून चळवळीला एक नवीन आयाम मिळवून दिला.

डॉ. पंजाबराव देशमुख विलायेतून परत आल्यानंतर त्यांनी अमरावतीला वकिलीचा व्यवसाय सुरू केला. लहानपणापासूनच पंजाबरावांना सहकार्य, चिकाटी, परिश्रम समता ह्या गुणांचा वारसा लाभला होता. समाजातील विभीन्न स्थिती बघता ते खिन्न होत असत. वकिली करीत असतांना समाजासाठी काहीतरी करावे यासाठी त्यांचे मन त्यांना प्रेरणा देत असे. जातीयता हे सामाजीक जीवनाचे विवेकमूल्य बनू शकते. ही कल्पनाच भाऊसाहेबांना मान्य नव्हती.[१] भाऊसाहेब पुरोगामी विचाराचे व जातीयतेचे कट्टर विरोधक होते. प्रत्यक्ष कृतीशिवाय अस्पृश्यांची सामाजीक समानता सनातन मंडळी मान्य करणार नाही. हे त्यांच्या लक्षात आले होते. त्यामुळे त्यांनी बहुजण समाजातील आपल्या सहकाऱ्यांसह या चळवळीत उतरण्याचा निर्णय घेतला.

वेदवांगमयाचे निरागम व निरामय तत्त्वज्ञानाचे अध्ययन आकंठ प्यालेल्या भाऊसाहेबांना हे सामाजिक व धार्मिक अज्ञान धुडगूस घालणारे विषमतेचे चित्र अधिकच तिव्रतेने जाणवू लागले.[२] भाऊसाहेबांचा तत्त्वज्ञान हा आवडीचा विषय होय आणि वेद वांङ्मयातील तत्त्वज्ञानाचा उत्तुंग आस्वाद भाऊंनी घेतला होता. त्यामुळे मुळातच भाऊमध्ये असलेल्या समता, बंधुता व न्याय या स्वभावगुणा मध्ये वाढ झाली, ती व्यापक झाली. अस्पृश्यता तथा बाटाबाटीचा प्रकार नष्ट व्हावा यासाठी पंजाबरावांनी बरेच विचार मंथन केले. पंजाबरावांचे शिक्षण अमरावती येथे झाले असल्याने त्यांना तेथील व परिसरातील सामाजिक जीवनाची पूर्ण कल्पना होती. अंबादेवीचे मंदिर अस्पृश्यांना दर्शनासाठी खुले नाही हे ते विद्यार्थीदशेपासुन पाहत होते. वैदिक धर्माचा उद्गम आणि विकास या बाबत सखोल संशोधनानंतर वैदिक धर्माचे भाऊसाहेबांवर जे संस्कार झाले होते. त्यानुसार सर्व लोकांना मंदिरात प्रवेश दिला पाहिजे या बाबत त्यांची खात्री पटली होती. मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करताना भाऊसाहेबांना मंदिरातील प्रतिमापूजा महत्त्वाची नव्हती, तर माणसातील ईश्वर महत्वाचा वाटत होता. ईश्वराचे स्मरण करण्याचा अधिकार सर्वच प्राणीमात्रांना असताना काही ठरावीक लोकांनाच मंदिरात प्रवेश का? हा प्रश्न त्यांना सतत भेडसावीत होता. नेमक्या ह्याच मनोवृत्तीतून अस्पृश्यासाठी बंद असलेले अमरावतीचे अंबादेवी मंदिर खुले करावे या साठी त्यांनी सत्याग्रह केला.[३] जर अंबादेवीच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाल्यास सामाजिक भिन्नता नष्ट होण्यास मोलाची मदत होईल. तसेच यापूर्वी अशा प्रकारचा अस्पृश्यता निवारण्यासाठी कुणीही मार्ग अवलंबला नव्हता.

अस्पृश्यता निवारणाच्या चळवळी पुणे, मुंबईकडे सुरू असतांना तिकडचे वारे पुर्वेकडे वाहणे अपरिहार्य होते. त्यानुसार विदर्भातही अस्पृश्यता निवारणाच्या चळवळी, त्यात सक्रीय भाग घेणे, पुढाकार घेणे आदी बाबी सुरू झाल्या. त्यात स्पृश्य अस्पृश्य अशा दोन्ही लोकांचा पुढाकार होता. त्यात सर मोरोपंत जोशी, रा.ब. रंगनाथ मुधोळकर, मोहप्याचे किसन फुगोजी बनसोडे, गणेश आकाजी गवई आदिचे कार्य उल्लेखनिय आहे.[४]

अमरावती येथील श्री अंबादेवी संस्थान विदर्भात प्रसिध्द असून दरवर्षी दसऱ्याचे नवरात्राचे वेळी अंबादेवीची मोठी यात्रा भरते. शिवाय हजारो भावीक



Scanned with CamScanner

देवीच्या दर्शनास जातात. श्री अंबादेवी महाराष्ट्रातील अनेक कुटुंबाची कुलदेवता आहे. इ.स. १८७० च्या गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक मध्ये हे मंदिर हजारो वर्षापूर्वी बांधले आहे असे नमुद केले आहे.[५] अस्पृश्यांना अंबादेवी मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून इ.सन. १९२५ पासून अस्पृश्य बांधव सक्रीय प्रयत्न करीत होते. या मंदिराचा कारभार पाहण्यासाठी एक पंचकमेटी होती. त्या कमेटीत दादासाहेब खापर्डे, वाय.जी. देशपांडे, केवले, चिमोटे अशी श्रीमंत मंडळी होती. श्रीमंती सोबतच परंपरांवादी वृत्ती असल्यामुळे जीर्ण मूल्यांना चिटकून होती. १९२५ पासूनच श्री. माधवराव गोविंदराव मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली पंचकमेटीकडे मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून अर्जा मागे अर्ज पाठवीणे सुरू होते. परंतु कमेटीने त्या अर्जाना केराची टोपली दाखवली. भाऊसाहेबाचे अस्पृश्य मंडळीनी पाठवलेल्या अर्जाकडे लक्ष होते. त्यांनी स्वतःच्या अध्यक्षेतेखाली जुलै १९२७ मध्ये 'सत्याग्रह समिती' स्थापन केली. श्री. संपतराव गणपतराव नाईक यांना कार्यवाहक केले. व व्हि.बी. चौबळ, रावसाहेब रनदिवे, नानासाहेब अमृतकर, दादासाहेब पाटील, दलपतसिंह चव्हाण इत्यादी मित्रांना सदस्य केले. या कमीटीद्वारे प्रथम गावोगावी लोक जागृतीचे कार्य सुरू केले. जिल्हाभर दौरे काढण्यात आले. या दौऱ्यात सभा आयोजीत करून महार, मांग, चांभार, ढोर, हे सारे अस्पृश्य आपलेच बांधव आहेत. आपल्याला देवळात जायचा जसा हक्क आहे. तसा त्यांचाही आहे. आम्ही भेदाच्या कृत्रिम भिंती तयार केल्या आहेत. धर्मात कुठेच भेद नाही, धर्मात समता आहे. माणूस जन्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ होत नाही. श्रेष्ठता वा कनिष्ठता कर्माने ठरते. म्हणून अंबा देवीच्या मंदिरात सर्वांना प्रवेश मिळालाच पाहिजे अशा प्रकारचे विचार व्यक्त करू लागले. त्यांनी तालुक्याच्या जागी मोठ्या मोठ्या सभा आयोजीत केल्या होत्या. अचलपूरला दलपतसिंह चव्हाणांनी, थुगावला नानासाहेब अमृतकरांनी, बडनेराला खुद भाऊसाहेबांनी प्रचंड सभा भरवून अस्पृश्यांच्या हक्कासाठी सडेतोडपणे विचार मांडले.[६]

२६ जुलै १९२७ रोजी दादासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी साडेपाच वाजता सभा भरली होती. सभेत नानासोब गवई, पंजाबराव देशमुख, वगैरे मंडळी हजर होती. त्या सभेत खालील ठराव पास झाले.

अमरावती येथील श्री. अंबादेवी देवालयात अस्पृश्यांना जाऊ देण्यासंबंधीचा अर्ज मागील वर्षी देवस्थान कमीटीकडे केला होता. परंतु त्याचे असमाधानकारक उत्तर मिळाले. महात्मा गांधीजींची अस्पृश्यता निवारण्याबाबतची चळवळ व कळकळ व राष्ट्रीय पुढाऱ्यांची या प्रश्नावर एक वाक्यता व मोर्शी येथील नुक्त्याच भरलेल्या हिंदू महासभेने सार्वजनिक देवळे व विहीरी अस्पृश्यांना खुली करावीत. असा केलेला ठराव ही सर्व सूचिन्हें असे दर्शवित आहे की, अस्पृश्य वर्गाने हात पाय हालविल्यास श्री अंबादेवीच्या देवालयात हिंदू या नात्याने जाण्याच्या त्यांच्या जन्मसिध्द हक्कास हिन्दू समाजाकडून अडथळा येणार नाही. तथापी असा प्रयत्न होण्यापूर्वी श्री. अंबादेवी देवालयाच्या देवस्थान कमीटीचा विचार काय आहे. हे आजमावून पाहणे जरूरी व योग्य आहे. हे जाणून त्यांच्याकडे सभेत पास झालेल्या ठरावाची नक्कल अध्यक्षानी पाठवावी व त्यावर उत्तर १५ दिवसाच्या आत मागवावे. सदरहू कमीटीकडून समजसपणे व समाधानकारक उत्तर येईल अशी या सभेला पूर्ण उमेद आहे. दूर्दैवाने असमाधानकारक उत्तर आल्यास याबाबत सत्याग्रह होणे क्रमप्राप्त झाल्यास अस्पृश्य बंधुंनी आपली तयारी ठेवावी अशी त्या सभेची सूचना आहे.[७] ठरावाची नक्कल अमरावती येथील श्री. अंबादेवी संस्थेची सेक्रेटरी यांना पाठविले व त्याचे उत्तर १८ सप्टेबर १९२७ चे आत मागवीले सेक्रेटरीकडून आलेल्या उत्तराचा विचार करण्याकरीता २२ सप्टेंबर १९२७ रोजी अमरावती येथे अस्पृश्यांची पुन्हा सभा होईल. अशी बातमी १२ ऑगस्ट १९२७ च्या बहीष्कृत भारतच्या अंकात आहे.

दि. २८ ऑगस्ट १९२७ रोजी अस्पृश्य समाजाची एक मिरवणूक शहरातून काढण्यात आली होती. मिरवणूकीची समाप्ती शिवाजी मैदानात होऊन तेथेच बॅ. तिडके यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी पाच वाजता जाहीर सभा भरली. अंबादेवी संस्थानने अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशास विरोध दर्शविला त्याचा निषेध करणारा पहिला ठराव श्री. अमृतकर यांनी मांडला. दुसरा ठराव, नागपुरचे श्री. वामनराव चोरघडे यांनी मांडला. अंबादेवी संस्थानात सत्याग्रह करून प्रवेश करावा. असा ठरावाचा आशय होता. या ठरावाला श्री. गवई (एम.एल.सी.) आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अनुमोदन दिले. तिसऱ्या ठरावाने या सत्याग्रहाकरीता मनुष्यबळ व द्रव्यबळ जमवण्याकरीता श्री. नानासाहेब गवई यांच्या अध्यक्षतेखाली



Scanned with CamScanner

एक कमिटी नेमण्यात आली. श्री. पंजाबराव देशमुख व संपतराव नाईक सचिव होते. श्री. नानासाहेब गवई यांनी आपल्या भाषणात "आमचा जर देवस्थानात प्रवेश होऊ दिला नाही तर हिंन्दू धर्म आम्ही खड्यात घालू व रक्तपात झाला तरी आम्ही सत्याग्रह चालवू." असे उदगार काढले. नंतर श्री. चव्हाण, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. पटवर्धन श्री. गोपाळराव देशमुख, श्री. खेडकर, श्री. ओगले यांची भाषणे होऊन सभा बरखास्त झाली.[८] भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांचा अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेश अंदोलनाला पाठिंबा मिळताच आंदोलनाची व्यापकता वाढली. अनेक उपाय करून बहीष्कृतांची चळवळ हाणून पाडण्याचा प्रयत्न झाला. सभा सुरू असतांना अमरावतीच्या मांग समाजातील ५०-६० लोकांच्या सह्या असणारे व अस्पृश्यांच्या चळवळीला आमचा पाठींबा नाही. अशा निवेदनोचे पत्र वाटण्यात आले होते.[९] हा चळवळीत फुट पाडण्याचा प्रयत्न होता.

अंबादेवी मंदिरात प्रवेश देण्यासंबंधीत विश्वस्थांनी दिरंगाईचे धोरण अंगारले. मंदिराचे काही विश्वस्त या मागणीला थोडी सहमती दर्शविणार होते तर बहूतांशी कर्मठवादी विश्वस्त या प्रवेशाला कडाडून विरोध करीत होते. यातून अंतिम मार्ग काढण्यासाठी दि. २३ सप्टेंबर १९२७ रोजी सायंकाळी हनुमान आखाड्याच्या पटांगणात पुन्हा एक जाहीर सभा घेण्यात आली. भाऊसाहेबांनी आपल्या सहकाऱ्यातून एक सत्याग्रह समिती गठीत केली. भाऊसाहेब स्वत: त्या समितीचे अध्यक्ष झाले तर संपतराव नाईक कार्यवाह झाले. समिती तर्फे संपूर्ण वऱ्हाड प्रांतात लोक जागृती करण्यात आली. त्यामुळे लोकांमध्ये उत्साह निर्माण झ ाला. याच दरम्यान ऑक्टोंबर १९२७ मध्ये वलगाव येथील एक अस्पृश्य समाजातील 'मांगोजी' देवीच्या मंदिरात गेल्या बद्दल पोलीसांनी त्याच्यावर खटला भरला त्याचे वकील पत्र भाऊसाहेबांनी स्वत: घेतले व केस लढवून त्याची निर्दोष सुटका केली.[१०]

अर्ज, विनंती, निवेदन, समजावण, आदी मार्गाने श्री अंबादेवी देवस्थानचे विश्वस्त बधले नाहित म्हणून डॉ. पंजाबरावांच्या अध्यक्षतेखाली एक 'वऱ्हाड अस्पृश्य परिषद' आयोजीत करण्याचे ठरले. दि. १३,१४ नोव्हेंबर १९२७ रोजी इंद्रभूवन थिएटर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली.



Scanned with CamScanner

डॉ. पंजाबराव देशमुखांनी लवकरच होणाऱ्या श्री. अंबादेवी मंदिराच्या सत्याग्रहाच्या दृष्टिने सभेचे महत्त्व प्रतिनिधींना समजून सांगीतले व डॉ. आंबेडकरांना सभेचे अध्यक्ष स्थान स्वीकारण्याची विनंती केली.[११] डॉ. आंबेडकरांनी आपल्या सडेतोड, विद्वत्तापूर्ण व ओजस्वी भाषणात सांगीतले, उपासनेचे अनेक प्रकार आहेत. साकाराचे प्रत्यक्ष पूजन देवळात करता यावे म्हणून अस्पृश्यांना देवळात प्रवेश पाहिजे, असे नाही. त्यांना सिध्द करायचे आहे की, त्यांच्या प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही किंवा स्पर्शाने मूर्तीचे पावीत्र्य कमी होत नही. मंदिरे जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्यांची आहेत. त्यावर जितका स्पृश्यांचा तितकाच अस्पृश्यांचा वारसा आहे.[१२]

अंबादेवी संस्थांनचे विश्वस्त व सत्याग्रह समिती यांच्यातील विरोध वाढवून वातावरण चिघळत जाईल आणि परीणामता आंदोलनाला स्पोटक वळण लागेल, अशी चित्रे दिसू लागली होती. ही परिस्थिती वाईट स्थराला जाईल हे लक्षात येताच डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अतिशय दूरदृष्टिने विचार करून त्यांचे सहकारी श्री. व्हि.बी. चौबळ यांना अंबादेवी संस्थानचे विश्वस्त श्री. दादासाहेब खापर्डे यांच्याकडे पाठवले व त्यांना मतभेद मिटवण्याच्या दृष्टिने प्रयत्न करावे असे सुचवले. त्या प्रमाणे श्री. चौबळ हे श्री. दादासाहेब खापर्डे यांचे घरी गेले व दादासाहेबांना सर्व परिस्थीतीची कल्पना दिली. आपण मला मतभेद मिटवण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे.[१३] अशा अशायाचे पत्र दिले तर बरे होईल. त्यामुळे सत्याग्रहाचा विचार पुढे ढकलला जावून अंदोलनाची तिव्रता कमी होईल असे वाटते. असा विनंती वजा प्रस्ताव श्री. चौबळ यांनी श्री. खापर्डे यांचे समोर ठेवताच श्री. दादासाहेब खापर्डे यांचे दडपण कमी झाले व त्यांनी लगेच 'येत्या तीन महिण्यात पुराणमतवादी लोकांचे मत वळवून मी हे मंदिर सर्वांसाठी खुले करून देतो.'[१४] अशा अशायाचे पत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावे दिले. परिषेदेत श्री. खापर्डे यांनी पाठवलेले ते पत्र डॉ. आंबेडकरांनी वाचवून दाखवीले व समितीमधील सर्वांशी चर्चा करून डॉ. आंबेडकरांनी आदोलन तीन महिण्यासाठी पुढे ढकलण्यात येत असल्याचे जाहीर केले. अंबादेवी संस्थांनच्या विश्वस्तांकडून तीन महिण्यात मंदिर खुले न झाल्यास आंदोलन करण्याचा निर्णय या परिषदेत घेण्यात येऊन परिषद संपली. अमरावती अंबादेवी मंदिर प्रवेशाचे आंदोलन हे



Scanned with CamScanner

अहिंसक मार्गाने व्हावे, त्यात संघर्ष होऊ नये. सत्याग्रहाच्या आधारावर अस्पृश्यांना न्याय मिळावा असे बाबासाहेब व भाऊसाहेब या दोघांनाही वाटत होते. त्यामुळे श्री. दादासाहेब खापर्डे यांनी सुचवीलेली तडजोड दोघांनीही मान्य केली. पुढे तीन महिण्यानंतर श्री. खापर्डे यांच्या प्रयत्नांना यश येवून अमरावतीचे अंबादेवीचे मंदिर सर्वांसाठी खुले करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रयत्न यासाठी जेवढे कारणीभूत आहेत. तेवढेच श्रेय टिळकांचे सहकारी श्री. दादासाहेब खापर्डे यांना सुध्दा आहे. कारण त्यांच्याच तीन महिण्यांच्या अथक प्रयत्नामुळेच कर्मठ विचाराच्या विश्वस्त मंडळीचे मत परिवर्तन होवू शकले.

श्री. अंबादेवी मंदिराचा सत्याग्रह यशस्वी झाल्यामुळे देवळाच्या पायरीवरही पाय ठेवू न शकनारे अस्पृश्य थेट गाभाऱ्यात जावून श्री. देवीच्या मस्तकावर फुल प्रसाद चढवून मनसोक्त दर्शन घेवू शकले. यामूळेच जातीभेद निर्मुलनाची एक पायरी गाठता आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला वेग आला. नाशीकचे काळाराम मंदिर प्रवेश, पुण्याच्या पार्वती येथील मंदिर प्रवेश सत्याग्रह चळवळीने गती घेतली. अस्पृश्यता निवारण्यासाठी त्या वेळी मंदिर प्रवेश हा एक चांगला विधायक मार्ग सापडला. त्यानंतर १९४६ साली पंढरपूरचे विठ्ठल रखमाई मंदिर सानेगुरूजींच्या आमरण उपोषणामुळे अस्पृश्यांसाठी खुले करावे लागले. परंतु महाराष्ट्रातील मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहात भाऊसाहेबांनी घडवून आणलेला अंबादेवीचा सत्याग्रहच अग्रपुजेचा मानकरी ठरतो.

ज्या काळात अस्पृश्यांचे अंगणात सड्यावरून जाणेसुध्दा निशिध्द मानले जायचे. त्या काळात भाऊसाहेबांचे कार्य अलौकिक होते.

**संदर्भ :-**

१. देशमुख, प्रा.सौ. कल्पना - डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान (आवृत्ती १९९७) पृ.क्र.६.
२. सावरकर व डॉ. सुर्यकर - डॉ. पंजाबराव देशमुख जिवन व कार्य पृ.क्र. १८०.
३. प्रा.गवई, सुभाष - भाऊसाहेबांचे अंबादेवी प्रवेश आंदोलन, लोकसत्ता मार्च २००१. पृ.क्र. ९.



Scanned with CamScanner

४. कारंजकर, भि.दे. - अमरावती शहराचा इतिहास (आवृत्ती १९७८) पृ.क्र. ८१३

५. कोसारे, एच.एल. - विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास (स्वातंत्र पुर्व काळ) (आवृत्ती प्रथम १९८४) पृ.क्र. २३९.

६. कवडे, प्रा. रघुनाथ - भारत कृषक भूषण : भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख (आवृत्ती १९८६) पृ.क्र. ६०.

७. आंबेडकर, डॉ. भि.रा. (संपा.) - बहिष्कृत भारत, मुंबई, दि. १२ ऑगस्ट १९२७.

८. मुन वसंत, (संपा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मुक नायक (आवृत्ती प्रथम १९९०).

९. कारंजकर, भि.दे. - अमरावती शहराचा इतिहास (आवृत्ती १९७८) पृ.क्र. ५६६

१०. प्रा. मेघे ज्ञानेश्वर, प्रा.मेघे कुलभूषण - पुत्र सर्वश्रेष्ठ धन निर्मात्याचा डॉ. पंजाबराव देशमुख पृ.क्र. ९०.

११ आंबेडकर, डॉ. भि.रा. (संपा.) - बहिष्कृत भारत, मुंबई, दि. २५ नोव्हेंबर १९२७.

१२. कोसारे एच.एल. - विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास (स्वातंत्र पुर्व काळ) (आवृत्ती प्रथम १९८४) पृ.क्र. २४०.

१३. कारंजकर भि.दे. - अमरावती शहराचा इतिहास (आवृत्ती १९७८) पृ.क्र. ५६८

१४. कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरीत्र पृ.क्र. ६६४.



Scanned with CamScanner

RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN-2349-3984
Impact Factor - 5.686

आज़ादी का अमृत महोत्सव

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A Quarterly Peer Reviewed Journal)

Special Issue - I



Lokraja Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj

Commemorative Centenary Year

and the

Birth Anniversary of

Dr. Dwarkadasji Lohiya (Babuji)



## Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Social Development

Editors

**Dr. Prakash Jadhav**
Principal,
Manavlok's College of Social Work, Ambajogai

**Dr. Hanumant Salunke**
Assistant Professor

**Sukeshini Jogdand**
Assistant Professor

MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK

Post Box No. 23
Ring Road, Ambajogai, Dist.Beed, (MS) Pin-431 517
E-mail:- manavlok1999@gmail.com
Websit :- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN – 2349-3984
IMPACT FACTOR 5.686

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A QUARTERLY PEER REVIEWED JOURNAL)
**Special Issue – 1**

**Manavlok's (Marathwada Navnirman Lokayat) College of Social Work, Ambajogai Dist Beed**
**Organizing**
## one day National Seminar
**on the occasion of**
**Lokraja Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj commemorative Centenary Year and the Birth Anniversary of Dr. Dwarkadasji Lohiya (Babuji)**
**on**

# "Contribution Of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj In Social Development"

Date : 07th September 2022

**Editor**
Dr. Prakash Jadhav, Principal
Sukeshini Jogdand, Assistant Professor
Dr. Hanumant Salunke, Assistant Professor

---

**MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK, AMBAJOGAI**
Post Box No-23
Ring Road, Ambajogai, Dist. Beed, (MS) Pin -431517
E-mail:-manavlok1999@gmail.com
Website:- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

| | | |
|---|---|---|
| 13 | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक योगदान<br>प्रा. डॉ. विलास घोडे | 76 |
| 14 | भारतातील आरक्षण व्यवस्था व सद्यस्थिती<br>श्री बाळासाहेब अंसाराम शिंदे | 82 |
| 15 | राजर्षी शाहू महाराज यांचे वंचित घटकाच्या पुनरुत्थानातील योगदानाचे आधुनिक संदर्भ<br>*मधुकर गंगाराम लेमले* | 87 |
| 16 | राजर्षी शाहू महाराज व स्त्री शिक्षण<br>*डॉ. विद्याधर रेड्डी* | 90 |
| 17 | राजर्षी शाहू महाराज यांचे वंचित घटकांच्या पुनरुत्थानातील योगदान<br>*प्रा. डॉ. मस्के दिलीप सिताराम* | 95 |
| 18 | शाहु महाराजांचे सामाजिक सुधारणेतील योगदान एक ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे | 99 |
| 19 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि जाती निर्मूलन<br>प्रा. डॉ. माधव माणिकराव मोरे | 103 |
| 20 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे जीवनकार्य एक सामाजिक दृष्टीक्षेप<br>डॉ. चंद्रशेखर एन. मोहोड | 106 |
| 21 | राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्यायाची भूमिका<br>*प्रा.डॉ.चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे* | 111 |
| 22 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे समाज विकासातील योगदान<br>*डॉ. अशोक द. सातपुते* | 117 |
| 23 | छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य आणि संयुक्त राष्ट्र संघाचे शाश्वत विकासाचे ध्येय<br>*प्रा. सतीशकुमार धवड* | 120 |
| 24 | छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांचे समाजविकासातील योगदान<br>*अनिल उदावंत* | 125 |
| 25 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य.<br>*प्रा. डॉ. अनंत मरकाळे* | 131 |

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक

यशवंतराव

महाराष्ट्राला समाज सुधारणेची मोठी परंपरा लाभलेली आहे. येथे साधुसंतांनी सामाजिक सुधारणांचे कार्य सुरू केले होते. साधुसंतांनी काही प्रमाणावर यश आले असले तरी मध्ययुगीन कालखंडात होत गेली. स्त्री स्वातंत्र्यावर बंधने आली, अस्पृश्यता व उच्चनीच्यतेची व्रतवैकल्ये, धार्मिक दांभीकता ह्या सर्व बाबी एकोणविसाव्या समाजजीवन रुढी परंपरांमध्ये गुरफटून पडले. समाजात जातीयतेची असा भेद अस्तित्वात आला होता. बहुजन वर्गाला अनेक अधिकारापासून होते. तर चार्तुवर्ण्य चौकटीच्या बाहेर असलेल्या अती शुद्रांना अस्पृश्य हक्क परंपरेने हिरावून घेतले होते. व्रत वैकल्य, पूजा अर्चा, दानधर्म व अति महत्त्व आले होते. समाजात बालहत्या, नरबळी, सतीप्रथा व विधवा इत्यादी वाईट प्रथा रुढ झाल्या होत्या. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, क्षेत्रात महाराष्ट्राची अवनती झाली होती. या पार्श्वभूमीवर ऐकोणवीसावे भारतीय जनजीवनात प्रचंड उलथापालथी घडून आणणारे शतक ठरले. मुंबई इलाख्यात मुंबई व पुणे ही सामाजिक जागृतीची प्रमुख केंद्रे बनली. ठिकाणी पाश्चात्य विद्येची केंद्रे प्रथम स्थापन झाली. इ. स. १८३२ जांभेकरांनी आपल्या लेखनीद्वारे परंपरेत जखडलेल्या समाजावर प्रहार केली. त्यानंतरच खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात समाज सुधारणेच्या चळवळीला त्यांच्यानंतर लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांनी आपल्या लेखणीने करण्याचा प्रयत्न केला. बाळशास्त्री जांभेकर व लोकहितवादी यांच्यापासून समाजसुधारणा चळवळीच्या प्रवाहात भाऊ महाजन, विष्णूबुवा ब्रह्मचारी, दादोबा पांडुरंग, डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. रामकृष्ण भांडारकर, न्या. महादेव प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांनी महत्त्वाचे कार्य केले. महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांची कामगीरी महनीयच होय. तथापि विधवा विवाह, बालविवाह, मुलींचे शिक्षण, धार्मिक कर्मकांड यासारख्या वरिष्ठ वर्गातील विषयांभोवतीच फिरत राहिली होती. ब्राह्मो समाज अथवा प्रार्थना समाज या सुधारणावादी संघटनांचे कार्य समाजातील खालच्या थरापर्यंत पोचु शकले नव्हते. शूद्रातिशूद्रांचे जनावराहूनही कमी प्रतीचे बनले होते. त्यांच्या दुःखांना 'वाचा' फुटत नव्हती. वाली नव्हता. अशा या विद्याहीन, आणि सत्ताहीन समाजाच्या दुखःला वाचा वाली मिळला तो महात्मा जोतिराव फुले यांच्या रूपाने. बहुजन समाजाच्या मुळ त्याच्या अज्ञानात व अद्धश्रद्धेत आहे आणि त्यावर 'शिक्षणा' शिवाय दुसरा असे महात्मा फुले यांचे मत होते. म्हणून शूद्रातिशूद्रांसाठी त्यांनी शाळा अस्पृश्य मुलामुलींची शाळा, बालहत्या प्रतिबंधक गृह, सत्यशोधक समाजाची महात्मा फुले यांच्या मुलगामी स्वरुपाच्या चळवळीमुळे महाराष्ट्रातील समाज

मदत झाली. हजारो वर्ष धार्मिक अंधश्रद्धा व रुढीपरंपरेत खितपत पडलेल्या समाजात नवी चेतना निर्माण करण्याचे काम या चळवळीने केले. म्हणून महात्मा जोतिराव फुले यांना महाराष्ट्रातील समाजसुधरणेच्या चळवळीचे अग्रणी म्हणून मानाचे स्थान आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत महाराष्ट्रात सामाजिक चळवळीत आघाडीवर कार्य करणाऱ्या सुधारकांचा एकापाठोपाठ मृत्यू झाल्याने समाज सुधारणेच्या चळवळीत एकप्रकारची पोकळी निर्माण झाली होती. त्याचवेळी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सामाजिक चळवळीची होऊ पाहणारी कोंडी फोडण्यास्तव महाराष्ट्रात राजर्षी छत्रपती शाहूच्या रुपाने एक नवीन नेतृत्व सामाजिक चळवळीला मिळाले. राजर्षी छत्रपती शाहूंच्या काळापर्यंत सामाजिक परिवर्तनाचे फक्त विचार मांडण्यात आले होते. या विचारांना राजाश्रय नसल्याने फक्त विचारांचीच पेरणी समाजात करता आली होती. महात्मा फुले सार्वजनिक सत्यधर्म सांगितला होता. पण राजसत्ता हातात नसल्याने इच्छा व तळमळ असुनही त्यांना तो प्रत्यक्षत आणता आला नाही. परंतु त्यांनी वैचारिक क्रांतीची बिजे मात्र पेरली होती. राजकीय इच्छाशक्ती असली की, कोणतेही परिवर्तन शक्य असते. सम्राट अशोकाने जशी आपली सर्व राजकीय शक्ती बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी वापरली त्याचप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपली सर्व राजकीय शक्ती सामाजिक समता प्रस्थापीत करण्यासाठी वापरली. म्हणूनच सामाजिक राजकारणाचा अभिकर्ता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

देशातील तत्कालीन धार्मिक स्थिती फारच खराब झाली होती. मूर्ती पूजेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. तसेच मूर्तीची पूजा करणारे स्वत:ला फारच पवित्र समजत होते. वास्तविक पाहता ब्राह्मणत्व गुण कर्मावर अवलंबून होते. पण नंतरच्या काळात ते जातीवर अवलंबून झाले. या विषयी राजर्षी शाहू महाराज म्हणतात, "वेद प्रतिपादित खऱ्या आर्य धर्मावर अनेक पुटे चढल्याकारणाने त्याचे शुद्ध स्वरूप दिसेनासे झाले. ऋषिप्रणित ग्रंथाचा अभ्यास, लबाड व बनावटी भटजींच्या टीका, भाष्ये वगैरेंच्या आधाराने होऊ लागल्याने त्यातील सिद्धांत बरोबर समजेनात."[प] तिर्थाचे काल्पनिक महत्त्वही त्यावेळी फार वाढवण्यात आले होते. मनुष्याच्या जन्मापासून तर मृत्यू पर्यंत वेगवेगळी व्रते सांगून त्यांच्याकडून पैसा उकळल्या जात असे. जोतिष्य शास्त्राच्या माध्यमातून वेगवेगळया ग्रहाची भीती लोकांच्या मनात घातली जात असे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या भाषणात तत्कालीन सामाजिक स्थितीविषयी म्हटले की, "आपण जर भारत वर्षाच्या गत इतिहासावर दृष्टिपात करू. हजार वर्षापूर्वीच्या व आताच्या भारतवर्षात जमीनअस्मानाचे अंतर पडले आहे. आज पराक्रम, विद्या, धर्मशीलता, उदारमतवादी सदगुण लुप्त झाले आहेत. हजारो कुसंस्कार, चालीरिती यांनी भारतवर्ष ग्रासून गेलेला पाहून काही आश्चर्यही वाटेनासे झाले आहे. बालविवाह, बहुविवाह, मद्यपान, स्त्रीयांना शिक्षणास मज्जाव, वर्णाश्रमधर्माची अव्यवस्था वगैरे अनेक समाज घातकी रूढींनी समाज निर्जीव करून टाकला आहे."[पप] संपूर्ण भारतात ब्राह्मणेतर जातींची अवस्था अतिशय शोचनीय झाली होती. विशिष्ट जातीत जन्म घेतला आहे म्हणून त्यांना प्रगती करण्यास संधीच दिली जात नव्हती. संपूर्ण भारतात एक्य, प्रेम व सहकार्य कोठेच पाहायला मिळत नव्हते. म्हणून राजर्षी शाहू महाराज म्हणतात, "भारतवर्षामध्येच अशी लोके वर्तमान आहेत की, ज्यांना आपल्या बंधुची छायाही, आपल्यावर पडणे दु:सह होते. तसेच स्वत:ला उच्च समजणारे लोक मिथ्या जातिभिमानाच्या नशेत अगदी निमग्न होऊन गेले आहेत व नीच म्हणविल्या जाणाऱ्या जातीवर मन मानेल तसे अत्याचार करून राहिले आहेत."[पपप] राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना तत्कालीन परिस्थितीत अमुलाग्र बदल पाहिजे होता. दि. ३० मे १९२० च्या नागपूर येथील आपल्या भाषणात ते म्हणतात, "हल्ली

असलेल्या हिंदू कायद्यातही पुष्कळ दुरूस्ती झाली पाहिजे. राष्ट्रीयत्वाची व समाजाची ... वाढलेली आहे. मिश्रविवाह, परदेशगमन, जातिभेद, परधर्माविषयी सहिष्णुता वगैरे सर्व ... जोराने पुढे येऊ लागल्या आहेत. त्या कल्पनांना पोषक असे कायदे पाहीजे ... नसल्यास समाजाचे गाडे अडून राहणार आहे."[१४] राजर्षी शाहू महाराजांनी राज्याची ... घेण्यापूर्वी कोल्हापूर संस्थानात एखादा ब्राह्मण गरीब जरी असला तरी त्याला ... प्रकारची प्रतिष्ठा होती. परंतु तेथे मागासवर्गीय लोकांचे जीवन हिन दर्जाचे गणले ... पण राजर्षी शाहू महाराजांची राज्यव्यवस्था ब्राह्मणांच्या या मिरासदारीला एक आव्हान ...

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात जे सामाजिक परिवर्तन घडवून आले, त्यात ... छत्रपती शाहू महाराजांची भूमिका महत्त्वाची आहे. आज ग्रामीण भागात मोठया ... शिक्षणाचा प्रसार होत आहे. सामान्य माणूस आपल्या राजकीय व आर्थिक हितसंबंधा... जागृत होत आहे. गेल्या काही दिवसात महाराष्ट्रात हे जे बदल घडवून आले आहेत ... सर्व श्रेय राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आहे. सयाजीराव गायकवाड यांची ... कारकीर्द ही शाहू महाराजांच्या पुढे प्रत्यक्षाप्रत्यक्ष आदर्श म्हणून होती. सयाजीराव ... यांनी जो सामाजिक व धार्मिक सुधारणेचा पाया घातला, तोच उपयोगात आणून ... छत्रपती शाहू महाराजांनी त्यावर सुंदर मंदिर बांधले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या ... समाजातील ब्राह्मण—ब्राह्मणेतर वादाचे मुळ शिक्षणाचा अभाव हे आहे. कर्नाटकातील ... येथे दि. २७ जुलै १९२० रोजी कर्नाटक ब्राह्मणेतर परिषदेचे अध्यक्ष म्हणून राजर्षी ... शाहू महाराजांनी विचार व्यक्त करतांना म्हटले होते की, "ब्राह्मणांनी विद्या रक्षण केली ... बद्दल ते अभिनंदनास पात्र आहेतच. परंतु ही विद्या स्वत: पुरती मर्यादित ठेवण्याची ... फार मोठी चूक केली. हे सर्व घडले तेव्हा रानडे—गोखले—आगरकर यांच्यासारखे ... असते तर ते घडलेच नसते. सनातनी ब्राह्मण वर्गाने स्वत:स भूदेव समजून इतर वर्गाला ... लेखिले. परिणामी देशाची प्रगती खुंटली एकी नष्ट झाली. या जातीवादामुळे यवनांचे ... ब्राह्मणांनी निर्माण केलेल्या वर्णाश्रमधर्मामुळे, जातीवादामुळे, इंग्रजाचे राज्य या ... स्थिरावले. मात्र इंग्रज राज्यकर्ते उदार बुद्धीचे होते. त्यांच्या उदार अशा शैक्षणिक व ... धोरणामुळे सनातनी ब्राह्मणशाहीच्या जोखडतून सामान्याची सुटका झाली."[१५] दलीत ... अस्पृश्य यांच्यात केवळ सामाजिक दृष्टया सुधारणा करून राजर्षी थांबले नाहीत. तर ... आर्थिक स्थीती सुधारण्यासाठी त्यांना सरकारी नोकरीत संधी दिली. त्यासाठी आरक्षण ... काही लोकांना उद्योग करण्यास प्रोत्साहन दिले तर काहींना उद्योग करण्यासाठी आर्थिक ... केली. आधुनिक काळात महाराष्ट्राची जडणघडण करणाऱ्या महान नेत्यांमध्ये कोल्हापूर... राजर्षी शाहू छत्रपती यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. शेकडो वर्ष जे लोक ज्ञान, सत्ता ... संपत्ती यापासून वंचित राहीले. त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे ... त्यांच्यासाठी विकासाच्या वाटा खुल्या व्हाव्यात असा शाहू छत्रपतीनी आयुष्यभर ध्यास ... होता. म्हणून राजकीय स्वराज्य मिळवण्याचा प्रश्न त्यांना गौण वाटला होता. सामाजिक ... धार्मिक समतेची प्रस्थापना करण्याच्या प्रश्नाला त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला.

अनेक विद्वानांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना महात्मा फुल्यांचे अनुयायी ... शिष्य मानले आहे. पण डॉ. जयसिंगराव पवार यांच्या मते, "महाराज एक महापुरुष ... आणि महापुरुष कोणाचा अनुयायी असत नाही. शिवछत्रपती कोणाचे अनुयायी नव्हते. ... फुले कोणाचे शिष्य नव्हते. त्यांच्यासारखे महापुरुष स्वयंभू असतात. त्यांच्या अंत:करणा... मानवतेची प्रेरणा त्यांच्या मार्गावर त्यांना पुढे रेटीत असते. महापुरुष समाजातील अनेक व्यक्तींचे सहाय्य जरूर घेतो; पण त्याचा मार्ग हा त्यालाच निर्माण करायचा असतो. ...

त्याचाच मार्ग असतो. शाहू चरित्र अभ्यासत असताना इतिहासकारांनी हा दृटिकोन स्विकारला की, मग आर्य समाजी शाहू महाराज मूर्तीपूजा कशी करतात व सत्यशोधक शाहू महाराज क्षत्रजगद्गुरूचेपीठ कसे निर्माण करतात, या वरवर गुढ वाटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे सहजासहजी उलगडू लागतात."[अप]राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समाज सुधारणेसाठी आपल्या राजसत्तेचा उपयोग केला. त्यांनी सामाजिक व धार्मिक क्षेत्रात भेदभाव बंद करणारे कायदे केले. या कायद्याच्या माधमातून समाजात व धर्माच्या क्षेत्रात समता प्रस्थापित केली. या विषयी डॉ जनार्धन वाघमारे म्हणतात, "राजर्षी छत्रपतींनी केलेले कायदे म्हणजे शाहू महाराजांनी पास केलेले मुलगामी असे हिंदू कोड बिल होय."[अपप] इतिहास एक महामानव म्हणूनच शाहू महाराजांकडे पाहतो. छत्रपती शिवाजी महाराजाचे वंशज म्हणून ते महामानव नव्हते. भारतात राजे महाराजे अनेक होऊन गेले; पण त्यात राजर्षी दोनच झाले. पहिले महात्मा गौतम बुद्ध आणि दुसरे कोल्हापूरचे राजर्षी शाहू छत्रपती! राजर्षी शाहू छत्रपती Philosopher King होते.[अपपप] श्री ग. बा. सरदार म्हणतात, "महाराजांची भुमिका तत्त्वचिंतकाची नसून कृतिशील समाजसुधारकांची होती."[पग] विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या महाराष्ट्रात छत्रपती शाहू महाराजांनी केलेले सामाजिक क्रांतीचे कार्य फार मोठे आहे. महात्मा गौतम बुद्ध, महात्मा जोतिराव फुले व कार्ल मार्क्स यांच्या तत्वज्ञानाची सांगळ घालून दलित बहुजन समाजाला उपकारक असे नवीन तत्वज्ञान या भूमित रुजविण्याचा तन मन धनाने आटोकाट प्रयत्न करणारा एक महामानव म्हणून इतिहास शाहू महाराजांकडे पाहतो व त्यांना वंदनीय मानतो. थोर समाज सुधारक विठ्ठल रामजी शिंदे हे त्या काळातील अग्रणी समाज सुधारक होते. एका समाज सुधारकाने एका प्रजाहितदक्ष राजाच्या मनाचा विकास कसा झाला हे सांगतांना ते म्हणतात, "शाहू राजा नुसता मराठा नव्हता, ब्राह्मणेतर ही नव्हता. तो नवयुगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरूष होता."[ग] यापेक्षा त्यांचा कोणता गौरव असू शकतो.

संदर्भ

[i] भोसले, डॉ. एस. एस. (संपा.), क्रांतिसूक्ते : राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २००६, पृ. क्र. ६०.

[ii] कित्ता, पृ. क्र. ७१.

[iii] कित्ता, पृ. क्र. ७१.

[iv] कित्ता, पृ. क्र. ७९.

[v] भोसले, डॉ. एस. एस. (संपा.), क्रांतिसूक्ते : राजर्षी छत्रपती शाहू, मुंबई, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २००६.पृ. क्र. ८६.

[vi] पवार, डॉ. जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, २००९,पृ. क्र. १५५.

[vii] वाघमारे, डॉ जनार्धन, राजर्षी शाहू : समाजक्रातीचा दिपस्तंभ, नाईकवाडे, डॉ. अशोक (संपा.), राजर्षी छत्रपती शाहू महाराज गौरव ग्रंथ, लातूर, विद्याभारती प्रकाशन, २०१२, पृ. क्र. १७.

[viii] पाटील, समाजभुषण पंढरीनाथ, श्री शिवाजी शिक्षणसंस्थेचा उगम आणि विकास,अमरावती, दौलतराव गोळे,१९७५.पृ.क्र.२.

[ix] पानसरे, कॉ. गोविंद, राजर्षी शाहू : वाद आणि वास्तव, इस्लामपूर, नाग—नालंदा प्रकाशन, २०१२,पृ. क्र. ४२.

[x] शिंदे, वि. रा., श्री शाहू छत्रपतींच्या मनाचा विकास, नाईकवाडे डॉ. अशोक (संपा.), राजर्षी छत्रपती शाहू महाराज गौरव ग्रंथ, लातूर, विद्याभारती प्रकाशन, २०१२, पृ. क्र. ४७.